CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, २४ मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १३५ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**




दिल्ली वि. लखनौ
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : विशाखापट्टणम

# संघ शताब्दीनिमित्त सामाजिक एकता, राष्ट्रीय पुनर्जागरणाचे लक्ष्य

## अ. भा. प्रतिनिधी सभेचा समारोप

◆ **बंगळुरू, २३ मार्च**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचण्यात यशस्वी ठरला आहे. संघ केवळ देशाला एकजूट करण्याचेच काम करीत नाही, तर नैसर्गिक आपत्तीच्या वेळीही मदत तसेच पुनर्वसन कार्यात तत्पर राहिला आहे. यंदा संघाचे शताब्दी वर्ष असून, आगामी काळात संघकार्याचा विस्तार आणि सुदृढीकरण यावर भर राहणार आहे. शताब्दी वर्षानिमित्त संघाने सामाजिक एकता आणि राष्ट्रीय पुनर्जागरणाचे लक्ष्य निर्धारित केले आहे, अशी माहिती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी दिली.

रा. स्व. संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेचा समारोप रविवारी झाला. बैठकीच्या शेवटच्या दिवशी भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव यांना हुतात्मा दिनानिमित्त श्रद्धांजली वाहण्यात आली तसेच सरकार्यवाह होसबळे यांनी महिला स्वातंत्र्य सेनानी महाराणी अबक्का यांच्या ५०० व्या जयंती वर्षानिमित्त एक विशेष वक्तव्य जारी केले.

प्रतिनिधी सभेविषयी माहिती देताना सरकार्यवाह होसबळे म्हणाले की, संघ यंदा आपले शताब्दी वर्ष साजरे करीत आहे. त्या निमित्त संघकार्याचा विस्तार आणि सुदृढीकरण यावर भर राहणार आहे. संघाचा उद्देश केवळ या शताब्दी उपलब्धीचा उत्सव साजरा करणे नाही, तर आत्मचिंतन करणे, संघकार्यासाठी समाजाने दिलेल्या समर्थनासाठी आभार व्यक्त करणे, देश तसेच समाजाला संघटित करण्यासाठी स्वतःला पुनःसमर्पित करणे हा आहे. शताब्दी वर्षात आम्ही अधिक सतर्क, गुणवत्ता आणि व्यापकतेने कार्य करण्याचा संकल्प करीत आहोत.

बांगलादेशातील हिंदू उत्पीडनावर पारित प्रस्तावाशिवाय अखिल भारतीय प्रतिनिधी सभेने संघाची १०० वर्षे पूर्ण होण्यासंदर्भातही संकल्प घेतला. डॉ. हेडगेवारांनी संघ स्थापनेच्या वेळी म्हटले होते की, संघ काही नवीन काम हाती घेत नाहीये, तर कित्येक शतकांपासून सुरू असलेल्या कामाला पुढे नेत आहे. विजयादशमीच्या दिवसापासून संघ शताब्दी दरम्यान विशिष्ट गतिविधींवर लक्ष केंद्रित करेल, असेही सरकार्यवाह होसबळे यांनी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)



पत्रपरिषदेला संबोधित करताना सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे आणि सुनील आंबेकर

### आगामी वर्षासाठी कार्यक्रमांची थोडक्यात रूपरेषा

१. शताब्दी वर्षाची सुरुवात विजयादशमीला होईल, त्या अंतर्गत गणवेशात (संघ गणवेश) स्वयंसेवकांचे मंडळ, खंड/नगर स्तराचे कार्यक्रम आयोजित केले जातील. दरवर्षीप्रमाणे याप्रसंगी सरसंघचालक स्वयंसेवकांना संबोधित करतील.

२. नोव्हेंबरपासून जानेवारी २०२६ पर्यंत तीन आठवड्यांपर्यंत मोठ्या प्रमाणावर घरोघरी संपर्क अभियानाची योजना आखण्यात आली आहे, ज्याचा विषय 'हर गाव, हर बस्ती, घर-घर' असा राहील. संपर्कादरम्यान संघ साहित्य वितरित केले जाईल आणि स्थानिक मंडळांद्वारे कार्यक्रम आयोजित केले जातील.

३. सर्व मंडळ आणि परिसरांत हिंदू संमेलने आयोजित केले जातील, ज्यात कोणत्याही भेदभावाविना प्रत्येकाच्या जीवनात एकता आणि सद्भाव, राष्ट्राच्या विकासात सर्वांचे योगदान आणि पंच परिवर्तनात प्रत्येक व्यक्तीची भागीदारी याचा संदेश दिला जाईल.

४. खंड/नगर स्तरावर सामाजिक सद्भाव बैठक आयोजित केली जाईल. ज्यात सर्वांनी मिळून एकजुटीने राहण्यावर भर दिला जाईल. या बैठकींचा उद्देश सांस्कृतिक आधार आणि हिंदू चरित्र कायम ठेवून आधुनिक जीवन जगणे हा आहे. यासाठी महाकुंभाचे उदाहरण देण्यात आले, जेथे सर्व क्षेत्रातील लोक एकत्र आले होते.

५. जिल्हा स्तरावर प्रमुख नागरिक संवाद आयोजित केले जातील. या कार्यक्रमांत राष्ट्रीय विषयांवर योग्य त्या धारणा स्थापित करणे आणि आज प्रचलित चुकीच्या धारणांना दूर करणे यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

६. युवावर्गासाठी विशेष कार्यक्रम प्रांतांद्वारे आयोजित केले जातील. १५ ते ३० वयोगटातील युवांसाठी राष्ट्र निर्माण, सेवा गतिविधी आणि पंच परिवर्तनावर केंद्रित कार्यक्रम केले जातील.

## महत्त्वाचे

### अंबानींच्या झोळीत आली आणखी एक कंपनी

**मुंबई** : अब्जाधीश मुकेश अंबानी यांच्या रिलायन्स इंडस्ट्रीच्या झोळीत शिपिंग व्यवसायाशी निगडित एक कंपनी आली आहे. रिलायन्सने आपल्या मालकीची उपकंपनी नौयान ट्रेड्स प्रायव्हेट लिमिटेडने (एनटीपीएल) वेलस्पन कॉर्प लिमिटेडकडून नौयान शिपयार्ड प्रायव्हेट लिमिटेडचे (एनएसपीएल) अधिग्रहण पूर्ण केले. त्याअंतर्गत सुमारे ३८३ कोटी रुपयांना ७४ टक्के इक्विटी हिस्सा खरेदी करण्यात आला आहे.

### ॲमेझॉनवरून ऑनलाईन शॉपिंग महागणार




**नवी दिल्ली** : देशातील आघाडीची ई-कॉमर्स कंपनी ॲमेझॉनने मोठा निर्णय घेतला असून, आता या साईटवरून ऑनलाईन शॉपिंग करणे महागणार आहे. या साईटद्वारे ऑनलाईन शॉपिंग करणाऱ्यांना आता प्रोसेसिंग फी म्हणून ४९ रुपये अतिरिक्त द्यावे लागणार आहे. त्यामुळे लोकांसाठी ॲमेझॉनवरून खरेदी करणे महाग होईल. मात्र, हा नियम सर्व ग्राहकांना लागू राहणार नाही. जे ग्राहक इन्स्टंट बँक डिस्काऊंट म्हणजेच आयबीडी वापरतात, म्हणजेच जर बँक ऑफरद्वारे पेमेंट करतील त्यांना हे अतिरिक्त शुल्क द्यावे लागतील.

### देशातील १७ राज्यांमध्ये पावसाची शक्यता

**नवी दिल्ली** : देशातील १७ राज्यांमध्ये पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामध्ये बिहार, छत्तीसगड, झारखंड, पश्चिम बंगाल, तेलंगणा, कर्नाटक, आंध्र प्रदेश, गुजरात, केरळ आणि ईशान्य राज्यांचा समावेश आहे. गेल्या २४ तासांत ओडिशात वेगवेगळ्या ठिकाणी पाऊस, वादळ आणि वीज कोसळल्याने किमान दोन जणांचा मृत्यू झाला आहे. इतर ६७ जण जखमी झाले आणि ६०० हून अधिक घरांचे नुकसान झाले. हवामान विभागाने म्हटले आहे की, पुढील २४ तासांत जगतसिंगपूर, कटक, ढेंकनाल, अंगुल, देवगड आणि सुंदरगड जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि गारपिटीची शक्यता असून जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे.

## ७० वर्षांनंतर नक्षलगडात पोहोचला प्रकाश

◆ **रायपूर, २३ मार्च**

तिमेनार हे बिजापूर जिल्ह्यातील घनदाट जंगलात वसलेले एक गाव. स्वातंत्र्यानंतरही विकासापासून कोसो दूर. ना रस्ते ना विजेची सोय. त्यातच गावावर नक्षलवादाचा पगडा. गावकऱ्यांना अंधारात ठेवत त्यांच्या अज्ञानाचा फायदा नक्षलवाद्यांनी घेतला. पण, छत्तीसगड सरकारच्या मुख्यमंत्री मांजरा-टोला विद्युतीकरण योजनेंतर्गत तब्बल ७७ वर्षांनंतर तिमेनार गावात विजेचे दिवे पेटले. सारे गाव आनंदात न्हावून निघाले.

गेल्या अनेक दशकांपासून छत्तीसगडमधील बस्तर क्षेत्रात नक्षलवादाने थैमान घातले. अनेक गावे विकासापासून कोसो दूर राहिली. तिमेनार गावात प्रकाश पोहोचणे म्हणजे बस्तर क्षेत्रातील दुर्गम गावांमध्ये विकासाच्या नव्या पर्वाचा प्रारंभ आहे. विकासाची ही प्रक्रिया म्हणजे नक्षलवादाचा अंत होय, असे उद्गार मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी काढले.

**आमची मुले आता मुक्तपणे अभ्यास करू शकतील**

गावात विजेचे दिवे सुरू झाल्याने आता आम्हाला अंधाराची भीती उरणार नाही तसेच रात्रीच्या वेळी जंगली प्राणी, सापापासून धोका राहणार नसून, आमची मुले मुक्तपणे अभ्यास करू शकतील, असे गावकरी म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# जामा मशिदीचा प्रमुख ताब्यात

**संभल हिंसाचार प्रकरण** | **जफर अलीची एसआयटीकडून चौकशी**

◆ **संभल, २३ मार्च**

संभल येथील हिंसाचार प्रकरणात जामा मशिदीचा प्रमुख जफर अली याला एसआयटी पथकाने त्याच्या घरातून रविवारी सकाळी ताब्यात घेतले. त्याला पोलिस ठाण्यात आणून चौकशी केली जात आहे. जफर अलीचे घर मशिदीपासून १०० मीटर अंतरावर आहे हे विशेष.

पोलिस उपअधीक्षक अनुज कुमार तोमर यांनी सांगितले की, मागील वर्षी २४ नोव्हेंबर रोजी जामा मशिदीच्या प्रकरणावरून झालेल्या हिंसाचारात चौकशी करण्यासाठी मशिदीचे प्रमुख जफर अली यांना एसआयटीने ताब्यात घेतले. त्याचा याप्रकरणी जबाब नोंदविण्यात येणार आहे. सध्या खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी जामा मशिदीबाहेर मोठ्या संख्येने पोलिस, पीएसी आणि आरएएफ तैनात केले आहे.

यापूर्वी, हिंसाचाराच्या एक दिवसानंतर २५ नोव्हेंबर रोजी पोलिसांनी जफरला ताब्यात घेतले होते आणि त्याची चौकशी केली होती. संभल हिंसाचारात आतापर्यंत पोलिसांनी तीन महिलांसह ७९ गुन्हेगारांना अटक करून तुरुंगात पाठवले आहे. अद्याप कोणालाही जामीन मिळालेला नाही. न्यायमूर्ती नारायण राय यांनी आतापर्यंत १३० जामीन याचिका फेटाळल्या आहेत. हिंसाचारात चार जणांचा मृत्यू तर अनेक पोलिस जखमी झाले होते. ◂(वृत्तसंस्था)

# नागपूर संचारबंदीतून मुक्त

**प्रभावी गस्त कायम राहणार | पोलिस आयुक्तांनी जारी केला आदेश**

◆ **नागपूर, २३ मार्च**

नागपुरातून कधी उठेल संचारबंदी, असा एकच प्रश्न व्यापाऱ्यांसह नागरिकांना सतावत होता. बाजारपेठा बंद असल्याने व्यापाऱ्यांचे कोट्यवधींचे नुकसान, तर नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. या संपूर्ण बाबीचा विचार करता कोतवाली, तहसील, गणेशपेठ आणि यशोधरानगर ठाण्यांच्या हद्दीतील संचारबंदी रविवारी पूर्णपणे उठविण्यात आली. पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी दुपारी ३ वाजतापासून संचारबंदी उठविण्याचा आदेश जारी केला. त्यामुळे व्यापाऱ्यांसह स्थानिक नागरिकांना आणि शहरवासीयांना दिलासा मिळाला आहे. संचारबंदी उठविण्यात आली असली, तरी संवेदनशील भागांमध्ये पोलिसांचा कडक बंदोबस्त कायम राहणार आहे.

१७ मार्च रोजी रात्री महाल परिसरात दंगल झाल्यानंतर शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस आयुक्तांच्या आदेशाने कोतवाली, तहसील, गणेशपेठ, लकडगंज, पाचपावली, शांतीनगर, सक्करदरा, इमामवाडा, यशोधरानगर, नंदनवन आणि कपिलनगर या ११ ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लावण्यात आली होती. दरम्यान, स्थानिक स्थितीचा विचार करून सार्वजनिक हिताच्या दृष्टीने व कायदा-सुव्यवस्था बघता नंदनवन आणि कपिलनगर हद्दीतील संचारबंदी उठविण्यात आली. मध्यंतरी पाच ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी दोन तास शिथिल करण्यात आली. २२ मार्च रोजी पोलिस आयुक्त सिंगल यांनी स्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर पाचपावली, शांतीनगर, लकडगंज, सक्करदरा, आणि इमामवाडा या पाच ठाण्यांतर्गत असलेली संचारबंदी पूर्णपणे हटविली. मात्र, कोतवाली, तहसील, गणेशपेठ या तीन ठाण्यांच्या हद्दीत केवळ तीन सात शिथिल करण्यात आली होती. ◂(तभा वृत्तसेवा)



संचारबंदी हटविल्यानंतर पोलिसांनी महाल परिसरात गस्त घातली

### व्यापाऱ्यांसह नागरिकांना मोठा दिलासा

महाल, गांधीबाग, इतवारी परिसरात मोठ्या बाजारपेठा आहेत. सराफा व्यापाऱ्यांची दुकाने आहेत. प्रतिष्ठाने, रेस्टॉरंट्स, धान्य, सायकल आणि कपड्यांच्या ठोक विक्रेत्यांशिवाय खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या कंपन्या आणि बेकरी आहेत. येथून पॅकबंद वस्तूंचा शहरातील लहान दुकानदारांना पुरवठा केला जातो. मात्र, मागील सात दिवसांपासून संचारबंदीमुळे व्यापार ठप्प होता. इतर दिवशी जिथून दुचाकी काढणे कठीण जाते, त्या परिसरात शुकशुकाट होता. कोट्यवधींचा व्यवसाय बुडत होता, दुसरीकडे कुटुंबाला जगविण्यासाठी मजूर वर्गाला संघर्ष करावा लागत होता. या सर्व बाबींचा विचार करून आणि स्थानिक परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर पोलिस आयुक्तांनी या चारही भागांतील संचारबंदी पूर्णपणे उठविण्याचा आदेश जारी केला.

# लाडकी बहिण योजना फक्त गरजू महिलांसाठी

## अजित पवार : मूलभूत प्रश्न सोडविल्यानंतर २१०० रुपयांबाबत निर्णय

**मुंबई** : २१०० रुपये देणार होते, त्याचं काय झाले? असे काही लोक विचारत आहेत, त्यांना म्हणावे, म हायुतीने शब्द दिला आहे. पाच वर्षांचं सरकार आहे. मुलभूत प्रश्न सोडवल्यानंतर परिस्थितीनुरुप निर्णय घेतले जातील. काहीजण म्हणत होते की योजना बंद होईल. पण महिलांनो, लाडक्या बहिणींनो ही योजना गरीब महिलांकरिता आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून या योजनेतील पात्र महिलांची छाननी केली जात असून तक्रारी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यात येणार असल्याची भूमिका सरकारची आहे. यामध्ये कोणत्या निकषांतर्गत महिलांना अपात्र ठरवण्यात येणार याबाबत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे. ज्यांना आर्थिक परिस्थिती चांगली असतानाही पैसे दिले गेले ते परत घेणार नाहीत.




### गरजू महिलांचे निकष काय?

असं सांगत असतानाच लाडक्या असलेल्या गरजू महिला नक्की कोण? याबाबत आज अजित पवारांनी स्पष्ट केलं. ते म्हणाले, ज्या महिलांचं वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजाराच्या आत आहे, कुरपण करणारी, धुणीभांडी करणारी, झाडू पोछा करणारी, झोपडपट्टीत कष्टाचं जीवन जगणारी, निराधार महिलांना या योजनेसाठी पात्र आहेत. तसंच, ज्यांना त्यांची मुलं, मुली, सुना, जावई सांभाळत नाहीत, अशांना ही योजना आहे. त्यांचीही संख्या मोठी आहे, असं अजित पवारांनी स्पष्ट केलं.

रक्षाबंधन आणि भाऊबीजेची ओवाळणी दिली. होळीच्या निमित्ताने तीन हजार रुपये दिले. आदिती तटकरेंचाही या योजनेसाठी पाठपुरावा सुरू आहे. इतरही योजनांना न्याय देण्याचं काम महायुती सरकारचे आहे, असे अजित पवार म्हणाले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील पात्र महिलांना २१०० रुपये देणार असल्याचं महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यात सांगितलं होतं. तसंच, अर्थसंकल्पात वाढीव रक्कमेची घोषणा केली जाईल, असंही त्यांनी कबुल केलं होतं. परंतु, आता अधिवेशन सुरू असतानाही त्याची अद्याप घोषणा झालेली नाही. तसंच, याच अर्थसंकल्पात घोषणा केली जाईल, असं कोणीही म्हणालं नसल्याचं सरकारने म्हटलं आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून या योजनेतील पात्र महिलांची छाननी केली जात असून तक्रारी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यात येणार असल्याची भूमिका सरकारची आहे. यामध्ये कोणत्या निकषांतर्गत महिलांना अपात्र ठरवण्यात येणार याबाबत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली आहे.

### डोडात अतिरेक्यांचा अड्डा उद्ध्वस्त

**जम्मू** : जम्मू-काश्मीरच्या डोडा जिल्ह्यातील दुर्गम भागात असलेला अतिरेक्यांचा अड्डा सुरक्षा दलांनी उद्ध्वस्त केला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी रविवारी दिली. स्थानिक पोलिसांचे विशेष कारवाई पथक आणि लष्कराच्या जवानांनी भदेरवाहच्या भालरा वनपरिक्षेत्रात शनिवारी ही कारवाई केली. येथून पिस्तूल, तीन मॅग्झिन्स, सहा काडतुसे, एके रायफलीची २५ काडतुसे जप्त करण्यात आली. या प्रकरणी कुणालाही अटक करण्यात आली नाही. परिसरात संशयास्पद हालचाली असल्याची गुप्तचर माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

# राज्यस्तरीय स्पर्धेत जिव्हाळा मतिमंद शाळेचा कृष्णा शिंदे राज्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२३ मार्च**

दिव्यांग कल्याण विभाग महाराष्ट्र शासन, दिव्यांग कल्याण आयुक्तालय क्रीडा संचनालय, पुणे, स्व. प्रभाकराव दटके स्मृती सेवा संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा दि. २१ मार्च ते २३ मार्च दरम्यान नागपूर येथे पार पडल्या. या स्पर्धेमध्ये राजीव स्मृती बहुउद्देशिय संस्था संचलित जिव्हाळा मतिमंद मुलांची शाळा बार्शी या शाळेतील विद्यार्थी कृष्णा शशिकांत शिंदे याने १३ ते १६ वयोगटात स्पॉट जंप या क्रीडा प्रकारात राज्यात प्रथम क्रमांक पटकावला.

क्रीडाशिक्षक महादेव शिनगारे यांचे त्याला मार्गदर्शन लाभले. संस्था अध्यक्ष अरुण बारबोले, संस्था पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, कर्मचारी वृंद यांनी मिळालेल्या यशाबद्दल सत्कार करुन अभिनंदन केले.




# चेन्नईने मुंबईचा ४ विकेट्सने केला पराभव; नूर अहमदचे ४ बळी

**चेन्नई** : आयपीएल-२०२५ च्या तिसऱ्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने मुंबई इंडियन्सचा ४ विकेट्सने पराभव केला. मुंबई संघाने सलग १३ व्या हंगामात पहिला सामना गमावला आहे. संघाने शेवटचा सामना २०१२ मध्ये राजस्थानविरुद्ध जिंकला होता.

चेपॉक स्टेडियमवर, चेन्नईने १५६ धावांचे लक्ष्य १९.१ षटकात ६ गडी गमावून पूर्ण केले. त्यांच्याकडून कर्णधार ऋतुराज गायकवाड (५३ धावा) आणि रचिन रवींद्र (नाबाद ६५) यांनी अर्धशतके झळकावली. रवींद्र जडेजाने १७ धावांचे योगदान दिले. मुंबईकडून पदार्पण करणाऱ्या विघ्नेश पुथूरने ३ विकेट्स घेतल्या. दीपक चहर आणि विल जॅक्स यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. तत्पूर्वी, नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी केल्यानंतर मुंबईने २० षटकांत ९ गडी गमावून १५५ धावा केल्या. तिलक वर्माने ३१, कर्णधार सूर्यकुमार यादवने २९ आणि दीपक चहरने नाबाद २८ धावा केल्या. नूर अहमदने ४, तर खलील अहमदने ३ विकेट घेतल्या.

# वाघ्या कुत्र्याची समाधी रायगडावरुन ३१ मे पर्यंत हटवा

### छत्रपती संभाजीराजेंचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**कोल्हापूर** : ऐतिहासिक संदर्भ नसलेल्या, पुरावे नसलेल्या वाघ्या कुत्र्याची समाधी रायगड किल्ल्यावरुन ३१ मे पर्यंत हटवण्यात यावी अशी मागणी माजी खासदार आणि रायगड विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी केली आहे. तसे एक पत्रच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिले आहे.

हिंदवी स्वराज्याची राजधानी दुर्गराज रायगड येथे श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत कथित वाघ्या कुत्र्याची समाधी म्हणून एक संरचना काही दशकांपूर्वी उभारण्यात आलेली आहे. सदर वाघ्या कुत्रा नामक पात्राचा शिवकालीन इतिहासात कोणत्याही प्रकारचा उल्लेख अथवा संदर्भ मिळत नाही. भारतीय पुरातत्व विभागाने देखील सदर समाधी संरचना व वाघ्या कुत्र्याचे ऐतिहासिक महत्त्व यांबाबत त्यांच्याकडे कोणतीही ऐतिहासिक माहिती व पुरावे उपलब्ध नसल्याची स्पष्टोक्ती दिलेली आहे. समस्त भारतवासीयांचे श्रद्धास्थान असणाऱ्या श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीलगत एका कपोलकल्पित कुत्र्याची समाधी व पुतळा उभारणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव, श्रद्धेची कुचेष्टा व महान युगप्रवर्तक श्री छत्रपती शिवाजी महाराजांची घोर प्रतारणा आहे.

कोणतीही ऐतिहासिक पार्श्वभूमी व महत्त्व नसलेली सदरील वाघ्या कुत्रा समाधी नामक संरचना हे दुर्गराज रायगडवरील अतिक्रमण असून राज्य शासनाच्या धोरणानुसार दि. ३१ मे २०२५ अखेरीपर्यंत हे अतिक्रमण कायमस्वरूपी हटविण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## संक्षिप्त वृत्त



### सांगोल्यातील माणदूत एक्सप्रेस परिवाराकडून इफ्तार पार्टी संपन्न

**सांगोला,दि.२३ मार्च-**

सांगोल्यातील माणदूत एक्सप्रेस परिवाराकडून शनिवार दि.२२ मार्च रोजी रमजानच्या पार्श्वभूमीवर इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांचे स्वागत माणदूत एक्सप्रेसचे मोहन मस्के यांनी केले. यावेळी रफिकभाई तांबोळी, बशीरभाई तांबोळी यांनी पवित्र रमजान महिन्याचे महत्त्व विशद केले. तहसीलदार संतोष कणसे यांनी मनोगतात मुस्लिम धर्मियांच्या पवित्र रमाजन निमित्तान होणारी 'इफ्तार पार्टी' म्हणजे हिंदू मुस्लिम एकतेचं प्रतीक आहे. अशा प्रकारे हिंदु-मुस्लीम एकतेचे प्रतीक असलेले कार्यक्रम घेण्याची सध्या नितांत गरज आहे. सामाजिक सलोखा कायम ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा हीच गरज ओळखून माणदूत एक्सप्रेसच्या वतीने घेण्यात आलेला इफ्तार पार्टीचा कार्यक्रम स्तुत्य आहे. यापुढे ही परंपरा कायम राखावी असे मत व्यक्त केले. विनायक मस्के, सुनिल मस्के, अमेय मस्के, अशोक लोंढे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास रमेशआण्णा देशपांडे यांच्यासह मित्रपरिवारांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी शहर व परिसरातील मुस्लीम समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विवाहितेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २३ मार्च -**



घरगुती कारणावरून विवाहितेने सडा मारण्याचा विषारी पिवळा रंग प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सुनंदा अंबादास गडगी (वय ४३, रा. भारतरत्न इंदिरा नगर, ७० फुट रोड, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. २३ मार्च रोजी सकाळी ११ च्या सुमारास सुनंदा गडगी यांनी राहत्या घरी घरगुती कारणावरून अंगणात सडा मारण्याचा पिवळा रंग प्राशन केला. त्यामुळे गडगी यांना त्रास होऊ लागल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मराठा सेवा संघ अक्कलकोट पंचायत समिती शाखा अध्यक्षपदी राहुल शिंदे

**अक्कलकोट दि .२३ मार्च**



मराठा सेवा संघ जिल्हा परिषद शाखा अंतर्गत पंचायत समिती शाखा अध्यक्ष म्हणून अक्कलकोट पंचायत समिती शाखा अध्यक्षपदी - शिवश्री राहुल शिंदे यांची निवड नुकतीच करण्यात आली आहे . ही निवडपुढील ३ वर्षासाठी करण्यात आली आहे. मराठा सेवा संघ अक्कलकोट अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राहुल शिंदे यांचा वटवृक्षस्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला . याप्रसंगी प्रथमेश इंगळे श्रीशैल गंवडी पिंटू पवार संजय पवार चंद्रकांत सोनार आदि उपास्थित होते.



### कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी यशाची भूक महत्त्वाची

**बार्शी, दि. २३ मार्च**

सध्याच्या काळात जीवनामध्ये शेकडो विविध संधी उपलब्ध असून कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी प्रत्येकाकडे यशाची तीव्र भूक असल्यास जीवनात नक्की यश मिळते, असे प्रतिपादन प्रशालेचे माजी विद्यार्थी मुळ आगळगावचे व सद्यस्थितीत नवी मुंबई येथे सीनियर पोलीस निरीक्षक म्हणून कार्यरत असलेले अजय गरड यांनी केले. विद्यालयातील विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी काय करावे यासाठी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी विद्यालयातील कुस्ती स्पर्धेत तालुकास्तर व जिल्हास्तरावर यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन उकिरडे यांनी केले. ते पुढे म्हणाले की विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात कोणत्याही विषय समजून घेताना शिक्षकांशी विविध विषयावर चर्चा करून शालेय विषयासह इतर अनेक गोष्टी समजून घ्या आणि जास्तीत जास्त ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न करावा. यावेळी श्री. सचिन उकिरडे, एम.पी. नाईकनवरे, पी.एम. शिंदे, ए.एस.टोपे, एस. सी. बचुटे, एस.एम. मिरगणे, एन.बी. कोळेकर, पी.डी. माने, एस.डी. मोरे, एस.एम.अवतार, आर. डी. गरड, सी. पी. दोडमणी आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. एम. मिरगणे यांनी केले.

### श्रीपतपिंपरी येथील सार्वजनिक वाचनालयात हुतात्मा दिन

**बार्शी, दि.२३ मार्च-**

श्रीपतपिंपरी (ता.बार्शी) येथील शहिद भगतसिंग सार्वजनिक वाचनालयात हुतात्मा दिन साजरा करण्यात आला. शहीद भगतसिंग, राजगुरु, व सुखदेव या थोर हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी श्रीकांत ताकभाते होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कमलाकर पवार उपस्थित होते. मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. ग्रंथपाल जनार्धन कदम यांनी प्रास्ताविक केले. यावेळी गावातील वाचक, हितचिंतक व ग्रामस्थ उपस्थित होते. सेवक रोहीदास लंकेश्वर यांनी आभार मानले.

# शिवकालीन जल नीतीचा अवलंब केल्यास महाराष्ट्र सुजलाम सुफलाम होईल

**जागतिक जल दिनी जलजागर**

### शिवचरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

छत्रपती शिवाजी महाराज किल्ले बांधण्यापूर्वी तलाव निर्माण करायचे, किल्ल्यात जल नियोजन झाले की पुन्हा विहिरीही निर्माण करायचे. यानंतरच त्यांनी रायगड, राजगड उभारणी केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक धरणे बांधली. शेतकऱ्यांना आत्मविश्वास दिला, अंभी ओढा, सलोभा धरण हे शिवकालीन उत्तम जल नियोजन सांगते, मोठे दगड फोडून तलाव निर्माण केले. ते दगड किल्ला बांधणीसाठी वापरले. अशी दूरदृष्टी



असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवकालीन जल नीतीचा अवलंब केल्यास महाराष्ट्र सुजलाम सुफलाम होईल, असे प्रतिपादन शिवचरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे यांनी व्यक्त केले.

जागतिक जल, वन व हवामान दिनाच्या औचित्याने सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय ड्रीम फाउंडेशन व बसव संगम शेतकरी गटतर्फे जल जागृती कार्यशाळा उत्साहात पार पडली. यावेळी ते बोलत होते. उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विविध शाळा महाविद्यालयाचा उत्स्फर्तपणे सहभाग होता.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख वक्ते शिवचरित्रकार डॉ. शिवरत्न शेटे, कृषी विभागाचे माळी, माजी सैनिक संघटना जिल्हा प्रमुख अरुण तलिखेडे, पक्षीतज्ञ मुकुंद शेटे, फिजिक्सवाला संचालक फंडे, श्रीनिवास काटवे, संगीता भतगुणकी आदी उपस्थित होते. जल है तो कल है,पाणी वाचवा जीवन वाचवा, पाणी हेच जीवन आहे असा पोस्टर संदेश देऊन या कार्यशाळेला सुरूवात झाली. प्रास्ताविक व सूत्रसंचालन संयोजक काशीनाथ भतगुणकी यांनी केले आभार संगीता भतगुणकी यांनी मानले. या कार्यशाळेत विविध शाळांच्या मुलांचा सहभाग होता.

**सर्वांनी जलसाक्षर बनावे**

पाणी ही काळाची गरज ओळखून सर्वांनी जल साक्षर बनावे, सोलापूर जिल्ह्यातील पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी नियोजन खूप महत्त्वाचे असून, लोकांनी जल जागृती उपक्रम तून प्रेरणा घेऊन पाण्याचा वापर केल्यास सर्वांना मुबलक पाणी मिळेल. शेतकरी, उद्योग, इतर वापरासाठी पाणी बचत करणे गरजेचे आहे.

**- अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी, सोलापूर**

# सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनासंबंधी कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च -**

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारातील नियोजन भवनात आयोजित ओ पी एस, एन पी एस व सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना संबंधी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत जिल्ह्यातून कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन अमृत नाटेकर निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या हस्ते झाले. त्यांनी या कार्यशाळेचे महत्व सांगताना पेन्शन संबंधी विकल्प देण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या शंकांचे निरसन होण्यास मदत होईल व विकल्प देण्यासाठी निश्चित मदत होईल असं सांगून कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल संघटनेचे कौतुक केले. प्रमुख अतिथी कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे सरचिटणीस अशोक इंदापुरे यांनी नवीन पेंशन योजनेत अनेक त्रुटी असल्याचे संघटनेने शासनाच्या निदर्शनास सांगितले. संघशक्तीच्या जोरावर शासनास कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी निर्णय घेण्यास भाग पाडले. त्यामध्ये प्रामुख्याने एक नोव्हेंबर २००५ नंतर शासन सेवेत लागलेल्या कर्मचाऱ्यांचे निधन झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना लागू करण्याचा निर्णय घ्यावा लागला. संघशक्तीच्या बळावर विश्वास ठेवा एकजूट कायम ठेवा, असे आवाहन केले.

कोषाध्यक्ष गणेश देशमुख यांनी पेन्शन लढ्यात शासनाकडे वेळोवेळी झालेल्या बैठकीतील इत्यंभूत माहिती सांगितली. नवीन पेन्शन योजना ते सुधारित राष्ट्रीय पेन्शन योजना हा प्रवास सांगताना केवळ संघशक्तीमुळे जुन्या पेन्शन योजनेच्या धर्तीवर सामाजिक व आर्थिक सुरक्षेची हमी देणारी योजना महाराष्ट्र राज्यालाच नव्हे तर केंद्र शासनाला सुद्धा निर्णय घेण्यास भाग पाडले असे आवर्जून सांगितले. विकल्प देण्याची घाई न करता शासनाकडून राष्ट्रीय सुधारित निवृत्तीवेतन योजने संदर्भातील नियमावली प्रसिद्ध होण्याची वाट पहावी केंद्रशासनाने १९ मार्चला नियमावली प्रसिद्ध केली. त्या धरतीवर राज्य सरकारकडून देखील नियमावली प्रसिद्ध होण्याची आवश्यकता आहे. त्याशिवाय विकल्प अंतिम करणे कर्मचाऱ्यांना शक्य होणार नाही संघटने कडून शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे असे सांगितले.

लेखाधिकारी राहुल सलगर, श्रीमती अश्विनी सुर्वे यांनी माहिती दिली. सूत्रसंचालन राजीव साळुंके यांनी केले. यावेळी सरचिटणीस अमृत कोकाटे, कोषाध्यक्ष नरेश बोनाकृती, कार्याध्यक्ष गजानन गायकवाड, समीर राऊळ, रवी नष्टे, खंडू भोसले, दिनेश पुजारी, विनायक पाटील, मंजुनाथ गायकवाड विजय तिकुटे, दशरथ बनसोडे किशोर सावळे, देविदास शिंदे, आनंद सोनकांबळे, पुंडलिक बनसोडे, बाळू जाधव, जावेद शेख, अमर रिजोरा, महेश बनसोडे, समीर पाटील, नितीन कसबे, पंकज जाधव, प्रतीक शिवशरण यांनी कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. यावेळी दिनेश बनसोडे, अविनाश गोडसे उपस्थित होते. उपाध्यक्ष शंतनू गायकवाड यांनी आभार मानले.



सोलापूर : सोलापूर शहरात रविवारी सकाळी हुतात्मा स्मृती मंदिर सभागृहात राज्यस्तरीय वकील अधिवेशनाचे उदघाटन दीपप्रज्वलनाने न्यायाधीश अभय ओक यांच्या हस्ते झाले.यावेळी अन्य मान्यवर . (छायाचित्र केवल तिवारी)

# समाज उपयुक्त संशोधन हवे : डॉ. शिंदे



**बार्शी, दि. २३ मार्च -**

सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करताना तरुण संशोधकांनी ज्ञानप्राप्तीसाठी सजग असायला हवे, असे मत मराठी भाषा आणि साहित्याचे अभ्यासक डॉ. रमेश शिंदे यांनी व्यक्त केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयाच्यावतीने मराठी, इतिहास, राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र या विषयांच्या पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत ते प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. ए. बी. शेख होते. सध्या कृत्रिम बुद्धिमत्तेसारखे आव्हानाला सक्षमतेने सामोरे जाण्यासाठी प्रामाणिक अभ्यासासह ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या पाहिजेत. चांगला संशोधक घडण्यासाठी श्रवण, वाचन, मनन आणि चिंतनाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. संशोधकांनी प्रामाणिक आणि ध्येयवादी असायला हवे. त्यास संयमाची आणि त्यागाची आवश्यकता असल्याचे मत प्राचार्य डॉ. ए. बी. शेख यांनी मांडले. डॉ. बिरा पारसे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. रविकांत शिंदे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली. याप्रसंगी डॉ. सुशील शिंदे (पंढरपूर), डॉ. किशोर जोगदंड (सोलापूर), डॉ. नामदेव शिंदे (माढा) यांनी संशोधन आणि क्षेत्रभेट प्रकल्प लेखन या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. किशोर गरड यांनी सूत्रसंचालन केले, डॉ. विष्णू वाघमारे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. पंडित लावंड, प्रा. समाधान लोंढे, प्रा. भरत जसाभाटी आदिंनी परिश्रम घेतले.

# श्री शिवाजी महाविद्यालयात कर्मवीर स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्राचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२३ मार्च -**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात कर्मवीर स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्राचे उदघाटन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य ख्यातनाम गझलकार डॉ. दिलीप पांढरपट्टे यांच्या हस्ते झाले. यावेळी आयएएस दिनकरराव जगदाळे, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. शेख, प्राचार्य डॉ. सुग्रीव गोरे, विज्ञान समन्वयक डॉ. आर.आर. कोठावळे, कला समन्वयक डॉ. बी.डी. पारसे, केंद्राचे समन्वयक डॉ. राहुल पालके उपस्थित होते.

या अभ्यासिकेमार्फत तज्ज्ञ व अनुभवी व्यक्तींचे विविध विषयावर मार्गदर्शन होणार आहे. या अभ्यासिकेद्वारे स्वतंत्र अभ्यासिकेची सुविधा, सुसज्ज व अद्ययावत ग्रंथालय, सराव परीक्षांचे आयोजन, यू.पी. एस.सी , एम.पी.एस.सी , एस.सी.सी, आर.आर. बी. कडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना होणार आहे. भाषा विषयांचे मार्गदर्शन करताना वर्णनात्मक पद्धतीने अभ्यास करण्यासाठी टिप्स दिल्या जाणार आहेत. त्याचबरोबर संप्रेषण कौशल्ये विकसित करण्यावर भर असेल. अभ्यासिकेत विश्वकोष, संदर्भ ग्रंथ, स्पर्धा परीक्षेतील अनिवार्य तसेच विविध वैकल्पिक विषयांचे ग्रंथ विपुल आहेत. इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रे तसेच साप्ताहिके उपलब्ध असतात. या अभ्यासिकेमार्फत वर्षभरासाठी विविध विषयांतील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन होणार आहे. मुलाखतीला कसे सामोरे जावे? याबाबत पॅनलकडून मार्गदर्शन होणार आहे. सारांश लेखन, निबंध लेखन व गटचर्चा या घटकांचाही यात समावेश आहे. सामान्य अध्ययन पेपरच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यावर विशेष भर असेल. अभ्यासिकेच्या उद्घाटनप्रसंगी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजर्षी शाहू विधी महाविद्यालय, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, बी. पी. एस. कॉमर्स कॉलेज, शं. निं. अध्यापक विद्यालय, बार्शी, कृषी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# श्रीराम बहुउद्देशीय संस्थने केले श्रीरामाच्या १०१ मूर्तींचे वाटप

**तभा वृतसेवा**
**अक्कलकोट, दि.२३ मार्च -**

एक गाव एक मूर्ती हे धेय उराशी बाळगून तालुक्यातील प्रत्येक गावाला प्रभू श्री रामचंद्रांची एक मूर्ती भेट देण्याचा संकल्प येथील श्रीराम बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने केला होता. त्यानुसार संस्थापक अध्यक्ष ऋषिकेश लोणारी (कोळी) यांच्या पुढाकारातून तालुक्यातील गावांना प्रभू श्रीरामचंद्रांच्या १०१ मुर्तींचे वाटप करण्यात आले.



येथील प्रियदर्शनी कार्यालयात विरक्त मठाचे म.नि.प्र.बसवलिंग महास्वामीजी, समाधी मठाचे वे.शा.सं.अण्णू महाराज, कुरनूरचे प.पू.आबा महाराज यांच्या हस्ते मूर्तींचे वाटप झाले. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, प्रथमेश इंगळे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, माजी नगरसेवक मिलनदादा कल्याणशेट्टी, माजी उपनगराध्यक्ष दिलीप भाऊ सिध्दे, माजी उपनगराध्यक्ष यशवंत तात्या धोंगडे, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख संजय देशमुख, माजी उपनगराध्यक्ष महेश हिंडोळे, आरपीआय तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे, उद्योगपती विलास कोरे, सोलापूरचे माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगांवकर, कोळी महासंघ युवा आघाडीचे सोलापूर जिल्हाध्यक्ष विश्वनाथ प्याटी, उद्योजक स्वामीनाथ हिप्परगी, आपुलकी सामाजिक संस्थेचे अध्यक्ष उद्योगपती विशाल राठोड, ज्येष्ठ स्वयंसेवक गुरुलिंग यळमेली, शिवप्रेमी तम्मा मामा शेळके, मल्लम्मा पसारे, सुरेखा होळीकट्टी, आरती काळे, समर्थ नगरच्या सरपंच जयश्री पाटील, माजी मुख्याध्यापिका उषा हंचाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना कोळी महासंघ पश्चिम महाराष्ट्र प्रमुख अरुणभाऊ लोणारी (कोळी) यांनी माझे आई वडील विठ्ठल-लक्ष्मी यांच्या आशीर्वादाने व त्यांनी दिलेल्या संस्कारातून प्रभू श्रीरामचंद्रांची सेवा करतो. बंधू ऋषिकेश लोणारी (कोळी) यांनी संस्थेची स्थापना करून आजपर्यंत प्रभू श्रीरामचंद्र यांच्या सेवेत अनेक उपक्रम राबविले आहेत. यंदाचा श्रीराम नवमी सोहळा तालुक्यातजल्लोषात साजरा व्हावा या उद्देशाने संस्थेच्या वतीने एक गाव एक मूर्ती वाटप हा उपक्रम आज येथे राबवला आहे. सर्व मान्यवरांचा तसेच मूर्तिकार मल्लिकार्जुन कुंभार, अक्षय सोमवंशी, संतोष सुतार यांचाही शाल, पुष्पगुच्छ, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी श्रीराम संस्थेचे कार्यकर्ते संतोष वगाले सर, संदीप कटकधोंड, सौरभ हळके, राहूल वाडे, शिवराज तडवळकर उपस्थित होते.

# जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे मोफत ॲम्बुलन्सचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२३ मार्च -**

नाणीजधाम (रत्नागिरी) येथील जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे अपघातग्रस्तांसाठी मोफत म्बुलन्सचे लोकार्पण नुकतेच झाले. बार्शी शहराजवळील प्रभात हॉटेल बायपास चौक येथे झालेल्या या कार्यक्रमाप्रसंगी डॉ. बी. वाय. यादव, बाजार समितीचे प्रशासक विजय राऊत, माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, आसिफ तांबोळी, नागेश अक्कलकोटे यांच्यासह संप्रदायातील भक्त, शिष्यगण व पदाधिकारी उपस्थित होते. प्रारंभी संस्थानच्या सामाजिक उपक्रमाची



चित्रफीत मान्यवरांना दाखवण्यात आली. यावेळी संस्थानच्या कार्याची माहिती देण्यात आली. राज्यात हायवेवर होणाऱ्या अपघातात क्षतिग्रस्त झालेल्या अपघातग्रस्तांसाठी संस्थानच्या माध्यमातून ५३ ॲम्बुलन्स कार्यरत आहेत. या ॲम्बुलन्समुळे गेल्या १२ वर्षांमध्ये सुमारे २५ हजार रुग्णांना जीवदान मिळाले आहे. रक्तादन शिबीरातून यंदा ५ ते १९ जानेवारीच्या दरम्यान १ लाख ३६ हजार २७० रक्तकुपिकांचे संकलन करुन महाराष्ट्र शासनाच्या रक्तपेढीस सदर रक्त पुरविले गेले. त्याचप्रमाणे मरणोत्तर देहदान या समाज उपयोगी उपक्रमाच्या माध्यमातून ५६ हजार भाविकांनी मरणोत्तर देहदानाचे फॉर्म भरुन दिले आहेत. त्यापैकी आज अखेर ८८ देह शासकीय मेडिकल कॉलेजला सुपूर्द केले आहेत. निराधार महिला, पूरग्रस्तांना संस्थानातर्फे मदत केली आहे. कुंभमेळ्यात नाशिक व प्रयागराज येथे अनुक्रमे गोदावरी व गंगा नद्यांची स्वच्छता संप्रदायाच्या माध्यमातून केली आहे. तसेच कुंभमेळ्यामध्ये रुग्णांच्या सेवेसाठी मोफत हॉस्पिटलची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. स्वस्वरुप संप्रदायाच्या सर्व पीठावर दोन्ही वेळचा महाप्रसाद भाविकांना मोफत दिला जातो. अशा अनेक समाज उपयोगी सेवेच्या माध्यमातून तुम्ही जगा दुसऱ्याला जगवा या जगद्गुरुश्रींच्या संदेशाचे प्रत्यक्ष आचरण स्वस्वरुप संप्रदायाचे माध्यमातून होत असल्याचे सांगितले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी जगद्गुरुश्रींच्या भक्त शिष्यांचे कौतुक केले. संप्रदायाचे माध्यमातून होत असलेल्या कार्याला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

**ॲम्बुलन्सची सेवा विनामूल्य**

जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्यावतीने त्यांच्या ठिकठिकाणच्या अशा ॲम्बुलन्सद्वारे हायवेवर होणाऱ्या अपघातातील जखमींना जवळच्या रुग्णालयात नेले जाते. ही सेवा विनामूल्य आहे. नागरिकांनी ८८८८२६३०३० या हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# इस्रायलच्या हल्ल्यात हमासचा नेता ठार

### हुथी बंडखोर लक्ष्य, येमेनवर वाढविले हवाई हल्ले

◆ **तेल अवीव, २३ मार्च**

युद्धबंदी कराराच्या पुढील टप्प्यावर चर्चा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या दहशतवादी हमासच्या ठिकाणांवर इस्रायलकडून जोरदार हल्ले सुरू आहेत. गाझा पट्टीत रविवारी करण्यात आलेल्या हवाई हल्ल्यात हमासचा वरिष्ठ राजकीय नेता सलाह बर्दाविल ठार झाला. हमासच्या प्रवक्त्याने यासंदर्भात पुष्टी केली.

इस्रायलच्या लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, हमासशी संलग्न असलेल्या येमेनमधील इराण समर्थित हुथी बंडखोरांनी रविवारी इस्रायलवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागले. इस्रायली हवाई दलाने क्षेपणास्त्राला हवेतच नष्ट केले. त्यामुळे यात कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही. प्रत्युत्तरात इस्रायलच्या वायूसेनेने दक्षिणेकडील खान युनिस शहराजवळ हवाई हल्ले केले. हमासच्या प्रवक्त्याने यावर सांगितले की, इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यात पॅलिस्टिनी संसदेचे सदस्य सलाह बर्दाविल आणि त्यांच्या पत्नीचा मृत्यू झाला.



इस्रायलच्या हवाई दलाने गाझात केलेल्या हवाई हल्ल्याचे दृश्य

बर्दाविल यांनी हमासला समर्थन दिले होते आणि त्यांनी यासंदर्भात अनेकदा मुलाखती दिल्या होत्या. दरम्यान इस्रायलने गाझा पट्टीत पुन्हा सुरू केलेल्या कारवाईला प्रत्युत्तर म्हणून इराण समर्थित हुथी बंडखोरांनी लाल समुद्रातील शिपिंग मार्गांवर हल्ले करण्याची धमकी दिली होती. यानंतर काही दिवसांनी येमेनमधील हुथींच्या ताब्यातील भागातून इस्रायलवर जलद हल्ले केले जात आहेत. या हल्ल्याला इस्रायलकडून जोरदार प्रत्युत्तर दिले जात आहे. (वृत्तसंस्था)

### येमेन विमानतळावर अमेरिकेचा हल्ला

येमेनमधील होदेइदाह शहरातील विमानतळावर अमेरिकेने शनिवारी रात्री तीन हल्ले केले, असे अमेरिकन वायुदलाकडून सांगण्यात आले. याशिवाय उत्तरेकडील सादा प्रांतातील सहार, कताफ जिल्हा आणि मध्य प्रांतातील मारिबवर शहरावर हवाई हल्ले केले. या हल्ल्यात हुथी नौदलचा कमांडर मन्सूर अल सादी जखमी झाला तसेच अनेक हुथी बंडखोर ठार झाले. जोपर्यंत हुथी बंडखोर महत्त्वाच्या सागरी कॉरिडॉरमधून प्रवास करणाऱ्या मालवाहू जहाजांवरचे हल्ले थांबवत नाही, तोपर्यंत हवाई हल्ले सुरूच राहणार असल्याचे अमेरिकन वायुदलाने म्हटले आहे.

### हुथींना सोडणार नाही : ट्रम्प

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष टोनाल्ड ट्रम्प यांनी स्वतःच्या समाज माध्यम खात्यावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्टटले की, आमचे शूर सैनिक जलवाहतुकीचे संरक्षण करण्यासाठी दहशतवाद्यांना लक्ष्य करीत आहे. त्यांच्या संरक्षण प्रणालींवर हवाई हल्ले केले जात आहेत. जोपर्यंत व्यापारी जहाजांवरील हल्ले थांबविले जाणार नाही आणि जलमार्गाची सुरक्षा सुनिश्चित होत नाही, तोपर्यंत हुथी अतिरेक्यांवर हल्ले सुरूच राहणार आहेत.

# बँकॉकमध्ये नरेंद्र मोदींना भेटायची परवानगी द्या


### मोहम्मद युनुस यांनी घातली गळ

◆ **नवी दिल्ली, २३ मार्च**

बँकॉक येथे होऊ घातलेल्या आगामी बिम्सटेक शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्याची परवानगी द्या, अशी विनंती बांगलादेशातील अस्थायी सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनुस यांनी केली. मात्र, भारताने आतापर्यंत या भेटीची वेळ दिलेली नाही, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी एका संसदीय समितीला सांगितले. हे प्रकरण विचाराधीन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महत्त्वाचे म्हणजे, संसदीय सल्लागार समितीच्या शनिवारी झालेल्या पहिल्या बैठकीत खासदारांनी बांगलादेशातील हिंदू समुदायावरील हल्ल्यांबाबत चिंता व्यक्त केली. या मुद्यावर भारताने उचललेल्या पावलांची माहिती समितीने मागितली.





बांगलादेशात हिंदू समुदायावर झालेले हल्ले राजकीयदृष्ट्या प्रेरित होते. त्या माध्यमातून अल्पसंख्यकांना लक्ष्य करण्यात आले, असे मानले जाऊ नये, असा दावा बांगलादेशातील अस्थायी सरकारने केला असल्याची माहिती जयशंकर यांनी समितीला दिली. जयशंकर यांनी खासदारांना बांगलादेश, म्यानमार आणि श्रीलंकेसोबतच्या संबंधांबाबत माहिती दिली. मात्र, पाकिस्तान आणि चीनबाबत नंतर चर्चा केली जाईल. बैठकीत हे मुद्दे वेगळे उपस्थित करावे, असे सांगितले.

**बिम्सटेकची भूमिका**

बंगालच्या उपसागराच्या चारही बाजूंच्या देशांना बिम्सटेकच्या माध्यमातून एका मंचावर आणले गेले आहे. यात भारताची रणनीती अतिशय महत्त्वपूर्ण आहे. दक्षिण आशियात आर्थिक आणि तांत्रिक सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी बिम्सटेकची स्थापना करण्यात आली. बांगलादेश, भारत, म्यानमार, श्रीलंका, थायलंड, नेपाळ आणि भूतान बिम्सटेकचे सदस्य आहेत. (वृत्तसंस्था)

### पाकिस्तानमुळे सार्क निष्क्रिय

पाकिस्तानच्या वागणुकीमुळे सार्क परिषद निष्क्रिय झाली. त्यामुळे आता भारत बिम्सटेक मजबूत करण्याच्या प्रयत्नात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी २ ते ४ एप्रिल या कालावधीत बँकॉक येथे आयोजित बिम्सटेक परिषदेत सहभागी होऊ शकतात. मात्र, त्यांनी त्यांच्या दौऱ्याबाबत अधिकृत दुजोरा दिला नाही.

# तीन वरिष्ठ तालिबानी नेत्यांवरील बक्षीस रद्द

### अमेरिकन नागरिकाची मुक्तता केल्याने ट्रम्प यांचा निर्णय

◆ **काबुल, २३ मार्च**

जानेवारी २००८ मध्ये काबुलच्या सेरेना हॉटेलवर झालेल्या हल्ल्याची योजना आखल्याची कबुली देणारा आणि अनेक ठिकाणी आत्मघाती हल्ले करून अमेरिकन सैन्याला लक्ष्य करणारा तालिबानी नेता सिराजुद्दीन हक्कानीसह तीन नेत्यांच्या शिरावर ठेवण्यात आलेले १ कोटी डॉलर्सचे बक्षीस अमेरिकेने रद्द केले. नुकतेच तालिबान सरकारने अमेरिकन नागरिकाची सुखरूप मुक्तता केली होती, त्याबदल्यात राष्ट्रध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी हा निर्णय घेतला.

अफगाणीस्तानच्या गृह मंत्रालयाचे प्रवक्ते अब्दुल मतीन कानी यांनी सांगितले की, अमेरिकन सरकारने सिराजुद्दीन हक्कानी, अब्दुल्ल अझीझ हक्कानी आणि याहया हक्कानी यांच्यावरील बक्षीस रद्द केले तसेच त्यांना मोस्ट वाँटेड सूचीतूनही हटविण्यात आले. २००१ मध्ये अमेरिकेने अफगाणिस्तानवर केलेल्या हल्ल्यानंतर हक्कानी बंधुंनी अमेरिकन सैन्याला लक्ष्य करीत आत्मघाती आणि बॉम्ब हल्ले केले होते. यात अमेरिकन दूतावास आणि अफगाण राष्ट्रपती कार्यालयासह इतर प्रमुख ठिकाणांचा समावेश होता. याशिवाय, २००८ मध्ये अफगाणच्या सेरेना हॉटेलवर केलेल्या हल्ल्यात युरोपियन देशातील नागरिकांचा मृत्यू झाला होता. या हल्ल्याची जबाबदारी सिराजुद्दीन हक्कानीने घेतली होती. त्यानंतर अमेरिकेने हक्कानी बंधुंना मोस्ट वाँटेड घेषित करून त्यांच्यावर १ कोटी डॉलर्सचे बक्षीस घोषित केले होते.

अफगाण परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकारी झाकीर जलाली म्हणाले, शुक्रवारी तालिबानने अमेरिकन कैदी जॉर्ज ग्लेझमन यांची सुटका केली, त्याबदल्यात अमेरिकेने हक्कानी बंधुंवरील बक्षीस रद्द केले. या निर्णयामुळे दोन्ही देशांचे द्विपक्षाय संबंध मजबूत होण्यास मदत होणार आहे. (वृत्तसंस्था)



गुजरातच्या सुरत येथे जल शक्ती अभियानाचा भाग म्हणून नायिका ४ कृष्णलीला नाटिकेचे आयोजन करण्यात आले होते. यात सहभागी झालेले कलावंत

# छत्तीसगडमध्ये नक्षल्यांचे दोन अड्डे उद्ध्वस्त

### शस्त्रसाठा जप्त

◆ **सुकमा, २३ मार्च**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात सुरक्षा दलांनी नक्षलवाद्यांचे दोन अड्डे उद्ध्वस्त करीत मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त केला, अशी माहिती पोलिसांनी रविवारी दिली.

गोपनीय माहितीच्या आधारे सुरक्षा दलाच्या वेगवेगळ्या पथकांनी शनिवारी दुलेद सुरक्षा छावणीजवळील मार्कगुडा गावातील जंगल परिसरात एका टेकडीवर आणि मेट्टागुडा गावातील नवीन छावणीजवळील जंगलात माओवाद्यांचे अड्डे शोधून काढले. या कारवाईत जिल्हा पोलिस दल, केंद्रीय राखीव पोलिस दल आणि कोब्राचे जवान सहभागी झाले होते.

या कारवाईत सहा सिंगल बॅरल मझल लोडिंग रायफली, १२ बोअरच्या दोन रायफली, देशी रायफल, बॅरेल ग्रेनेड लाँचरचे २० गोळे, १२ डेटोनेटर्स, स्प्लिंटर्स, कॉर्डेक्स वायर, सेफ्टी फ्युजेस, बीजीएल शेल तयार करण्यासाठी वापरली जाणारी उपकरणे, माओवाद्यांचा गणवेश आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. (वृत्तसंस्था)

# उत्तरप्रदेशच्या धर्तीवर कुंभमेळ्यासाठी कायदा

**नाशिक, २३ मार्च**

उत्तरप्रदेशच्या धर्तीवर नाशिकच्या कुंभमेळ्यासाठी कुंभमेळा प्राधिकरण कायदा आणला जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिली.

नाशिकमधील २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी अपेक्षेपेक्षा कमी वेगाने आहे. पण, आव्हानांवर निश्चितपणे मात करू, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. हा कुंभमेळा श्रद्धा आणि तंत्रज्ञानाचा कार्यक्रम असल्याचे त्यांनी सांगितले. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक त्र्यंबकेश्वर मंदिराचा विकास घडवण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, असे

फडणवीस म्हणाले. कुंभमेळ्याच्या मोठ्या प्रमाणातील कार्यक्रम आयोजित करण्यात येणाऱ्या आव्हानांची कबुली फडणवीस यांनी दिली. या आव्हानांवर मात केली जाईल, असा विश्वास व्यक्त केला. पायाभूत सुविधा उभारण्याचे काम वेळापत्रकानुसार मागे पडले आहे. परंतु, परिस्थिती सुधारत आहे, असे फडणवीस म्हणाले. कुंभमेळ्यासाठी मागील वर्षीपासून आम्ही तयारी सुरू केली. आम्ही हे काम २०२० पासून सुरू केले असते, तर आज आपण अधिक दिलासादायक स्थितीत असतो. फडणवीस यांनी कार्यक्रमात काम करणाऱ्या पथकांच्या कार्यक्षमतेचे श्रेय उलट नियोजन धोरणाचे पालन करीत असल्याचे सांगितले. २०१५ मध्ये नाशिकमध्ये कुंभमेळा झाला होता. तो यशस्वीपणे पार पडला होता. यावेळी आम्ही त्याच प्रकारचे यश मिळवण्याचा प्रयत्न करीत आहोत तसेच नाशिक व त्र्यंबकेश्वरचा विकास घडवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. कुंभमेळा हा श्रद्धा आणि तंत्रज्ञानाचा आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, गर्दी व्यवस्थापन यंत्रणा, ऑग्मेंटेड रिॲलिटी आणि व्हर्च्युअल रिॲलिटी साधनांचे एकत्रीकरण उपस्थितांना एक वेगळाच अनुभव देईल, असे फडणवीस यांनी सांगितले.

# गाडी चालवित मोबाईलवर मॅच बघणारा शिवनेरीचा बसचालक बडतर्फ

### चालक बडतर्फ, खासगी कंपनीला दंड

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि. २३ मार्च-**

बस चालवित असताना प्रवाशांचा जीव धोक्यात घालून मोबाईलवर आयपीएलची क्रिकेट मॅच बघण्याचा एसटीच्या एका शिवनेरी बसचालकाचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बस मधील एका प्रवाशाने त्याचेही बेफिकरीपणाचे कृत्य मोबाईल मध्ये शूटिंग करून परिवहन मंत्र्यांना पाठविले. त्यानंतर खासगी कंपनीच्या संबंधित चालकाला बडतर्फ करून कंपनीला पाच हजाराचा दंड एसटी बस प्रशासनाकडून ठोठावण्यात आला आहे दादर ते स्वारगेट (पुणे) शिवनेरी बस ( एम.एच.१२ व्हीएफ-८०१७) मध्ये शनिवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास बस लोणावळ्याजवळ असताना चाणाक्ष प्रवास्याने त्याचे चित्रण केले.

शनिवारी सायंकाळी ७ वाजता खाजगी ई-शिवनेरी बस दादर येथून निघाली होती. चालक रात्री लोणावळाजवळ बस चालवत क्रिकेट मॅच पाहत असलेले चित्रीकरण संबंधित बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना पाठवले. त्यांनी तातडीने एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना नियमानुसार कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले.त्यानुसार एसटीच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी संबंधित खाजगी संस्थेच्या चालकास प्रवाशांचा जीव धोक्यात घालून बेशिस्त वाहनं चालवल्या प्रकरणी बडतर्फ केले असून संबंधित खाजगी संस्थेला दंड ठोठावला आहे. अशा प्रकारे बेशिस्त वाहन चालवून प्रवाशांचा जीव धोक्यात घालणाऱ्या चालकांच्यावर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रवाशांचा एसटीच्या या प्रतिष्ठित सेवेबद्दल विश्वास दृढ होत जाईल, तसेच भविष्यात एसटीकडे असलेल्या खाजगी बसच्या चालकांना संबंधित संस्थेकडून वेळोवेळी शिस्तबद्ध वाहन चालवण्याचे प्रशिक्षण दिले जाण्याची गरज असल्याचे सांगितले.



> खाजगी अथवा प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा, टॅक्सीचे चालक देखील कानात हेडफोन घालून गाडी चालवत मोबाईलवर मॅच अथवा चित्रपट पाहत असल्याच्या तक्रारी प्रवासी वर्गाकडून येत आहेत. या संदर्भात परिवहन विभागाकडून नवीन नियमावली निश्चित करून निर्बंध आणले जातील.
>
> **- प्रताप सरनाईक (परिवहन मंत्री)**

निवडणूक आयोगाकडून

# क्षमता वाढीसाठी एक कोटी अधिकाऱ्यांना डिजिटल प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २३ मार्च-**

भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त (सीईसी) म्हणून ज्ञानेश कुमार यांनी पदभार स्वीकारल्यानंतर एका महिन्याच्या आत, त्यांच्या नेतृत्वाखाली भारत निवडणूक आयोगाने निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि डॉ. विवेक जोशी यांच्यासोबत संपूर्ण निवडणूक यंत्रणेला बीएलओ स्तरापर्यंत सर्व मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. मुख्य भागधारक असलेल्या राजकीय पक्षांना या बळकटीकरण प्रक्रियेत सामील करुन घेतले जात आहे, अशी माहिती भारत निवडणूक आयोगाने दिली आहे.

१ कोटी निवडणूक कर्मचाऱ्यांच्या व्यापक आणि क्षमतेच्या विकासासाठी एक मोठे पाऊल म्हणून, ४ आणि ५ मार्चला नवी दिल्लीतील 'आयआयआयडीइएम' येथे सर्व राज्य/संघराज्य क्षेत्रांच्या सीईओंचा दोन दिवसीय परिषद घेतली., ज्यामध्ये प्रत्येक राज्य/संघराज्य क्षेत्राच्या डीईओ आणि ईआरओंचा सहभाग होता. या परिषदेत संपूर्ण निवडणूक यंत्रणेला ऊर्जा देण्यासाठी २८ भागधारकांचा आराखडा तयार करण्यात आले, त्यांच्या जबाबदाऱ्या संविधान, निवडणूक कायदे आणि ईसीआयने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार निश्चित करण्यात आल्या.

आयोगाने स्पष्ट केले आहे की, १०० कोटी मतदार लोकशाहीचा आधारस्तंभ आहेत. 'यूआयडीएआय' आणि 'ईसीआय'च्या तज्ज्ञांमध्ये तांत्रिक सल्लामसलत लवकरच सुरू होणार आहे. एक मतदार जरी त्याच्या नियुक्त मतदान केंद्रात मतदान करू शकत असेल, तरी आयोगाने देशभरात ईपीआयसी क्रमांकांमध्ये डुप्लिकेट्स काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. आणि अनेक दशकांपासून चालत आलेली समस्या




संपविण्याचे ठरवले आहे. मतदारयादीचे नियमित अद्यतन जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिकाऱ्यांबरोबर समन्वयाने मजबूत करण्यात येत आहे.

लोकप्रतिनिधत्व कायद्यानुसार आयोगाच्या राजकीय पक्षांबरोबरच्या संवादात स्पष्ट करण्यात आले की मसुदा मतदार यादीत कोणताही समावेश किंवा वगळण्यासंदर्भातील बाब संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार अपील प्रक्रियेने नियंत्रित केली जाते. अशा अपीलच्या अभावात, ईआरओने तयार केलेली यादी लागू राहील. ७ मार्च २०२५ रोजी ईसीआयने स्पष्ट केले होते की विशेष संक्षिप्त पुनरावलोकन (एसएसआर) प्रक्रियेनंतर फक्त ८९ पहिल्या अपील्स आणि एकच दुसरे अपील दाखल करण्यात आले.

'ईसीआय'ने निवडणुकांच्या आयोजनाशी संबंधित इतर सर्व बाबींवर सर्व राजकीय पक्षांकडून ३० एप्रिल २०२५ पर्यंत सूचना मागविल्या आहेत. राजकीय पक्षांना आयोगाशी दिल्लीत एकत्रित वेळेत भेटण्याचे आमंत्रण देखील देण्यात आले आहे. या ठोस आणि दूरगामी उपक्रमांव्दारे निवडणूक प्रक्रिया अधिक बळकट करण्यात येत आहे. निवडणूक प्रक्रियेतील सर्व संबंधीत घटकांशी समन्वय साधला जात आहे. असेही भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

# बार्शीमध्ये तरुणीला जातीवाचक शिवीगाळ

### सोशल मीडियावरील पोस्टवरुन वाद

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२३ मार्च**

शहरात एका तरुणीला जातीवाचक शिवीगाळ करुन विनयभंग केल्याची घटना घडली. तसेच, तिच्या पतीला सोशल मीडियावरील पोस्टबाबत धमकी दिल्याचा आरोप आहे. याप्रकरणी आखिल सय्यद रा. बार्शी याच्या विरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

तक्रारदार महिलेच्या जबाबानुसार, दि. २० मार्च रोजी दुपारी ४.३० वाजता त्या आपल्या सासू आणि पतीसोबत घराच्या गॅलरीत उभ्या असताना आरोपी आखिल सय्यद हा मोटारसायकलवरुन तेथे आला आणि तिच्या पतीला शिवीगाळ करु लागला. तक्रारीनुसार, यापूर्वीच तो तिच्या पतीला धमकी देऊन गेला होता. महिलेच्या पतीने दिलेल्या माहितीनुसार, तो आणि त्याचा मित्र मदिना मशीद परिसरातून जात असताना आखिल सय्यद याने त्याला थांबवले आणि तू मोहसीन भाईच्या विरोधात फेसबुकवर पोस्ट का करतोस? तुझी लायकी आहे का? असे म्हणत शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली.यानंतर घरी परतल्यानंतर आखिल सय्यद थेट त्यांच्या घरासमोर येऊन पतीला पुन्हा शिवीगाळ करु लागला. महिलेने त्याला विरोध केला असता, त्याने जातीवाचक शिवीगाळ करत तिच्याशी अश्लील वर्तन केले. या संपूर्ण प्रकारानंतर बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

# गडचिरोली जिल्ह्यातील दुर्गम भागात आली 'आनंदाची' बस

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रयत्न

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २३ मार्च:**

राज्याचा शेवटचा जिल्हा असलेल्या गडचिरोली जिल्हा हा अविकसित, अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्ह्याची ही ओळख पुसण्यासाठी प्रयत्न सुरू केले असून त्यांच्या प्रयत्नाने धानोरा तालुक्यातील मुरूमगाव, पेंढरी आणि रांगी गावासाठी गावकऱ्यांच्या मागणीनुसार राज्य परिवहन महामंडळाने बस फेऱ्या सुरू केल्या आहेत. या बस फेऱ्यांमुळे संबंधित गावातील नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले असून ही बस त्यांच्यासाठी निश्चितच 'आनंदाची बस' ठरली आहे.

गावातील नागरिकांनी रुग्ण, विद्यार्थी आणि आदिवासी नागरिकांच्या सोयीसाठी बस सुरू करण्याबाबत गेल्यावर्षी तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले होते. या निवेदनाची संवेदनशील व्यक्तिमत्व असलेल्या तत्कालीन उपमुख्यमंत्री यांनी तातडीने दखल घेत राज्य परिवहन महामंडळाच्या गडचिरोली विभागीय नियंत्रक यांना बस सुरू करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार धानोरा तालुक्यातील मौजा मरूमगाव, पेंढरी व रांगी गावात तसेच या गावाच्या मार्गावर बसेस सुरू करण्यात आल्या आहेत. बस फेऱ्याही वाढविण्यात आल्या आहेत. रा.प. गडचिरोली विभागातील धानोरा तालुक्यातील मुरूमगाव येथे ०३ नियतांमार्फत १० फे-या, पेंढरीकरीता ०३ नियतांमार्फत ०८ फे-या व रांगीकरीता ०२ नियतांमार्फत ०६ फेऱ्या सुरू आहेत. मुरूमगाव येथुन दैनंदिन २८५, पेंढरी येथुन दैनंदिन ३३५ व रांगी येथून दैनंदिन २४२ प्रवासी प्रवास करतात. बस फेऱ्या सुरू झाल्यामुळे संपूर्ण आदिवासी असलेल्या या गावातील आदिवासी बांधवांची मोठी सोय झाली आहे. त्यांना तालुक्याच्या ठिकाणी कार्यालयीन कामासाठी, दवाखान्यासाठी जाणे सोयीचे झाले आहे. ही गावे गडचिरोली सारख्या शेवटच्या जिल्ह्यातील शेवटच्या टोकाची गावे आहे. या गावातून ९ किलोमीटर अंतरावर छत्तीसगड राज्य आहे. अशा अतिदुर्गम भागातील गावकऱ्यांची सोय या बस फेऱ्यांमुळे झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गडचिरोली जिल्ह्याला स्टील हब बनवून मोठ्या प्रमाणावर उद्योग आणण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. मागील काही दिवसात अती दुर्गम भागात मुख्यमंत्री यांनी स्वतः बसमध्ये प्रवास करून गडचिरोली आता नक्षलग्रस्त नाही, तर विकासाच्या मार्गावर गतीने धावणार असल्याचे दाखवून दिले आहे

## अग्रलेख...

# झळा या लागल्या जीवा...

ऋतुबदल ही नित्याची नैसर्गिक घटना असली, तरी अलिकडे येणारा ऋतू कोणते आक्रित घडवेल, या विचाराने धास्ती वाढण्याजोगी परिस्थिती बघायला मिळते. प्रत्येक ऋतूमध्ये येणारे संकट अधिकाधिक गडद होत असल्यामुळे पावसाळ्यात प्रचंड पावसामुळे होणाऱ्या हानीची, हाडे गोठवणाऱ्या थंडीमुळे सोसाव्या लागणाऱ्या त्रासाची आणि प्रचंड उन्हामुळे होरपळून जाण्याची चिंता हा ऋतुबदलाच्या काळातील एक अनिवार्य भाग ठरतो आहे. तापणाऱ्या उन्हाने यंदाचा उन्हाळा सामान्य नसल्याची जणू सूचनाच दिली आहे. मार्च महिन्यात अनेक भागांमध्ये उन्ह तापू लागले असून तापमानाने ४० अंशाचा टप्पा ओलांडण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळेच पुढचे जवळपास तीन महिने आपली किती होरपळ होईल, हे सांगता येणार नाही. पाणवठे कोरडे पडणे, जनावरांच्या पाणी आणि चाऱ्याचा प्रश्न, उष्माघातामुळे होणारे मृत्यू, भाजीपाल्याचा अभाव आणि कडाडणाऱ्या किमती हे आणि यासारखे नानाविध विषय वाढत्या उष्म्याशी संलग्न असल्यामुळे ही दाहकता एकांगी राहत नाही. त्याची धग वा चटके सर्वांगाने आणि सर्वार्थाने जाणवतात. म्हणूनच या वाढत्या दाहामागील कारणांची दखल घेणे गरजेचे ठरते.

यंदाचा उन्हाळा अत्यधिक तीव्रतेमुळे आतापासूनच चर्चेत आहे. तापमान लक्षणीय रीत्या वाढत असल्यामुळे लोकांना असह्य उष्णतेचा अनुभव मिळू लागला आहे. तापमानाची पातळी अल्पावधीतच उच्चतम स्तरावर पोहोचण्याची शंका तज्ज्ञांकडून व्यक्त होत असल्यामुळे अनेक ठिकाणी उष्णतेचा प्रचंड कहर बघायला मिळणार हे जवळपास निश्चित आहे. अशा या तापमानवाढीला अनेक घटक कारणीभूत आहेत. सध्या जगभर चर्चेत असणारे ग्लोबल वार्मिंग अर्थात जागतिक तापमानवाढ हे त्यामागील एक प्रमुख कारण म्हणावे लागेल. सध्या नानाविध कारणांमुळे पृथ्वीवरील सरासरी तापमानवाढ अनुभवाला येत आहे. यामध्ये सर्वाधिक योगदान आहे ते मानवी हस्तक्षेप आणि त्याच्या व्यवहाराचे. आताच्या तंत्र आणि यंत्रयुक्त जगात मानवाकडून होणारे प्रदूषण तसेच कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन प्रचंड प्रमाणात वाढले आहे. यामुळे हवामानात बदल होऊन सामान्यत: गारठा असणाऱ्या काही भागांमध्येदेखील उष्णता निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळेच आता भर उन्हाळ्यात थंड हवेसाठी ओळखली जाणारी ठिकाणे तापताना दिसतात. कार्बन डाय ऑक्साईड हा सर्वांत मोठा ग्रीन हाऊस गॅस आहे. याच्या वाढत्या प्रमाणामुळे उष्णता पृथ्वीच्या पृष्ठभागावर कायम साठून राहते आणि प्रखर सूर्यप्रकाशाची साथ मिळताच उष्णतेची तीव्रता वाढते. परिणामस्वरूप २१ व्या शतकात सुमारे १.५ डिग्री सेल्सिअस तापमानाची वाढ झाली आहे. या वाढीमुळे पाण्याचे वेगाने बाष्पीभवन, पाण्याचे प्रमाण कमी होणे हे परिणाम दिसत असून देशभरात तीव्र उन्हाळा अनुभवायला मिळत आहे. वनीकरणाची कमतरता हादेखील या समस्येशी संबंधित एक महत्त्वाचा घटक आहे. कारण वनस्पती पृथ्वीवर एक प्रकारे कूलिंग एजंट म्हणून काम करतात. झाडे आणि वनस्पती वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात आणि ओलावा निर्माण करतात. यामुळे तापमान नियंत्रित राहते. तथापि, मानवी हस्तक्षेपामुळे जंगलात वृक्षतोड सुरू आहे. विशेषत: भारतात वृक्षतोड अधिक तर वनीकरणाचे प्रमाण गरजेपेक्षा अत्यंत कमी आहे. पाणी संकलनाचे प्रमाण कमी झाल्यामुळे यंदा वातावरण अधिक उष्ण होताना दिसते आहे. ही निश्चितच धोक्याची घंटा म्हणायला हवी. गेल्या काही वर्षांमध्ये शहरीकरणाचे प्रमाण वाढत आहे. शहरी भागांमध्ये 'हिट आयलंड'चा प्रभाव अधिक दिसतो. म्हणजेच शहरी भागातील तापमान ग्रामीण भागांच्या तुलनेत वाढलेले दिसते. काँक्रीट, स्टील आणि इतर बांधकाम साहित्य सूर्यप्रकाश शोषून अधिक उष्णता सोडते. त्याचप्रमाणे यांत्रिक उपकरणे आणि वाहनांच्या उत्सर्जनातून तयार होणारी उष्णताही प्रभाव दाखवते. यामुळेच शहरांमध्ये अधिक उष्णता साठवली जाते आणि या साठलेल्या उष्णतेमुळे आसपासचा परिसर जास्त तापतो. दुसरीकडे पाण्याच्या साठवणुकीच्या समस्याही वाढत आहेत. हवामानातील बदलामुळे पाऊस कमी होत आहे. पाऊस झाला तरी अचानक आणि प्रचंड प्रमाणात होतो. यालाच आपण अवकाळी म्हणतो. परिणामी पाण्याच्या साठवणुकीचे आणि व्यवस्थापनाचे मोठे संकट उभे राहिले आहे. जलाशय, नदी आणि जलसाठ्यांमध्ये पाणी कमी होते आणि उन्हाचे चटके तीव्रतेने जाणवतात. कमी पाण्यामुळे वाढलेली उष्णता अधिक कष्टदायक बनते.

वाढत्या उष्णतेमागे वायुप्रदूषण आणि ग्रीन हाऊस गॅसची कारणे ही आधुनिक काळाची देणगीच म्हणावी लागेल. सध्या उद्योग आणि वाहतूक क्षेत्रामुळे वायुप्रदूषण अधिक होते आहे. यामुळे वातावरणातील ग्रीन हाऊस वायूंचे प्रमाणही वाढते. विशेषत: कार्बन डाय ऑक्साईड, मिथेन आणि नायट्रस ऑक्साईडसारख्या वायूंचे प्रचंड उत्सर्जन होते आहे. यामुळेही उष्णता साठून राहण्यास मदत होते आणि पृथ्वीवरील तापमान वाढते. याचा थेट परिणाम उष्णतेच्या वाढत्या प्रकोपाच्या रूपाने आपल्याला अनुभवायला मिळतो. हे सर्व लक्षात घेता वायुप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच जलवायू बदलावर कारवाई करण्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय करार झाले आहेत. 'पॅरिस करार' हे त्याचेच एक उत्तम उदाहरण आहे. या कराराचा उद्देश जलवायू बदलावर नियंत्रण ठेवणे हा आहे. त्यात सहभागी देशांनी २०५० पर्यंत कार्बन उत्सर्जन कमी करणार असल्याचे वचन दिले आहे. तथापि, त्याच्या अंमलबजावणीपुढेही अनेक आव्हाने आणि समस्या आहेत. त्यामुळेच जलवायू बदलावर नियंत्रण ठेवणे हा सध्या जटिल प्रश्न होऊन बसला आहे. या सगळ्यांचा परामर्श घेता यंदाच्या तलखीसाठी आपण तयार राहायला हवे. कारण जटिल प्रश्नांचा हा गुंता इतक्यात सुटण्याची अपेक्षा धरणे मूर्खपणाचे ठरेल. मानवी सहनशक्तीच्या पलीकडे उष्णता वाढल्यास आरोग्य आणि जीवनशैलीवर मोठे परिणाम होतात. आताच स्ट्रोक, हृदयरोग आणि रक्तदाब यासारख्या समस्या वाढत आहेत. विशेषत: वृद्ध, लहान मुले आणि विकलांग व्यक्तींना याचा अधिक त्रास होताना दिसत आहे. असह्य उष्णतेमुळे कृषी क्षेत्रावरही परिणाम होतो. परिणामी, महागाई भरमसाट वाढते आणि अर्थसंकट गडद होते. अशा सर्व विपरीत परिस्थितीला तोंड देण्याची तयारी आतापासून करायला हवी. अलिकडेच ताज्या संशोधनात सिद्ध झाले आहे की, येत्या काळात जलवायू बदलामुळे वादळे आणि टायफूनसारख्या नैसर्गिक आपत्तींमध्ये लक्षणीय वाढ होऊ शकते. या प्रकारच्या वादळांमध्ये जास्त तीव्रता आणि वारंवारता दिसून येण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. उदाहरणार्थ २०२५ च्या वसंत ऋतूमध्ये एकीकडे उष्णतेचा प्रकोप दिसेल तर काही ठिकाणी प्रचंड चक्रीवादळे आणि बर्फवृष्टीही होईल, असा संशोधकांचा अंदाज आहे. म्हणजेच येत्या काळात हवामानातील अस्थिरता वाढणार आहे. या प्रकारच्या वादळांमुळे सर्वदूर अत्यधिक उष्णतेचा प्रभाव जाणवू शकतो.

हे सगळे असले तरी उष्णतेच्या लाटेवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी 'स्मार्ट सिटी' आणि 'ग्रीन इन्फ्रास्ट्रक्चर' आदी योजनांचा वापर महत्त्वाचा ठरू शकतो. यामध्ये रस्त्यांवर अधिक हिरवळ उभी करणे, वृक्षारोपण करणे तसेच इमारतींमध्ये 'ग्रीन रूफ्स'सारख्या उपायांचा समावेश आहे. यामुळे शहरी भागांमध्ये तापमान कमी होऊ शकेल. खेरीज हवामानावर प्रभाव टाकणाऱ्या 'सौर ऊर्जा' आणि 'पाणी संकलन पद्धती' आदी नवतंत्रज्ञानाचा वापर करूनही वाढत्या उष्णतेच्या समस्येवर उपाय शोधला जाऊ शकतो. एका ताज्या संशोधनातून सौर क्रिया, सौर वारा आणि चंद्राची गतीदेखील पृथ्वीवरील तापमानावर प्रभाव टाकत असल्याचे दिसून आले आहे. सौर क्रिया आणि चंद्राच्या आकर्षणामुळे पृथ्वीवरील तापमानवाढीच्या प्रमाणात बदल होऊ शकतो, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. त्यामुळेही या काळात तापमान बदलाचे वेगवेगळे परिणाम दाखवू शकतात. थोडक्यात सध्याची वाढती उष्णता केवळ प्रदूषण आणि उद्योगांशीच संबंधित नाही तर त्यामागील अनेक बारीकसारीक घटकांचाही विचार करणे गरजेचे आहे. ग्लोबल वार्मिंगवर नियंत्रण ठेवण्यासाठी नानाविध उपाय आणि जागतिक सहकार्य आवश्यक आहे. ते मिळाले आणि माणसाने जीवनशैलीत योग्य ते बदल घडवून आणले तरच कदाचित या झळांपासून आपले रक्षण होऊ शकेल. अन्यथा, होरपळ अटळ आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# केजरीवाल आता सुपर मुख्यमंत्री!

दिल्लीत आम आदमी पक्षाचा पराभव झाल्यानंतर आपचे नेते अरविंद केजरीवाल पंजाबमध्ये विपश्यना करण्यासाठी निघून गेले. होशियारपूरमध्ये १० दिवस विपश्यना केल्यानंतर केजरीवाल यांनी राजकारणात पुन्हा सक्रिय होण्याची घोषणा केली असून, ते आता पंजाबचे 'सुपर मुख्यमंत्री' म्हणून काम करणार आहेत.

पंजाबमध्ये, मुख्यमंत्री भगवंत मान यांना बदलण्याची मागणी केजरीवालनिष्ठ आमदार करीत आहेत हे येथे उल्लेखनीय. केजरीवाल यांनी स्वत: मात्र पंजाबमध्ये नेतृत्वबदल होणार नाही, मान यांच्याच नेतृत्वाखाली राज्यात विधानसभा निवडणुका होतील हे स्पष्ट केले असले तरी ते स्वत: राज्यात अधिक सक्रिय राहण्याची चिन्हे आहेत. राज्य विधानसभेचा तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला असून, निवडणुका होण्यास अद्याप दोन वर्षे बाकी आहेत. या काळात केजरीवाल जास्तीत जास्त काळ पंजाबमध्ये राहतील असे दिसते. पंजाबमधूनच ते राज्यसभेवर निवडून जणार आहेत. हे निमित्त साधून ते राज्य सरकारच्या कामात जास्तीत जास्त हस्तक्षेप करतील असे दिसते.

**नजर पंजाबवरच :** दिल्लीचा मुख्यमंत्री असतानाही केजरीवाल यांचे लक्ष पंजाबकडे अधिक होते. वास्तविक त्यांना तर पंजाबचे मुख्यमंत्रिपदच हवे होते. पण, शीखबहुल राज्य आपल्याला मुख्यमंत्री म्हणून स्वीकारणार नाही याची कल्पना आल्यानंतर त्यांनी मुख्यमंत्रिपद भगवंत मान यांच्याकडे सोपविले. दिल्लीचा मुख्यमंत्री नामधारी आहे हे त्यांच्या लक्षात आले होते. प्रत्यक्षात सारी सत्तासूत्रे नायब राज्यपालांकडे देण्यात आली आहेत. तसा कायदाच संसदेत पारित करण्यात आला आहे. पंजाबमध्ये मात्र तसे नाही. राज्य सरकारला सारे निर्णय घेण्याचा अधिकार आहे. याचा फायदा उठवीत केजरीवाल यांनी पंजाब सरकारच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याचे धोरण पूर्वीपासून स्वीकारले आहे. मुख्यमंत्री मान यांच्या उपस्थितीत सरकारी अधिकाऱ्यांच्या बैठका घेईपर्यंत त्यांची मजल गेली होती.

**सिसोदियांच्या अटकेनंतर :** दिल्लीचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्याकडे दिल्लीचा कारभार सोपवून देशात व पंजाबमध्ये आपले हातपाय पसरण्याचे धोरण केजरीवाल यांनी स्वीकारले होते. पण सिसोदिया यांना मद्य घोटाळ्यात अटक झाल्यानंतर केजरीवाल यांना नाईलाजाने दिल्लीतील आपले वास्तव्य वाढवावे लागले. नंतर तर केजरीवाल यांनाही अटक झाली. त्यांना दिल्लीच्याच तिहारमध्ये ठेवण्यात आले होते. आणि त्याची सुटका होत असताना, दिल्लीत विधानसभा निवडणुका फार जवळ आल्या होत्या. निवडणुका घोषित झाल्या. केजरीवाल यांना पंजाब वा इतर राज्यांत फार हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली नाही.



**राजकीय बेरोजगार :** दिल्लीतील पराभवाने केजरीवाल यांना अक्षरश: बेरोजगार केले असून, विपश्यना करण्याच्या नावाखाली त्यांनी पंजाबमध्ये १५ दिवसांचा मुक्काम ठोकला. सरकारी सोयी सवलतींच्या सान्निध्यात त्यांनी १० दिवसांची विपश्यना केली असे सांगितले जात असले तरी या काळातही ते आपल्या नेत्यांना- आमदारांना भेटत होते. यातून त्यांनीच राज्यात नेतृत्वबदल करण्याची चर्चा सुरू केली असे समजते. पण, आता मुख्यमंत्री भगवंत मान यांना बदलणे सोपे नाही. तसा प्रयत्न केल्यास राज्यात आम आदमी पक्षाचे दोन तुकडे होऊ शकतात. केजरीवाल यांनाही याची कल्पना असल्याने त्यांनी नेतृत्वबदल न करता राज्याचे 'सुपर मुख्यमंत्री' होण्याचे ठरविले असल्याचे समजते. सर्व महत्त्वाचे निर्णय ते करणार आहेत असेही त्यांच्या गोटातून सांगितले जाते. मुख्यमंत्री मान यास फार विरोध करू शकणार नाहीत असे मानले जाते. कारण, त्यांना एक प्रशासक म्हणून आपला कोणताही प्रभाव राज्य प्रशासनावर सोडता आलेला नाही. याउलट केजरीवाल यांनी त्यांना एक मुलकी अधिकारी म्हणून असलेल्या अनुभवाचा फायदा उठवीत दिल्लीच्या कामकाजावर आपला एक ठसा उमटविला होता. तसाच प्रयत्न ते आता पंजाबमध्ये करणार आहे.

**पुन्हा नशा :** दिल्लीत केजरीवाल यांचे पानिपत झाले ते मुळी दिल्ली सरकारच्या मद्य घोटाळ्यामुळे. पंजाबमध्ये केजरीवाल यांनी पुन्हा तोच रस्ता धरला आहे. पंजाबमधील युवक मोठ्या प्रमाणावर मादक पदार्थांच्या आहारी गेले असून, त्यांना व्यसनमुक्त करणे आपले मिशन असल्याचे ते वारंवार सांगत आहेत. केजरीवाल पंजाबमधील युवकांच्या व्यसनाबाबत बोलत असले तरी प्रत्यक्षात त्यांना सत्तेचे व्यसन लागले आहे ही वस्तुस्थिती आहे.

**गायब सिसोदिया :** दिल्ली विधानसभेचे निकाल लागून एक महिना उलटला आहे. तरी आपचे नेते त्या धक्क्यातून आणि दु:खातून सावरलेले नाहीत असे दिसते. केजरीवाल यांनी विपश्यना करण्यासाठी पंजाबचा रस्ता धरला असताना, मनीष सिसोदिया हे जवळजवळ निष्क्रिय झाले आहेत. हीच अवस्था आपच्या आणखी काही नेत्यांची आहे.

सध्या संसदेचे अधिवेशन सुरू असल्याने आपचे नेते व राज्यसभा खासदार राघव चड्ढा दिल्लीत आहेत. अधिवेशन आटोपताच ते लंडनचा रस्ता धरतील असे आपमधून सांगितले जाते. चड्ढा यांनी आप सोडण्याचा निर्णय जवळपास पक्का केला असल्याचे समजते. फक्त यासाठी ते योग्य मुद्दा आणि वेळ शोधत असल्याचे आप गोटातून सांगितले जाते.

**चुकीचा निर्णय :** तामिळनाडू सरकारने आपला अर्थसंकल्प सादर करताना त्यातून रुपयाचे चिन्ह हटविले. एक योगायोग म्हणजे रुपयाचे हे चिन्ह एका तामिळ व्यक्तीनेच तयार केले होते. मुख्यमंत्री स्टॅलिन यांचा हा निर्णय पूर्णपणे केवळ अयोग्यच नाही तर घटनाबाह्य, केंद्र- राज्य संबंधांना तडा देणारा असा आहे. तामिळनाडूतील संवेदनशील स्थिती पाहता केंद्र सरकारने याबाबत कोणतीही कारवाई केली नसली तरी राज्य सरकारचे हे कृत्य राज्य सरकार बरखास्त करण्यासाठी पुरेसे होते.

**नवी फेरी :** तामिळनाडूतील स्टॅलिन सरकार व राज्यपाल रवि यांच्यात मागील काही महिन्यांपासून शीतयुद्ध सुरू होते. राज्य विधानसभेने पारित केलेल्या काही विधेयकांना राज्यपालांनी आपली मंजुरी रोखून धरली होती. नंतर सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर त्या विधेयकांना मंजुरी देण्यात आली. ते प्रकरण काहीसे निवळले असताना हा नवा वाद उद्‌भवला आहे.

**सरकारिया आयोग :** केंद्र-राज्य संबंधावर विचार करण्यासाठी केंद्र सरकारने फार पूर्वी न्या. सरकारिया यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला होता. आयोगाने काही चांगल्या शिफारशीही केल्या होत्या. मात्र आता आयोगाचा तो अहवाल कालबाह्य झाल्यासारखा असल्याने केंद्र सरकारने या विषयावर नवा आयोग गठित करण्याचा विचार करावा असे एक मत व्यक्त केले जात आहे. काही राज्यांमध्ये केंद्र-राज्य सरकारांचा संघर्ष झडत असला तरी हा संघर्ष एका चौकटीबाहेर जाणे योग्य नसते. तामिळनाडू सरकारचा ताजा निर्णय केंद्र-राज्य संबधांच्या चौकटीत बसणारा नाही. राज्य सरकारने आपल्या अधिकारांचे- मर्यादांचे उल्लंघन केले आहे. मात्र याची पुनरावृत्ती अन्य राज्यांत होऊ नये म्हणून केंद्र सरकारने याबाबत वेळीच काही कारवाई करावी असेही मानले जाते. हे सारे करीत असताना केंद्र-राज्य संबंध नव्याने परिभाषित करण्यासाठी सरकारिया आयोगाच्या धर्तीवर केंद्राने एखादा आयोग नियुक्त केल्यास या आयोगाच्या शिफारशी देशाच्या संघराज्य चौकटीला बळकट करणाऱ्या ठरतील.

## वेध

**हेमंत सालोडकर**

# नको भारनियमन हवे महावितरण

वीज वितरण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महावितरणला 'सर्वोत्कृष्ट वीज वितरण कंपनी' पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. त्यामुळे महावितरणकडून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. केंद्रीय सिंचन व ऊर्जा मंडळातर्फे हा पुरस्कार दिला जातो. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी हा पुरस्कार स्वीकारला असला तरी त्या मागील यशाचे भागीदार अनेक जण आहेत. त्यांचेही हा पुरस्कार मिळण्यात मोठे योगदान आहे. काही वर्षांपूर्वी महावितरणचे आगमन झाले आणि लोकांच्या अपेक्षा, आकांक्षा पूर्ण करण्यात यश मिळवले. पारंपरिक गोष्टींसोबतच अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज होत महावितरण मार्गक्रमण करीत आहे.

पूर्वी वीज ग्राहकांची संख्या कमी होती. वीज उत्पादन मुबलक होत असल्याने मागणी त्याप्रमाणे पुरवठा होत होता. ग्राहकही आनंदी होते. पण ग्राहकांच्या खिशात पैसा आला आणि सुखसोई वाढत गेल्याने लोकांनी घरी विजेची अनेक उपकरणे वापरणे सुरू केले. त्यामुळे विजेची मागणी वाढली. त्या तुलनेत वीज उत्पादन अपुरे पडू लागले. परिणामी भारनियमन करणे सुरू झाले. महाराष्ट्रातील लोकांना भारनियमन म्हणजे काय हा प्रकार नवीन होता. त्यामुळे लोकांची नाराजी, संतापाचा सामना महावितरणला करावा लागला. घरगुती उपकरणांप्रमाणेच व्यापार, उद्योग वाढले. नवनवीन कारखाने सुरू झाले. त्यासाठीही विजेची मागणी वाढू लागली. त्यासाठी अतिरिक्त विजेची गरज भासू लागली. शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसा आणि रात्री पाण्याची गरज भासू लागली. ती मागणी पूर्ण करता करता वीज वितरण कंपनीच्या नाकी नऊ आले. घरगुती ग्राहक, व्यापारी, उद्योजक, शेतकरी, कारखानदार, लघुउद्योग यांची विजेची मागणी कशी पूर्ण करता येईल याचा विचार होऊ लागला. उन्हाळ्यात होणाऱ्या भारनियमनामुळे लोकांचा संतापाचा उद्रेक व्हायचा. रात्री दहा-पंधरा लोकांचा गट वस्तीतील वीज कार्यालयावर जायचा. या लोकांच्या प्रश्नांना सामोरे जाताना महावितरणच्या कर्मचाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागायची. काही संतप्त लोक तर कर्मचाऱ्यांना मारहाण करायचे. त्यामुळे अनेकदा प्रकरण पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचायचे. भारनियमनाची समस्या वीजचोरीमुळेही उद्‌भवत होती. अनेक झोपडपट्ट्यांमध्ये अधिकृत वीज मीटर न घेता आकोडे तारांवर टाकून विजेचा सर्रास वापर सुरू होता. झोपडीत मिक्सरपासून एसीपर्यंत सर्व सुखसोई फुकट मिळवण्याचा प्रयत्न होत होता. यावर कारवाई करण्यासाठी गेलेल्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण करण्याचे प्रकार घडले आहेत. त्यातून धडा घेत महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी मग पोलिसांची सुरक्षा मिळवत कारवाईला सुरुवात केली. वीज बिल न भरणाऱ्या ग्राहकांची वीज कापण्यात आली. अनेक उच्चभ्रू लोकांनी मोठ्या प्रमाणात वीज बिलांची थकित रक्कम भरली नसताना त्यांच्यावर कारवाई करण्यात येत नव्हती. यानंतर त्यांच्यावरही लगाम कसण्यात आली. आता महावितरणने कात टाकत आधुनिक उपकरणांच्या माध्यमाने आपल्या कर्मचाऱ्यांना सज्ज केले आहे. त्यांची सुरक्षा शिरोधार्य मानून त्याला अग्रक्रम दिला आहे. तसेच ग्राहकांसाठी अधिक सोईसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. ऑनलाईन वीज बिल भरता येणे शक्य झाल्यामुळे रांगेत लागून वीज बिल भरण्याची गरज राहिली नाही. बिल भरल्यानंतर लगेच पोचपावती मिळते. ई-मेल, व्हॉट्सअ‍ॅपचा मेसेज येतो. त्यामुळे महावितरणची विश्वसनीयता वाढली आहे. त्यामुळे आता महावितरणकडून लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहे. भूमिगत वीज वाहिन्या, उच्च दर्जाची रोहित्रे वापरून लोकांना स्वस्त दरात वीज उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे.

महावितरणने मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत देशात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच गावांना ऊर्जा स्वयंपूर्ण करण्यासाठी 'सौर ग्राम योजना' सुरू केली असून, आतापर्यंत १० गावे पूर्णत: सौर ऊर्जेवर कार्यरत झाली आहेत. महावितरणची स्वत:ची कार्यालये, वीज उपकेंद्रे आणि ग्राहक सेवा केंद्रांना सौर ऊर्जेवर चालविण्यासाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. विद्युत वाहनांसाठी राज्यभर अनेक चार्जिंग स्टेशन्स उभारण्यात आली असून, पुण्यातील चार्जिंग स्टेशन थेट सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पाशी जोडण्यात आले आहे. यामुळे अक्षय ऊर्जेच्या वापराला चालना मिळत आहे. महावितरणने वितरण यंत्रणेतील सुधारणा, वीज उपकेंद्रे आणि नवीन वीज वाहिन्यांचे जाळे उभारणे, वितरण रोहित्रांची संख्या वाढवणे यावर विशेष भर दिला आहे. शेतकऱ्यांसाठी 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' आणली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी दिवसाही वीज मिळणार आहे. मात्र आता उन्हाळा असताना लोकांच्या नशिबी भारनियमनाचे जुने त्रासदायक दिवस पाहण्याचे योग येऊ नये, एवढीच महावितरणकडून अपेक्षा आहे.

९८५०७५३२८१

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# शांततेचे खरे मारेकरी

नुकतीच नागपूरमध्ये दंगल उसळली. दंगेखोरांनी नागपुरातील महाल परिसरामध्ये दगडफेक करणे, वाहनांना आगी लावणे, जाळपोळ करणे, घरांचे नुकसान करणे, नागरिकांना भयभीत करणे अशा पद्धतीचे काम केले. नागपूरला अशा दंगलींचा इतिहास नसल्यामुळे असे काही होईल असे खुद्द पोलिसांनाही वाटले नाही.

तसे पाहिले तर संघ स्थापनेनंतर लगेच अशा पद्धतीची दंगल नागपुरात झालेली होती. परंतु पू. डॉ. हेडगेवार यांच्या नेतृत्वात काम करणाऱ्या स्वयंसेवकांनी अतिशय जागरूक राहून दंगल करायला येणाऱ्या दंगलखोरांना चांगला चोप दिला होता. त्यावेळेस कोणीतरी डॉक्टरांना विचारले होते की, दंगल झाली तर संघाचे स्वयंसेवक काय करतील? त्यावर डॉ. हेडगेवारांनी उत्तर दिले होते की, संघाचे स्वयंसेवक पांघरूण घेऊन झोपून राहतील. प्रश्न विचारणाऱ्याला हे उत्तर थोडे खटकले. त्याने पुन्हा प्रती प्रश्न केला की तुम्ही हिंदू संघटनेचे काम करीत आहात. असे असताना हिंदू समाजावर संकट आले असता स्वयंसेवक झोपून कसे राहतील. त्यावर डॉक्टरांनी त्यांना उत्तर दिले की आपल्या वस्तीचे, आपल्या घराचे संरक्षण करणे हे प्रत्येकाचे काम आहे. त्यामुळे सर्वांनी कुठल्याही धोक्यासाठी सावध राहणे, जागृत राहणे आवश्यक आहे. तुम्ही सावध असाल, जागरूक असाल तर तुमच्या बाजूला स्वयंसेवक उभा राहील व दंगेखोरांना पळवून लावण्यात तुमची मदत करेल. परंतु तुमच्या सुरक्षेचे काम जर तुम्ही संघाच्या स्वयंसेवकांना देणार असाल व तुम्ही झोपून राहणार असाल तर असे होणार नाही.

काश्मीरमध्ये राहणाऱ्या अल्पसंख्य हिंदूंना ज्यावेळेस संघाचे लोक सांगायचे की, त्यांनी एकत्र राहिले पाहिजे, संघटित राहिले पाहिजे, त्यांच्या शेजारी मुस्लिम आहेत यामुळे त्यांच्यामध्ये कधीही धर्मांधतेचा स्फोट होऊन हिंदूंच्या जीविताला व मालमत्तेला हानी पोहोचू शकते त्यावेळेस त्यांना असे वाटायचे की संघाचे लोक विनाकारण हिंदू-मुस्लिम असा भाव निर्माण करून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे कार्य करीत आहेत. परंतु इतिहास साक्षी आहे की काश्मिरातल्या हिंदूंना एक दिवस त्यांच्या मालमत्तेला सोडून अंगावरच्या राहत्या कपड्यांनिशी, आपल्या बायका, मुलांना घेऊन काश्मिरातून पळावे लागले व आजही देशाच्या विविध भागांमध्ये त्यांना राहावे लागत आहे.

कट्टरवादी आणि जिहादी मानसिकतेने या देशाचे दोन तुकडे केले. त्यातूनच पाकिस्तानची निर्मिती झाली. असे असताना देखील त्यांनी दिलेले घाव विसरून हिंदू समाज पुन्हा आपले जीवन जगायला लागला. इथे भारतात राहणारा जो सर्वसामान्य मुस्लिम समाज आहे तो छोटे-मोठे व्यवसाय करतो. त्या सर्वांचे जीवन इथे राहणाऱ्या बहुसंख्य हिंदू समाजावर अवलंबून आहे. असे असताना देखील काही धर्मांध माथेफिरू मुस्लिम युवक नागपूरमध्ये हिंसा घडविण्याचे धारिष्ट्य करतात. त्यांना वर्षानुवर्षांपासून हिंदूंच्या सोबत दुकानाला दुकान लावून, मांडीला मांडी लावून बसणारे मुस्लिम हे विरोध करू शकत नाही. त्यांना समजावू शकत नाही की नागपूरची ही परंपरा नाही. नागपूरचा हा इतिहास नाही. यावरून काय सिद्ध होते की शांतताप्रिय मुस्लिमांचे बोलणे धर्मांध आणि जिहादी कधीही खपवून घेणार नाही. त्यामुळे संबलमध्ये झालेली दंगल असो किंवा डोंबिवलीत संघाच्या शाखेवर फेकलेले दगड असो किंवा देशभरामध्ये विविध ठिकाणी याच मानसिकतेने होणारे दंगे असो यामध्ये गाव महत्त्वाचे नाही, शहर महत्त्वाचे नाही, दंगेखोरांची जिहादी मानसिकता महत्त्वाची आहे.

या मानसिकतेमुळेच आज अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प म्हणत आहे की आता अमेरिकेमध्ये मुस्लिमांच्या प्रवेशाला बंदी लावली पाहिजे. याच जिहादी मानसिकतेमुळे जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, इटली, युरोपच्या सर्वच देशांना त्रास होत आहे. भारताने तर आपल्या देशाचे याच मानसिकतेमुळे विभाजन सहन केलेले आहे. तीन लाख काश्मिरी हिंदूंना निर्वासित व्हावे लागलेले आहे. याच मानसिकतेमुळे देशातील अनेक भागांमध्ये पाकिस्तानसदृश परिस्थिती निर्माण झालेली आहे. हीच मानसिकता बांगलादेशी घुसखोरांना यांच्या वस्तीमध्ये पोसण्याचे काम करते. हीच मानसिकता रोहिंग्या यांना आश्रय देते. किती लिहावे आणि किती बोलावे हा प्रश्नच आहे. अशा घटनांनी हिंदू समाज काही काळापुरता जागृत होतो. त्यानंतर मात्र तो पुन्हा झोपून जातो. हिंदू समाजाची हीच झोपाळू वृत्ती संकटांना आमंत्रित करणारी ठरते. नागपूरची दंगल हेच सर्व सांगत आहे. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल यांनी औरंगजेबाची कबर हटवा अशा पद्धतीची मागणी केली. यात चुकीचे काय आहे. औरंगजेब हा कोणी साधू पुरुष नव्हता. तो एक आक्रमक होता. त्याने काशी विश्वनाथाचे मंदिर तोडले, त्याने कृष्ण जन्मभूमीचे मंदिर तोडले, त्याने शेकडो मंदिरांचा विध्वंस केला, हजारो लोकांना त्याने धर्मांतरित केले. त्या वेळच्या हिंदू समाजावर त्याने अनन्वित अत्याचार केले. धर्मवीर, स्वराज्य रक्षक संभाजी राजांना सुद्धा त्याने हाल हाल करून मारले. पण काही नेते त्याच्या कबरीवर जातात, फुले उधळतात. त्याच्या कबरीवर जाणारे नेते हे हिंदूंचा अपमान करण्यासाठीच त्या कबरीवर जात असतात. त्यांना याच देशामध्ये राहून तुमच्या राष्ट्रीय शत्रूंचे गुणगान करायचे आहे. त्यांचा उदो उदो करायचा आहे. त्यांच्या स्मारकाचे महिमामंडन करायचे आहे. असे करीत असताना जर काही हिंदुत्वप्रेमी प्रखर संघटनांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना असे वाटले की आम्ही लोकशाही मार्गाने निषेध केला पाहिजे तर त्यात काय चूक आहे. जर यात काही चूक असेल तर पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हे दाखल केलेले आहेत, त्यांच्यावर रीतसर खटला चालेल. त्यामध्ये ते आपली बाजू मांडतील. न्यायालयाला जो निर्णय द्यायचा आहे तो निर्णय न्यायालय देईल. परंतु त्यांनी आंदोलन केले म्हणून आम्ही दंगे भडकवू, दगडफेक करू, जाळपोळ करू, वर्षानुवर्षांपासून ज्या हिंदूंच्या सोबत आम्ही राहात आहोत त्यांच्या घरांना व त्यांना आम्ही क्षतिग्रस्त करू ही मानसिकता या देशामध्ये कदापि खपवून घेतली जाऊ नये. आज सर्वांना उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची आठवण येत आहे. आज लोकांना बुलडोझरची आठवण येत आहे. दंगेखोरांची घरे जमीनदोस्त करण्याची कारवाई होण्याची लोक वाट पाहत आहे.

जिहादी आणि कट्टरवादी मानसिकता हीच शांततेला मारक आहे. शांततेची मारेकरी आहे. ही मानसिकता आपण कदाचित बदलू शकणार नाही परंतु आपली सज्जता आपल्या हातात असली पाहिजे. दंगा झाल्यावर आम्ही जागरूक होऊ ही गोष्ट चुकीची आहे. पोलिस पोलिसांचे काम करेल, न्यायालय न्यायालयाचे काम करेल, परंतु यामध्ये समाजाची जी हानी होऊन गेली ती भरून निघणार नाही.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### सार्वजनिक जागा वापरायला देऊ नये

सोलापूर शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या लोकसंख्येमुळे वाहनाचे प्रमाण व रहदारीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढले आहे. याचे दुष्परिणाम आपण रोजच बघतो कितीतरी लोक आजपर्यंत अपघातात मरण पावले आहेत. किंवा कायमस्वरूपी दिव्यांग होऊन बसले आहेत. या सर्व गोष्टीला आळा घालण्यासाठी शहरातील महत्त्वाच्या चौकातील, रस्त्यावरील जागेवर कुठल्याच प्रकारचे अतिक्रमण अथवा जागा भाड्याने कुठल्याच कार्यक्रमाला देऊ नये. उदाहरणार्थ सात रस्त्या जवळील बीएसएनएल ऑफिस लगतची जागा नेहमीच वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी देण्यात येते या रस्त्यावर शहरातील सर्वात जास्त वाहतूक असते व येथे ट्रॅफिक पोलीस देखील कायम स्वरूपी नसते यामुळे लोकांना बऱ्याचदा त्रास होतो महानगरपालिकेला विनंती आहे की आशा सर्व जागेवर यापुढे कुठल्याच प्रकारचे अतिक्रमण अथवा कार्यक्रम होऊ देऊ नये असे वाटते.

**- फैय्याज शेख/ सोलापूर** ९४२०५४६७५१

### छत्रपती शिवरायांच्या आदरार्थी उल्लेखासाठी आडमुठेपणा का?

शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक महाराष्ट्रासह भारतात आहे. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुढाकाराने या विद्यापिठाची स्थापना झाली. सध्या या विद्यापीठाच्या नामविस्तारावरून वातावरण तापले आहे. विद्यापीठाचे नामकरण 'छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ' करण्यात यावे, अशी मागणी हिंदू जनजागृती समितीसह विविध हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी केली आहे. १७ मार्चला या मागणीसाठी कोल्हापूर येथे भव्य मोर्चा निघाला होता. अनेक लोकप्रतिनिधींनी या नामविस्ताराला पाठिंबा दर्शवला आहे. या नामविस्ताराची विविध स्तरांवरून मागणी होत असताना विद्यापीठाच्या कार्यकारिणीने मात्र विरोध दर्शवला आहे. १५ मार्चला कार्यकारिणी आणि विद्यापीठाशी संलग्न पुरोगामी मंडळींनी विद्यापीठात झालेल्या बैठकीत 'नामांतराची मागणी करणाऱ्यांना ठोकून काढू', अशी गुंडगिरीची भाषा वापरली गेली. शिवाजी विद्यापीठाचा नामविस्तार 'छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ' होत असेल, तर त्यामुळे महाराजांच्या नावाचा आदराने उल्लेख होईल, असा सरळसाधा सुखावणारा विचार सर्वसामान्य नागरिकांमध्ये येतो. छत्रपती शिवरायांचा उल्लेख हा आदरानेच व्हावा, असे प्रत्येक शिवप्रेमी, महाराष्ट्र आणि हिंदुत्वप्रेमींना वाटते. छत्रपती शिवरायांचा आदराने होणाऱ्या उल्लेखासाठी एवढा आडमठेपणा कशाला? हा प्रश्न साहजिकच सर्वसामान्यांना पडतो.



**संजय चौधरी**/अमरावती

### नागपुरात राष्ट्रीय विद्यापीठाचे कॅम्पस अभिनंदनीय

गुन्हेगारी तपासात अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या न्यायवैद्यकशास्त्रच्या देशभर विस्तारीकरणाच्या क्रमात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अखत्यारित येणाऱ्या केंद्रीय गृह विभागाने देशाच्या केंद्रबिंदू असलेल्या नागपूरमध्ये राष्ट्रीय न्यायवैद्यकशास्त्र विद्यापीठाच्या कॅम्पसची घोषणा केली. नागपूरसोबतच रायपूर, खोरधा (ओडिशा) मध्ये सुद्धा विद्यापीठाचे कॅम्पस देण्याची घोषणा केली. गुजरातच्या गांधीनगर येथे असलेल्या राज्य न्यायवैद्यकशास्त्र विद्यापीठाचे विस्तारीकरण करत त्याला राष्ट्रीय न्यायवैद्यकशास्त्र विद्यापीठाचे स्वरूप देण्यात आले. आता देशातील इतर भागांत विद्यापीठ परिसराची स्थापना केली जात आहे. या विद्यापीठामुळे फॉरेन्सिक सायन्स, फिंगरप्रिंट सायन्स, आर्थिक गुन्हे इत्यादींच्या अभ्यास या विद्यापीठात करता येईल. गुन्हे रोखण्यासाठी, गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी सरकारला, तपास यंत्रणांना मोलाची मदत होणार आहे. राष्ट्रीय न्यायवैद्यकशास्त्र विद्यापीठाची स्थापना नागपुरातील कामठी मार्गावरील चिचोली येथील ५० एकर जागेवर केली जाईल. या निर्णयामुळे नागपूरच्या शैक्षणिक वैभवात भर पडून याचा लाभ फॉरेन्सिक सायन्सच्या विद्यार्थ्यांना, संशोधकांना व कर्मचाऱ्यांना होणार आहे. नागपूरमधील कॅम्पस विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी या क्षेत्रात करीअरचे नवे दार उघडेल. हे कॅम्पस नागपूरमध्ये होत असल्याचा नागपूरसह विदर्भातील प्रत्येकाला आनंद आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाभिमुख नेतृत्वात भारत सर्वच ठिकाणी आणि विकासाच्या दिशेने वेगाने पावले टाकत आहे. हे विद्यापीठ विकसित विदर्भाच्या विकासात महत्त्वाचे योगदान देईल.

**वैभव बावनकर**/९५४५७४५५८०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अ‍ॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स अ‍ॅप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# लोक अदालतीत २७ हजार प्रकरणे सामंजस्याने निकाली

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ मार्च -**

सन २०२५ मधील २२ मार्च रोजी झालेल्या पहिल्या राष्ट्रीय लोक अदालतीत संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून २६ हजार ९८८ इतकी प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. लोक अदालती मध्ये निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणामध्ये १०८ कोटी ६८ लाख ६३ हजार ३०६ इतके तडजोड मुल्य राहीले. राष्ट्रीय लोक अदालतीच्या माध्यमातून ९ जोडप्यांचे वैवाहिक हक्क सामंजस्याने पुर्नस्थापित झाले.



सन २०२५ मधील पहिल्या राष्ट्रीय लोक अदालतीचे उद्घाटन पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा, जिल्हा न्यायाधीश योगेश राणे, जिल्हा सहकारी वकील प्रदीपसिंह राजपुत, सोलापूर वकील संघाचे प्रभारी अध्यक्ष ॲड. व्ही.पी. शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, सहाय्यक पोलीस आयुक्त सुधीर खिराडकर, भारतीय स्टेट बँकेचे शाख अधिकारी सौ. सरस्वती उंबरजे, ज्येष्ठ विधीज्ञ व्ही. एन. देशपांडे, जिल्हा न्यायालयाचे प्रभारी प्रबंधक मुकुंद ढोबळे तसेच विधीज्ञ आणि पक्षकार उपस्थित होते.

सोलापूर जिल्हा न्यायालय तसेच सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील न्यायालयामध्ये राष्ट्रीय लोक अदालतीच्या माध्यमातुन एकूण ६ हजार ६१३ प्रलंबित प्रकरणे, तर २० हजार ३७५ दाखलपुर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली. या सर्व प्रकरणामधील तडजोड मुल्य १०८ कोटी ६८ लाख ६३ हजार ३८० रुपये इतके राहिले.

सदर राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयामध्ये ३० वर्षे जुनी १, २० वर्षे जुनी १, १५ वर्षे जुनी २, १० वर्षे जुनी ४२, ५ वर्षे जुनी ३५७ अशी एकूण ४०३ जूनी प्रकरणे निकाली काढण्यात आली.

राष्ट्रीय लोक अदालतीच्या आयोजनापुर्व १७ ते २१ मार्च या कालावधीमध्ये प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयामध्ये विशेष मोहीम राबविण्यात आली. या विशेष मोहीमे मध्ये ३० वर्षे जुनी १, २० वर्षे जुनी २, १५ वर्षे जुनी १२, १० वर्षे जुनी ९०, ५ वर्षे जुनी ८८८ व इतर अशी एकूण ९९४ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

### लोकअदालतीची यशस्वी गाथा...

रस्ता सुरक्षा सप्ताह चालु असताना महामार्ग सुरक्षा पथक ड्युटीवर जाण्याकरीता निघालेले मयत पोलीस शिपाई कै. संजय अरूण खटके यांना कामती ते मोहोळ या मार्गावर विरूध्द दिशेने (रॉग साईड) आलेल्या कंटेनरच्या चालकाने धडक देवून त्यांच्या मृत्युस कारणीभुत ठरल्यामुळे मोहोळ पोलीस ठाणे येथे ट्रक चाकला विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. मोटार अपघात नुकसान भरपाई करीता ॲड. विद्यावंत पांढरे यांच्यामार्फत नुकसान भरपाईचा दावा दाखल केला होता. सदर दाव्यामध्ये मालट्रकच्या विमा कंपनीने एकूण ७० लाख रुपये इतकी नुकसान भरपाई महालोकअदालत मध्ये तडजोडीद्वारे देण्यात आली. तब्बल नऊ वर्षानंतर तडजोडीच्या माध्यमातून नुकसान भरपाईपोटी मिळालेली रक्कम समाधान कारक असल्याने मयताच्या नातेवाईक यांनी सांगीतले.

## संक्षिप्त वृत्त

### जागेवर अतिक्रमण करीत ५० हजारांची मागितली खंडणी; एकावर गुन्हा नोंद

**सोलापूर, दि. २३ मार्च -**

शेत जागेवर अतिक्रमण करीत ज्येष्ठास शिवीगाळ व मारहाण करण्याची धमकी दिली, तर ५० हजार रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याप्रकरणी एकावर शनिवारी रात्री एमआयडीसी पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. भारत भिमा कोळी (वय ६९रा. प्लॉट नं ५७,जमादार वस्ती, निलम नगर,मजरेवाडी सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अनिल अभिमन्यू शेतसंधी उर्फ जमादार(रा. जमादार वस्ती,निलम नगर,मजरेवारी सोलापूर) असे गुन्हा झाल झालेल्या आरोपीचे नाव आहे. ही घटना २१ मार्च रोजी रात्री साडे दहा वा ते २२ रोजी सकाळी साडे दहाच्या सुमारास घनं ५७, जमादार वस्ती, निलम नगर मजरेवाडी सोलापूर येथे घडली. फिर्यादी याने सन २००९ मध्ये नातेवाईक अभिमन्यू शेतसंधी उर्फ जमादार यांच्याकडून सर्व्हे नं ३१/२, मध्ये ८ आर इतकी शेतजमीन खरेदी करून घेतली होती. व ती जमीन फिर्यादीच्या ताब्यात असून ती वहिवाटीत आहे.त्यास तारेचे कुंपण आहे. नातेवाईक शेतसंधी उर्फ जमादार यांचे मार्च २०२३ मध्ये मयत झाले. मयत झाल्यानंतर शेतसंधी यांचा मुलगा अनिल यांने भारत कोळी यांच्या जागेवरच तारेचे कुंपण तोडून टाकले. जागेवर कब्जा केला. यावरून कोळी यांनी त्याच्या विरुध्द एमआयडीसी पोलिसांत तक्रार दिली होती. तेंव्हापासून शेतसंधी हा चिडून होता. शनिवारी सकाळी साडे दहाच्या सुमारास आरोपीने नेताजी शाळेच्या पुढे, देवी मंदिर येथे फिर्यादीची रस्ता आडवला. शिवीगाळ करून दमदाटी केली. तुला मस्ती आली आहे काय, या भागात रहायचे असेल तर ५० हजार रुपये द्यायचे नाहीतर तुझा व तुझ्या मुलांना जीव मारतो असे म्हणत खंडणीची मागणी केल्याने त्याच्या विरुध्द एमआयडीसी पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. या घटनेचा तपास पोलिस उपनिरीक्षक चंदनशिव करीत आहेत.



### येणेगूर येथे आठ नवीन वर्गखोल्याचे भूमिपूजन

**सोलापूर, दि. २३ मार्च-**


सोलापूर हायफ्लायर्स राऊंड टेबल ३०९ आणि सोलापूर टॉवेल सिटी राऊंड टेबल १५० यांच्या संयुक्त विद्यमाने हाय-टेक इंग्लिश स्कूल, येणेंगूर, जि. धाराशिव येथे ८ नवीन वर्गखोल्यांचा बांधकाम प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. ८० लाख रुपये खर्चाच्या या प्रकल्पामुळे दरवर्षी ७०० हून अधिक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध होणार आहे. कृष्ण पक्ष पंचमी या शुभमुहूर्तावर भूमि पूजन सोहळा पार पडला, जो या ऐतिहासिक उपक्रमाच्या सुरुवातीचा महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या कार्यक्रमासाठी एन. आर. पाटील (एन. आर. पाटील फायनान्स, डेव्हलपर्स आणि बिल्डर्स) हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच जयेश पटेल (पी. पी. पटेल फाउंडेशन), वासुदेव बंग, आणि तरंग शाह हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. शाळेच्या विद्यार्थ्यांनी देव-देवता, सैनिक आणि वारकरी वेशभूषेतील विविध सांस्कृतिक सादरीकरण करून अतिथींचे मनःपूर्वक स्वागत केले. भूमिपूजन समारंभ चेअरमन श्वेता कोठारी चेअरमन, चेअरमन पुष्कराज कोठारी, गुरुदीप दोडमणी आणि एन. आर. पाटील यांच्या हस्ते पार पडला.

### अ. रहेमान प्यारे याचा पहिला रोजा

**सोलापूर, दि. २२ मार्च-**



तेलंगी पाच्छा पेठ जेलरोड येथील रहिवाशी अ. कदीर प्यारे यांचा ६ वर्षाचा मुलगा अब्दुल रहेमान यांनी रमजान महिन्याचा रोजा (उपास) पूर्ण केला. सध्या तो सोशल असोसिएशन प्रायमरी शाळेत यु.के.जी मध्ये शिकत आहे. पवित्र रमजान महिन्याचा रोजा पूर्ण केल्याबद्दल सर्व टिचर स्टाफ व या भागातील सर्व नागरिकांनी अभिनंदन केले.




### महिलांनी राजकारणात त्यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करावे : खा. प्रणिती शिंदे

**सोलापूर, दि.२३ मार्च**

शक्ती अभियानाच्या माध्यमातून महिलांच्या जीवनात तळागाळापासून संसदेपर्यंत, राजकारणात परिवर्तनवादी बदल घडवून आणण्यासाठी जेंडर बजेटवर चर्चासत्र जवाहर भवन नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आले होते. महिलांनी राजकारणात स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचे आवाहन खा. शिंदे यांनी केले. यावेळी माजीमंत्री सलमान खुर्शीद, खा.प्रणिती शिंदे, सचिव दिव्या मदेरणा, प्रा. चेतना त्रिवेदी आदीच्या प्रमुख उपस्थिती होती. महिलांचे सक्षमीकरण व राजकारणात महिलांसाठी हक्क आणि भागीदारी सुरक्षित करणे, रोजगार, आरोग्य, स्वच्छता नागरी सुविधा, शिक्षण व इतर महिलांची स्थिती सुधारण्यासाठी, महिलांच्या विकासासाठी बजेटमध्ये तरतूद केली की नाही. त्याच प्रमाणे तरतूद केलेल्या बजेटमधील योजनांचा लाभ मिळतो की नाही, यावर चर्चा केली.

# सक्षम समाजासाठी महिलांनी आत्मनिर्भर व्हावे : राजशेखर शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

करिअर घडविताना ध्येय आणि दिशा निश्चित केली पाहिजे, यशाकडे जाण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन बाळगून कौशल्ये विकसित केली पाहिजेत, ज्ञान व एकाग्रतेचा सहाय्याने उद्योगांमध्ये उतरुन महिलांनी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होऊन सक्षम समाजासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन जिल्हा उद्योग केंद्राचे प्रकल्प अधिकारी राजशेखर शिंदे यांनी केले.



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था महिला शाखा व ल.गो.काकडे एज्युकेशनल फौडेशन सोलापूर तर्फे सरस्वती चौक येथील सेवासदन प्रशालेत आयोजित केलेल्या युवती प्रबोधन शिबीरात 'युवतींसाठी उद्योगाच्या संधी' या विषयावर ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष डॉ.श्रीकांत येळेगावकर, उपाध्यक्ष दत्तात्रय आराध्ये, काकडे फाउंडेशनच्या अलका काकडे उपस्थितीत होते. अध्यक्षस्थानी महिला शाखेच्या अध्यक्षा हेमा चिंचोळकर होत्या. प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक डॉ.काकडे यांनी केले. रोपाला पाणी घालून कार्यक्रमाचे उदघाटन झाले. आभार क्षितीजा गाताडे यांनी तर सूत्रसंचालन प्रा.शुभदा कुलकर्णी यांनी केले. अलका काकडे व मानसी कुलकर्णी यांनी बौद्धिक गेम्सद्वारे युवतींना मानसिक आरोग्याचे ज्ञान दिले. डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी वाचनसंस्कृती विकसीत करण्यासाठी प्रबोधन केले. क्षितीजा गाताडे यांनी कागदी फुले व हार करण्याचे हस्तकला कौशल्याचे प्रशिक्षण दिले तर समारोपाच्या सत्रात ॲड. मंगला जोशी (चिंचोळकर) यांनी महिला विषयक कायद्याची माहिती दिली. सत्तर युवतीं व वीस महिलांनी या प्रबोधन शिबीराचा लाभ घेतला. कार्यक्रमास ल.गो. काकडे एज्युकेशनल फौडेशनचे संचालक ॲड. अनिल काकडे दे.ऋ.ब्रा.संस्थेचे उपाध्यक्ष विजय कुलकर्णी, कोषाध्यक्ष सतिश पाटील, युवक शाखेचे अध्यक्ष सुशांत कुलकर्णी, वासंती येळेगावकर, विदुला कुलकर्णी, संगिता कुलकर्णी उपस्थित होते.

# सुयोग फौंडेशनतर्फे दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

सुयोग फौंडेशन, तामलवाडी आयोजित मोफत बौद्धिक व्याख्यानमाला समारोप व इयत्ता १० वी नंतर पुढे काय? याविषयावर(१८ मार्च) व्याख्यान संपन्न झाले आणि १० वी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम पार पडला.



प्रारंभी क्रांतीज्योती, थोर समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व्याख्याते डॉ. अनिल घनवट, सुयोग फौंडेशनचे सर्वेसर्वा डॉ. रविराज गायकवाड, तज्ञ मार्गदर्शक गुरूवर्यांनी केले. प्रास्ताविक डॉ. गायकवाड यांनी केले. यावेळी सुयोग फौंडेशनने आजपर्यंत सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, औद्योगिक, सहकार क्षेत्रात केलेले कार्य विशद केले. विद्यार्थी ओमराजे मगर, सुहाना शेख, काव्या पाटील यांनी मनोगतात सुयोग फौंडेशन आयोजित व्याख्यानमालेमुळे बोर्डाच्या पेपरची भीती नाहीशी होऊन सर्व पेपर सोपे जाण्यासाठी खूप मोलाचे मार्गदर्शन झाल्याचे नमूद केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अनिल घनवट यांनी आई-वडील, गुरूजन यांना विसरू नका, त्यांचा आदर करा, आवडीचे क्षेत्र निवडा, आपल्या घरात गावात शिक्षित लोकांचे मार्गदर्शन घ्या, समाजाप्रती आदर बाळगा असे आवाहन केले.

यावेळी दहावी बौध्दिक व्याख्यानमालेत मार्गदर्शन केलेल्या तज्ञ मार्गदर्शकांचा स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. त्यामध्ये सिध्देश्वर मसुते, डॉ. प्रशांत भागवत, युवराज पारधे, सुधाकर मुळे, प्रकाश कुंभार, सुर्यकांत कलशेट्टी, सुनिल क्षीरसागर, सदानंद दिकोंडा, संजय जवंजाळ, राजेंद्र शिनगारे, कमलाकर जाधव, फंड आदींचा समावेश होता. कुबेर पटेल याला आदर्श विद्यार्थी पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमास धनश्री बँकेच्या व्यवस्थापिका शिंदे, धपाटे, करिष्मा पटेल, राधा गायकवाड, रमीजा, जुबेर पटेल इत्यादी उपस्थित होते. सूत्रसंचालन उमेश जगताप यांनी तर आभार सिध्देश्वर मसुते यांनी मानले.




# स्त्री जन्माचे स्वागत करा : सचिन तोष्णीवाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

स्त्री व पुरुषांचे असमान प्रमाण बघता पुरुषांपेक्षा महिलांचे प्रमाण कमी होत चालले आहे. यामुळे सामाजिक उत्पात निर्माण होऊ शकतो. सामाजिक संतुलन ठेवायचे असेल तर स्त्री व पुरुष असा भेदभाव न करता आनंदाने स्त्री जन्माचे स्वागत करावे असे प्रतिपादन रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर ईलाईटचे अध्यक्ष सचिन तोष्णीवाल यांनी केले. रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर इलाईट व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने माहे मार्च महिन्यात जन्माला आलेल्या स्त्री जातीच्या बाळांचे स्वागत खेळणी व बेबी किट देऊन करण्यात आले. या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड हे होते. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. कविता चंडक, अकाउंट ऑफिसर व्यंकटेश मच्छा, आशालता मस्के, रोजमेरी गायकवाड, व्यंकटेश कंची, लक्ष्मी पारवे आदीं उपस्थित होते. याप्रसंगी रोटरी ई क्लब ऑफ सोलापूर ईलाईटच्या वतीने मार्च महिन्यात जन्माला आलेल्या बाळांना खेळणी व बेबी किट देऊन स्त्री जन्माचे स्वागत करण्यात आले. अध्यक्षीय समारोप सुगतरत्न गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागत आशालता मस्के यांनी केले. प्रास्ताविक डॉ. कविता चंडक यांनी केले. सूत्रसंचालन आकाश गायकवाड यांनी केले तर आभार रोजमेरी गायकवाड यांनी मानले.

# ॲट्रॉसिटी प्रकरणातील पीडितांना अर्थसहाय्य मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

भारतीय समाजात अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा असून अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींवर होणा-या अत्याचारांना पायबंद घालण्यासाठी देशात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (ॲट्रॉसिटी) लागू करण्यात आला. परंतु नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९९५ अंतर्गत अस्पृश्यता पाळणे किंवा पाळण्याला उत्तेजन देणे गुन्हा आहे. त्यासाठी कायद्यात शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. त्यात सुधारणा करून केंद्र सरकारने ॲट्रॉसिटी कायदा लागू केला. त्याअंतर्गत अत्याचाराचे बळी ठरलेल्या अनुसूचित जाती-जमातीच्या कुटुंबातील सदस्यांना आर्थिक साहाय्य देण्याची योजना आहे.

**प्रयास संस्थेच्या पाठपुराव्याला यश**

दरम्यान, २१ ऑगस्ट २०१३ च्या शासन निर्णयानुसार अशा पीडितांना ६० हजार ते अडीच लाखांपर्यंतच्या मदतीची तरतूद आहे. या प्रकरणातील पीडितांना अर्थसाहाय्य तात्काळत मंजूर करण्याबाबत प्रयास मागासवर्गीय बहुद्देशिय संस्थेने राज्याचे नोडल ऑफिसर तथा प्रधान सचिव डॉ हर्षदीप कांबळे व अध्यक्ष अनुसूचित जाती-जमातीं आयोग यांची समक्ष भेट घेऊन तात्काळत निधी मंजूर करण्याबाबत आवाज उठविला होता.या मागणीची दखल घेत शासनाकडून ५ कोटी ७३ लाखाचे अर्थसाहाय्य निधी मंजूर करण्यात आले.याबाबत प्रयास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सचिन शिंदे यांनी महिती दिली.



# जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी मुदतवाढ द्या; संभाजी ब्रिगेडची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

सोलापूर जात पडताळणी प्रमाणपत्र कार्यालयात पूर्णवेळ जात पडताळणी समिती अध्यक्ष नसल्याने जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी होणाऱ्या विलंबामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत असून, तात्काळ पूर्णवेळ अध्यक्ष तातडीने द्यावा किंवा शासनाच्या वतीने परत एकदा मुदतवाढ द्यावी, अशी मागणी सामाजिक व न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे संभाजी ब्रिगेडच्या वतीने निवेदन व ईमेलद्वारे करण्यात आली. विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी प्रमाणपत्राची मुदत वाढवून मिळावी अन्यथा विद्यार्थ्यांचे जर शैक्षणिक व आर्थिक नुकसान झाल्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संभाजी ब्रिगेडच्या वतीने देण्यात आला आहे.

यावेळी संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मीनल दास, शहराध्यक्ष मोनाली धुमाळ, सुनिता घंटे, राजनंदिनी धुमाळ, जयश्री पाटील, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, रमेश भंडारे, रमेश चव्हाण, वैभव धुमाळ, दिलीप निंबाळकर, शेखर कंटेकर, सतीश वावरे, अभिषेक जहागीरदार, सिद्धाराम सवळे आदी उपस्थित होते.

# बौद्ध साहित्य संमेलनाच्या लोगोचे अनावरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

सोलापूर शहरात होणाऱ्या राज्यस्तरीय बौद्ध साहित्य संमेलनाच्या लोगोचे अनावरण आज करण्यात आले. बौद्ध विचार अथांग सागर, चला सारे करूया जागर..! हे घोषवाक्य निश्चित करण्यात आले. सर्वांच्या सहभागातून शिस्तबद्ध , आदर्शवत असे हे संमेलन सर्वांसाठी विचारांची पर्वणी ठरेल, असा निर्धार व्यक्त करण्यात आला.



विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भेटीने क्रांतीप्रवण झालेल्या सोलापूर नगरीमध्ये शनिवार दि. ३ मे २०२५ रोजी बौद्ध साहित्य संमेलन होणार आहे. या संमेलनाच्या लोगोचे अनावरण आज सोलापुरातील शिक्षक सोसायटीमधील वेळूवन बुद्ध विहारात उत्साही वातावरणात करण्यात आले.भिक्षुणी धम्म चारिणी यांची मंगल उपस्थिती होती. सामाजिक न्याय विभागाचे निवृत्त सचिव रमेश उबाळे यांच्या हस्ते आणि संमेलनाचे स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ पार पडला. यावेळी संमेलनाचे कोषाध्यक्ष किरण बनसोडे, समन्वयक डॉ. सुरेश कोरे, कार्यवाह भालचंद्र साखरे, प्रा. वशिष्ठ सोनकांबळे, प्राचार्या डॉ. मीना गायकवाड, प्रा. डॉ. एम. डी. शिंदे, उद्योजक पी. आर. बनसोडे, यू. एफ. जानराव, अंगध मुके, अशोककुमार दिलपाक, प्राचार्य बोधीप्रकाश गायकवाड, कामगार नेते चांगदेव सोनवणे, अण्णासाहेब वाघमारे, चित्रकार विठ्ठल मोरे, व्ही.डी. गायकवाड, प्रदीप ताकपेरे , व्ही. ए. गायकवाड, सुमित्रा जाधव, धम्मरक्षिता कांबळे, प्रा. डॉ. डी. आर. गायकवाड , प्रा. डॉ. अरुण सोनकांबळे, निवृत्त मुख्याध्यापिका आशा शिवशरण, अभियंता शेखर शिवशरण आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. अभ्यासपूर्ण पद्धतीने हा सुंदर लोगो साकारल्याबद्दल प्रसिद्ध चित्रकार विठ्ठल मोरे यांचा सत्कार करण्यात आला. स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांनी संमेलनाची रूपरेषा मांडली. आभार धम्मरक्षिता कांबळे यांनी मानले. याप्रसंगी मारुती बेलभंडारे, अशोक इंगळे, संग्राम सोनकांबळे, सचिन गायकवाड, प्रा. नवनाथ कुचेकर, निर्मला कांबळे, मीनाक्षी बनसोडे, निर्मला कांबळे, मंगल सूर्यवंशी, आम्रपाली सर्वगोड, विनोद जाधव, आगतराव बनसोडे , व्यंकटेश सोनवणे, अंबादास बनसोडे, रत्नाकर लोंढे, नीलकंठ गायकवाड, रघुनाथ वाघे, सूर्यकांत शिवशरण, सूर्यकांत डावरे , श्रीमंत गायकवाड आदींनी विविध सूचना व मार्गदर्शन केले.

### आदर्शवत, दर्जेदार संमेलन व्हावे : रमेश उबाळे

सोलापुरातील बौद्ध साहित्य संमेलन सर्वांच्या सहभागातून शिस्तबद्ध पद्धतीने यशस्वी करूया ! आदर्शवत , दर्जेदार संमेलन पार पाडण्याचा प्रयत्न व्हावा. अश्वघोष, नागार्जुन, नागसेन, थेरीगाथा, बौद्धेतरांनी लिहिलेले बौद्ध साहित्य, धम्म संगती, नालंदा विद्यापीठ यावर विचार मंथन झाले पाहिजे, असे सामाजिक न्याय विभागाचे निवृत्त सचिव रमेश उबाळे यांनी सांगितले.

Classifieds

**विकणे आहे**
विजापूर रोड, अत्तार नगर येथील प्लॅट नं. १०१ अंबिका रेसिडेन्सी अपार्टमेंटमधील ३ BHK प्लॅट विकणे आहे.
- संपर्क -
प्रदीप चंद्रकांत ख्याडे
मो. ९८९०८६६४६४
८१७७९७८३८३

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### जिम्नॅस्टिक्स विश्वचषकात प्रणती नायकला कांस्य



**नवी दिल्ली** : भारतीय जिम्नॅस्ट प्रणती नायकने तुर्कीतील अंताल्या येथे झालेल्या एफआयजी आर्टिस्टिक जिम्नॅस्टिक्स ॲपरेटस विश्वचषकात व्हॉल्ट फायनलमध्ये कांस्यपदक मिळवले. दीपा कर्माकर (२०१८ मेर्सिन सुवर्ण, २०१८ कॉटबस कांस्यपदक) आणि अरुणा रेड्डी (२०१८ मेलबर्न विश्वचषक) यांच्यानंतर व्हॉल्टवर आंतरराष्ट्रीय पदक जिंकणारी प्रणती ही तिसरी भारतीय जिम्नॅस्ट आहे. टोकियो ऑलिम्पिक मध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या २९ वर्षीय जिम्नॅस्टने व्हॉल्ट फायनलमध्ये एकूण १३.४१७ गुण मिळवून तिसरे स्थान पटकावले आणि अमेरिकन जोडी जयला हँग (१३.६६७) आणि कलेअर पीस (१३.५६७) यांच्या मागे तिसरे स्थान पटकावले. वर्षाची सुरुवात पदकाने झाल्यामुळे अतिशय आनंद झाला. माझ्यासाठी हा एक चांगला आत्मविश्वास वाढवणारा अनुभव आहे. मी गेल्या वर्षीही जिंकली होती, त्यामुळे मला खरोखर आनंद होत आहे, असे व्हॉल्ट पात्रता फेरीत १३.३१७ गुण मिळवणाऱ्या नायकने सांगितले.

### इव्हेरेव्ह, साबालेन्काची आगेकूच

**मियामी** : येथे सुरू असलेल्या मियामी ओपन टेनिस स्पर्धेत जागतिक क्रमवारीत अव्वल मानांकित आर्यना साबालेन्काने अंतिम सोळाच्या फेरीत प्रवेश केला, तर पुरुषांच्या क्रमवारीत अव्वल मानांकित अलेकझांडर इव्हेरेव्हने जेकब फर्नलीचा ६-२, ६-४ असा पराभव करून तिसरी फेरी गाठली. सबालेन्काविरुद्ध खेळत असताना एलेना-गॅब्रिएला रुस जखमी झाली व तिने सामन्यातून निवृत्ती घेतली. तीन वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेत्या सबालेन्काचा पुढील सामना अमेरिकन गतविजेती मियामी चॅम्पियन डॅनिएल कॉलिन्स आणि स्विस पात्रताधारक रेबेका मासारोवा यांच्यातील सामन्यात विजेतीशी होणार आहे. नाओमी ओसाकाने अमेरिकन वाइल्ड कार्ड हेली बॅप्टिस्टवर ७-६(६), ३-६, ६-४ असा विजय मिळवला, तर इटलीच्या सहाव्या मानांकित जास्मिन पाओलिनीने आगेकूच केली.

### दिलीप गावितला सुवर्ण, साईवर्धन, चैतन्यला रौप्य

**नवी दिल्ली** : खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये मैदानी स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंची दमदार कामगिरी सुरूच आहे. नाशिकच्या दिलीप गावित याने पुरुषांच्या ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत टी-४७ या प्रकारातून सुवर्णपदक पटकावले. कोल्हापूरचा साईवर्धन पाटील, कराडचा साहिल सय्यद, चैतन्य पाठक हे रूपेरी यशाचे मानकरी ठरले. नाशिक जिल्ह्याचा खेळाडू असलेल्या दिलीपने ४८.७६ सेकंद वेळेत शर्यत जिंकली. हरयाणाच्या जसबीरने (४९.८८ सेकंद) रौप्य तर गुजरातच्या भाविककुमारने (५१.०८) कांस्यपदक प्राप्त केले. पुरुषांच्या एफ ३७ लांब उडी प्रकारात कोल्हापूरच्या साईवर्धन पाटीलला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. अवघ्या ३४ सेंटीमीटरने त्याचे सुवर्णपदक हुकले. साईवर्धनने ११.५९ मीटर लांब उडी मारली. कराडच्या साहिल सय्यद याने पुरुषांच्या गोळाफेकमध्ये ७.८२ मीटरचा टप्पा गाठत रौप्यपदकाचा मान पटकावला. पुरुषांच्या ४०० मीटर धावण्याच्या शर्यतीत टी-१३ प्रकारात चैतन्य पाठक याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. त्याने ५४.९९ सेकंदात हे अंतर पार केले. महिलांच्या १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत टी -५३,५४ प्रकारात गीता चौहान हिने कांस्यपदक प्राप्त केले. तिने २८.५१ सेकंदात शर्यत पूर्ण केली.

### एर्लिंग हालंडच्या गोल, नॉर्वेचा मोल्दोव्हावर ५-० ने विजय

**वॉशिंग्टन** : एर्लिंग हालंडने नोंदविलेल्या शानदार गोलच्या बळावर नॉर्वेने मोल्दोव्हाविरुद्धअच्या फुटबॉल विश्वचषक पात्रता सामन्यात ५-० ने विजय मिळविला. हालंडने नॉर्वेला विश्वचषक पात्रता मोहिमेची सकारात्मक सुरुवात करण्यास मदत केली. नॉर्वेचा तिसरा व शेवटचा विश्वचषक सामना १९९८ मध्ये झाला होता. हालंडने आर्सेनल मिडफिल्डर मार्टिन ओडेगार्ड असलेल्या संघाचे नेतृत्व केले आहे. हालंडने नॉर्वेचा दुसरा गोल केला. यामुळे २०१९ मध्ये पदार्पणानंतर त्याच्या देशासाठी ४० सामन्यांमध्ये त्याच्या अपवादात्मक कारकिर्दीत ३९ गोल झाले.कार्डिफमध्ये वेल्सने कझाकस्तानचा ३-१ असा पराभव केला. वेल्स हा ब्रिटिश संघ सलग दुसऱ्यांदा विश्वचषकात सहभागी होण्याच्या प्रयत्नात आहे. तसेच ग्रुप जे मध्ये, उत्तर मॅसेडोनियाने लिकटेंस्टाईनवर ३-० असा विजय मिळवला. ग्रुप एल मध्ये झेक प्रजासत्ताकने आयलंडवर २-१ असा विजय मिळवला व मॉन्टेनेग्रोने जिब्राल्टरवर ३-१ असा विजय मिळवला.

# हैदराबादचा राजस्थानवर ४४ धावांनी विजय

## ईशान किशनचे दमदार शतक



| ईशान किशन | नाबाद | चेंडू | चौकार | षट्कार |
|---|---|---|---|---|
| | १०६ | ४७ | ११ | ४ |

◆ **हैदराबाद, २३ मार्च**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात रविवारी येथील राजीव गांधी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या सामन्यात ईशान किशनचे शतक व ट्रॅव्हिस हेडच्या अर्धशतकाच्या बळावर सनरायझर्स हैदराबादने राजस्थान रॉयल्सवर ४४ धावांनी विजय नोंदविला.

राजस्थान रॉयल्सचा हंगामी कर्णधार रियान परागने नाणेफेक जिंकून सनरायझर्स हैदराबादला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केले. पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखालील सनरायझर्स हैदराबादने आपल्या घरच्या मैदानाचा पुरेपूर फायदा घेत जबरदस्त फलंदाजी केली व २० षटकांत ६ बाद २८६ धावा उभारल्या. आयपीएलच्या इतिहासात सनरायझर्स हैदराबादनेच नोंदविलेल्या विक्रमी धावसंख्येची बरोबरी साधण्यासाठी एक धाव कमी पडली. आयपीएल २०२४ मध्ये हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादने मुंबई इंडियन्सविरुद्ध ३ बाद २८७ धावा केल्या व ही आयपीएलच्या इतिहासातील सर्वाधिक धावसंख्या होती. विजयासाठी २८७ धावांचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सला मर्यादित २० षटकांत ६ बाद २४२ धावांपर्यंतच मजल मारता आली. संजू सॅमसन व ध्रुव जुरेलची अर्धशतकी खेळी राजस्थानला विजय मिळवून देण्यास पुरेशी ठरली नाही.

सनरायझर्स हैदराबादच्या अभिषेक शर्मा (२४) व ट्रॅव्हिस हेडने ४५ धावांची सलामी भागीदारी करत डावाची चांगली सुरुवात केली. पुढे हेड व ईशान किशनने दुसऱ्या गड्यासाठी ८५ धावांची भागीदारी केली. हेड ६७ धावांवर खेळत असताना तुषार देशपांडेने त्याला हेटमायरकडून झेलबाद केले. त्यानंतरही ईशान किशनने आपली फटकेबाजी सुरुच ठेवली व आपल्या अर्धशतकी खेळीला शतकी खेळीत रुपांतर केले.

ईशानने नितीश कुमार रेड्डी (३०), हेनरिक क्लासेन (३४), अनिकेत वर्माच्या (७) साथीने सनरायझर्स हैदराबादला ६ बाद २८६ धावा उभारून दिल्या. ईशान किशनने अवघ्या ४७ चेंडूंत ११ चौकार व ४ षट्कारांसह नाबाद १०६ धावांची खेळी केली. राजस्थानकडून तुषार देशपांडेने ४४ धावांत ३ बळी टिपण्यात यश मिळविले.

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना राजस्थान रॉयल्सची सुरुवात निराशाजनक झाली. सलामीवीर यशस्वी जयस्वाल एक धाव काढून बाद झाला. मात्र केवळ फलंदाजी करण्याची परवानगी असलेल्या संजू सॅमसनने दुखापतीची तमा न बाळगता ३७ चेंडूंत ७ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने ६६ धावांची खेळी केली आणि संघाच्या विजयाच्या आशा पल्लवीत ठेवल्या. मात्र संजूला कर्णधार रियान पराग (४) व नितीश राणाकडून (११) हवी तशी साथ मिळाली नाही. सॅमसन बाद झाला, तेव्हा राजस्थानची स्थिती १३.६ षटकांत ४ बाद १६१ अशी होती. पुढे ध्रुव जुरेल (७०), शिमरॉन हेटमायर (४२), शुभम दुबे (नाबाद ३४) व जोफ्रा आर्चरने (नाबाद १) संघाला विजय मिळवून देण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले, परंतु त्यांचे प्रयत्न अपुरे पडले. राजस्थानला मर्यादित षटकांत ६ बाद २४२ धावांपर्यंतचा टप्पा गाठता आला. हैदराबादकडून सिमरनजीत सिंग व हर्षल पटेलने प्रत्येकी २ बळी, तर मोहम्मद शमी व ॲडम झॅम्पाने प्रत्येकी १ बळी टिपला. ◀(वृत्तसंस्था)

# शार्दुल ठाकूर लखनौ संघात दाखल होणार

## दुखापतग्रस्त मोहसिन खान आयपीएलमधून बाहेर

◆ **नवी दिल्ली, २३ मार्च**

लिलावात विक्री न झालेल्या वेगवान गोलंदाज अष्टपैलू शार्दुल ठाकूर आयपीएलमध्ये परतणार आहे. लखनौ सुपर जायण्ट्स (एलएसजी) त्याला दुखापतीमुळे बाहेर पडलेल्या मोहसिन खानच्या जागी खेळाडू म्हणून खेळवणार आहे.



नवीन कर्णधार ऋषभ पंतच्या नेतृत्वाखाली लखनौ सुपर जायण्ट्स सोमवारी दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध आपल्या मोहिमेची सुरुवात करणार आहे. लखनौ सुपर जायण्ट्सने (एलएसजी) डावखुरा वेगवान गोलंदाज मोहसिन खानच्या जागी शार्दुल ठाकूरची निवड केली आहे. मोहसिन दुखापतीमुळे टाटा इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) च्या १८ व्या हंगामातून बाहेर झाला आहे, असे आयपीएलने म्हटले आहे.

अनुभवी अष्टपैलू खेळाडू शार्दुल ठाकूरला नोंदणीकृत उपलब्ध खेळाडू पूलकडून त्याच्या राखीव किमतीत २ कोटीवर करारबद्ध करण्यात आले आहे. ३३ वर्षीय शार्दुल ठाकूर सध्या विशाखापट्टणममध्ये संघासोबत आहे. भारतासाठी तिन्ही फॉरमॅटमध्ये सिद्ध कामगिरी करणारा शार्दुल मौल्यवान आयपीएल अनुभव घेऊन येतो, त्याने पाच फ्रॅन्चायझींसाठी ९५ सामने खेळले आहेत.

पायाच्या शस्त्रक्रियेनंतर मुंबईसाठी रणजी करंडकात ९ सामन्यांमध्ये ५०५ धावा व ३५ बळी टिपणारा शार्दुल ठाकूर काउंटी क्रिकेट खेळण्यासाठी एसेकससोबत करारबद्ध झाला होता. तथापि, ठाकूरने आधीच एसेकसला सूचित केले होते की जर कोणत्याही आयपीएल फ्रॅनचायझीला बदली खेळाडूची आवश्यकता असेल तर तो ही ऑफर स्वीकारेल. डिसेंबरच्या अखेरीस विजय हजारे चषकादरम्यान मोहसिनच्या उजव्या गुडघ्यात अँटीरियर क्रूसिएट लिगामेंट ताणल्या गेली होती. तरीही मोहसिन शिबिरात सहभागी झाला होता व सध्या पुनर्वास करत आहे. ◀(वृत्तसंस्था)

# या वर्षी आरसीबीमध्ये काहीतरी विशेष : मॅथ्यू हेडन

## कृणाल पांड्याची निवड योग्यच

◆ **कोलकाता, २३ मार्च**

आयपीएल हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या (आरसीबी) संघात फिरकी गोलंदाज कृणाल पांड्याची निवड योग्य आहे. यावर्षी आरसीबी संघात काही तरी विशेष आहे, असे ऑस्ट्रेलियन महान खेळाडू मॅथ्यू हेडनने म्हटले आहे.



शनिवारी आयपीएलच्या पहिल्या सामन्यात आरसीबीने कोलकाता नाईट रायडर्सचे आक्रमण रोखले व १७५ धावांचा पाठलाग करताना २२ चेंडू शिल्लक असताना ७ गडी शिल्लक राखण्न विजय मिळवला.

डावखुरा फिरकी गोलंदाज पांड्याने आरसीबीसाठी ४-०-२९-३ अशी विजयी सुरुवात केली. त्यानंतर फिल सॉल्ट (५६) आणि विराट कोहली (५९) या सलामी जोडीने पाठलाग सुरू केला. कर्णधार रजत पाटीदारने ३४ धावांचे योगदान दिले व आरसीबीने हंगामाची सुरुवात विजयाने केली.

नवीन कर्णधार म्हणून रजत पाटीदारसाठी हा एक महत्त्वाचा विजय होता. विराट कोहली उत्तम फॉर्ममध्ये असल्यामुळे निश्चितच मदत होते, असे हेडनने म्हटले आहे.

आरसीबीचा गोलंदाजी विभाग मजबूत दिसत होता. कृणाल पांड्या या सामन्यात एक उपयुक्त खेळाडू ठरला व जोश हेझलवूडनेही सर्वोत्तम कामगिरी केली. बऱ्याच काळानंतर पहिल्यांदाच आरसीबी उत्तम कामगिरी करत आहे. मला वाटते या वर्षी आरसीबीमध्ये काहीतरी खास आहे, असे तो म्हणाला.

डावखुऱ्या फिरकी गोलंदाज कृणाल पांड्याची चेंडूवर वेग बदलण्याची व यष्टीवर आक्रमण करण्याची क्षमता आरसीबीसाठी फायदेशीर ठरली. तो खूप हुशार गोलंदाज आहे, असे हेडन म्हणाला.

हेडनने आरसीबीचा मुख्य फलंदाज कोहलीचेही कौतुक केले.कोहलीला आयपीएलच्या इतिहासात केकेआरविरुद्ध १००० धावांचा टप्पा ओलांडण्यास मदत झाली. कोहलीचा जोडीदार म्हणून फिल सॉल्ट याची स्ट्राइक रेट आणि स्कोअरिंग रेट वाढविण्यास चांगलीच मदत झाली. कोहलीला त्याची साथ मिळणे अत्यंत महत्त्वाचे आह, असेही तो म्हणाला. ◀(वृत्तसंस्था)

# श्री समर्थ स्पोर्टस् नर्सरीच्या दोघांची राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेकरिता निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

येथील श्री समर्थ स्पोर्टस् नर्सरीच्या दोघांची राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेकरिता निवड झाली. बुलढाणा येथे झालेल्या १४ वर्षाखालील सब ज्युनियर राज्य अजिंक्यपद स्पर्धेत मुलांच्या गटात ईपी या प्रकारात रूद्र सरडे याने वैयक्तिक व सांघिक कांस्य पदक मिळविले. तसेच विराज कदम याने फॉईल प्रकारात वैयक्तिक रौप्य व सांघिक कांस्य पदक मिळविले. त्यांच्या या कामगिरीमुळे २७ ते ३० मार्च दरम्यान कट्टक ओरिसा येथे होणाऱ्या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेकरिता निवड झाली. या खेळाडूंना एनआयएस कोच अक्षय माने, आकाश लाटणे व अथर्व माने यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे महाराष्ट्र तलवारबाजी असोसिएशनचे उपाध्यक्ष प्रा प्रकाश काटूळे, क्रीडासंघटक राजेंद्र माने, जिल्हा सचिव दीपक शिंदे, अजिंक्य माने यांनी अभिनंदन केले





# नवीन नेतृत्वाखाली दिल्ली, लखनौ दमदार सुरुवात करण्यास उत्सुक

◆ **विशाखापट्टणम्, २३ मार्च**

१८ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात सोमवारी येथे अक्षर पटेलच्या नेतृत्वाखाली दिल्ली कॅपिटल्स आणि ऋषभ पंतच्या नेतृत्वाखाली लखनौ सुपर जायण्ट्स यांच्यादरम्यान टी-२० क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. हे दोन नवीन कर्णधार प्रथमच आमने-सामने येत असून दोघेही आपल्या आयपीएल मोहिमेची चांगली सुरुवात करण्यास उत्सुक असतील.

सलग दुसऱ्या वर्षी येथील डॉ. वायएस राजशेखर रेड्डी एसीए-व्हीडीसीए स्टेडियम दिल्ली कॅपिटल्ससाठी दोन गृह सामने खेळले जाणार आहे.

ऋषभ पंत हा आपल्या संपूर्ण आयपीएल कारकिर्दीत दिल्ली कॅपिटल्सचा खेळाडू व त्यांचा कर्णधार होता. त्याने गत वर्षी मेगा लिलावापूर्वी दिल्ली कॅपिटल्स संघ सोडी व लखनौ सुपर जायण्ट्सने त्याला २७ कोटी रुपयांच्या विक्रमी किमतीत विकत घेतले.





सर्वाधिक मानधनामुळे भारतीय यष्टिरक्षक-फलंदाज या हंगामात चर्चेत राहील, परंतु अलिकडच्या चॅम्पियन्स चषकात त्याला एकही सामना मिळाला नाही म्हणून पंतला टी-२० मध्ये आपले स्थान मजबूत करण्याची मिळेल.

दुसरीकडे, आयपीएलमध्ये पदार्पणापासून दोन वर्षे लखनौ सुपर जायण्ट्सचे नेतृत्व करणारा केएल राहुल दिल्ली कॅपिटल्समध्ये गेला आह व तो त्यांच्या योजनांमध्ये एक महत्त्वाचा खेळाडू असेल. तो एक कर्णधार म्हणून नव्हे, तर एक प्रमुख फलंदाज म्हणून कामगिरी करेल. भारतीय अष्टपैलू अक्षर पटेल दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार आहे.

मुंबई इंडियन्सप्रमाणे, दिल्ली संघालाही कर्णधार निवडताना पर्यायांची कमतरता भासली, कारण त्यांच्याकडे राहुल व्यतिरिक्त फाफ डु प्लेसिस सुद्धा आहे, परंतु फ्रॅन्चायझीने अष्टपैलू पटेलला निवडले. एकंदरीत, कागदावर पाहता, परदेशी आणि भारतीय खेळाडूंच्या समृद्ध मिश्रणासाठी दिल्ली कॅपिटल्स एक भक्कम संघ म्हणून समोर येत आहे, तर लखनौ संघाकडे काम करण्यासाठी केवळ सहा परदेशी खेळाडू आहेत. दिल्लीकडे अनुभवी फलंदाज फाफ डु प्लेसिस व ऑस्ट्रेलियन वेगवान गोलंदाज मिशेल स्टार्क सुद्धा आहे.

करुण नायरच्या स्थानिक क्रिकेटमधील समृद्ध कामगिरीमुळे दिल्लीची मधली फळी धोकादायक दिसते, यात राहुल, ट्रिस्टन स्टब्स, समीर रिझवी व आशुतोष शर्मा यांचाही समावेश आहे.

दिल्लीने आघाडीचे भारतीय फिरकी गोलंदाज पटेल आणि कुलदीप यादव यांच्या फिरकी आतक्रमणामुळे त्यांची गोलंदाजी मजबूत झाली आहे, तर वेगवान गोलंदाज टी. नटराजन्, मोहित शर्मा, मुकेश कुमार व दुष्मंथा चमीरा यांचा समावेश आहे.

दरम्यान, भारतीय खेळाडूंचा समृद्ध गट परदेशी खेळाडूंसोबत चांगले जुळवून घेऊन विजयांची मालिका एकत्र करेल अशी आशा लखनौ सुपर जायण्ट्सला आहे. मिशेल मार्श केवळ एक विशेषज्ञ फलंदाज म्हणून उपलब्ध असला तरी, लखनौला दक्षिण आफ्रिकेच्या डेव्हिड मिलर व एडन मार्कराम या जोडीकडून भरीव पुनरागमनाची अपेक्षा असेल. लखनौकडे निकोलस पूरनच्या रूपात एक परिपूर्ण आक्रमक फलंदाज आहे. आयुष बदोनी, अब्दुल समद व शाहबाज अहमद या इतर भारतीय फलंदाजांकडूनही खूप आशा आहे.

तथापि, गोलंदाजी ही लखनौसाठी चिंतेची बाब आहे. भारतीय वेगवान गोलंदाज - मयंक यादव, आवेश खान व आकाश दीप दुखापतींमुळे पुनर्वसन करत आहेत.

तथापि, शार्दुल ठाकूरच्या समावेशामुळे लखनौ संघाला बळकटी मिळाली आहे. या अनुभवी अष्टपैलू खेळाडूकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. ◀(वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**दिल्ली कॅपिटल्स वि. लखनौ सुपर जायण्ट्स**

**स्थळ** : डॉ. वाय. एस. राजशेखर रेड्डी एसीए/व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियम, विशाखापट्टणम्

**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# जुबेर शेख, सादिया मुल्ला, सृष्टी काळे कर्णधार



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

इचलकरंजी येथे होणाऱ्या भाई नेरुरकर करंडक राज्य खो-खो स्पर्धेसाठी सोलापूर जिल्ह्याचे पुरुष, महिला व किशोरी हे तीन संघ रविवारी रवाना झाले. या संघाच्या कर्णधारपदी अनुक्रमे जुबेर शेख (उत्कर्ष क्रीडा मंडळ), सादिया मुल्ला (किरण स्पोर्टस्) व सृष्टी काळे (न्यू सोलापूर क्लब) यांची निवड सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव ए. बी. संगवे यांनी जाहीर केली. तिन्ही संघास असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी शुभेच्छा दिल्या. जिल्हा संघाचे सराव शिबिर हरीभाई देवकरण प्रशाला व वसुंधरा महाविद्यालयाच्या मैदानावर झाले. या शिबिराचा समारोप स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे व शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते श्रीकांत ढेपे यांच्या हस्ते झाला. यावेळी वसुंधरा महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक अशोक पाटील, असोसिएशनचे उपाध्यक्ष सुनील चव्हाण, खजिनदार श्रीरंग बनसोडे, सहसचिव मोहन रजपूत, राजाराम शितोळे, तांत्रिक समिती सचिव उमाकांत गायकवाड, पंच मंडळ सचिव गोकुळ कांबळे, शरद व्हनकडे, अजित शिंदे, सोनाली केत, भाजपचे शहर क्रीडा प्रकोष्ठ यशवंत पाथरूट, न्यू सोलापूर क्लबचे अध्यक्ष मनोज संगावार, उपाध्यक्ष संतोष कदम, सचिव प्रथमेश हिरापुरे, आनंद जगताप आदी उपस्थित होते. किशोरी गटाचे कीट युजे कन्स्ट्रो सोल्युशनचे जवाहर उपासे यांनी पुरस्कृत केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकृष्ण कोळी यांनी केले.

**संघ : पुरुष** : जुबेर शेख (कर्णधार), विजय संगटे, जाफर शेख (न्यू सोलापूर), सौरभ चव्हाण, राकेश राठोड, समर्थ कोळी, अक्षय इंगळे, रोहन राजपूत (किरण स्पोर्टस), अजित रणदिवे, गणेश बोरकर, अजय कश्यप, कृष्णा बनसोडे (अर्धनारी नटेश्वर वेळापूर), तुषार चव्हाण (फ्लाईंग स्पोर्टस्, पंढरपूर), आकाश हजारे, अमोल केदार ( शिवप्रतिष्टान, मंगळवेढा). उमाकांत गायकवाड (प्रशिक्षक) अजित शिंदे (व्यवस्थापक).

**किशोरी** : सृष्टी काळे (कर्णधार), आसावरी जाधव, संस्कृती बिसले (न्यू सोलापूर), ऋतुजा सुरवसे, कार्तिकी यलमार, श्रेया यलमार, संध्या घाडगे, भक्ती चौधरी (वाडीकुरोली), अक्षता गंगोडा, सृष्टी हडपद, पवित्रा नागलगाव (समृद्धी स्पोर्टस्), खुशी पवार, मालन राठोड (किरण स्पोर्टस्), ज्योती बन्ने (कणबस), रिया चव्हाण(उत्कर्ष), संतोष कदम(प्रशिक्षक), सोनाली केत(व्यवस्थापिका).

**महिला** : सादिया मुल्ला(कर्णधार), सृष्टी रुपनर, गौरी काशविद, सपना बंडे, साक्षी व्हनमाने, अर्चना व्हनमाने, आरती खरात, सृष्टी नारायणी, मयुरी स्वामी, (किरण स्पोर्टस्), स्नेहा लामकाने, कल्याणी लामकाने, समृद्धी सुरवसे, साक्षी देठे, श्रुती कस्तुरे (केके स्पोर्टस वाडीकुरोली), अक्षता प्रचंडे (समृद्धी स्पोर्टस्), मोहन रजपूत (प्रशिक्षक), अमृता स्वामी (व्यवस्थापिका).


सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### स्वामीनाम हेच सर्वश्रेष्ठ धन : जेष्ठ अभिनेत्री आशा काळे

**अक्कलकोट, दि. २३ मार्च-**

जीवनामध्ये नामस्मरणाला अनन्यसाधारण महत्व आहे. स्वामीनामाची महती मनन व चिंतन केल्याने कळते. मला या स्वामींच्या नामचिंतनाने ही महती कळाली आहे. यामुळे स्वामीनाम हेच माझ्या जीवनातील सर्वश्रेष्ठ धन असल्याचे मनोगत जेष्ठ म



राठी अभिनेत्री आशा काळे यांनी व्यक्त केले. ते येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी जेष्ठ अभिनेत्री आशा काळे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी अभिनेत्री आशा काळे बोलत होत्या. पुढे बोलताना अभिनेत्री आशा काळे यांनी श्री स्वामी समर्थ महाराजानी वटवृक्षाखाली साधना केली, तो वटवृक्ष नामस्मरणरूपी सावली आहे. यात आपल्या ऐश्वर्याचा आनंद सामावलेला आहे. हा आनंद आपणाला वटवृक्षाच्या सावलीने व स्वामींच्या दर्शनातून भेटतो. त्यामुळे आता उर्वरित आयुष्यही स्वामींच्या नामस्मरणातच व्यतीत करून जीवन सार्थकी करायचं असल्याचे मनोगतही व्यक्त केले. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वला सरदेशमुख उपस्थित होते.



### सामाजिक कार्यातून स्वतःची ओळख निर्माण होते : सहायक आयुक्त सुधीर खराडकर

**सोलापूर, दि.२३ मार्च -**

आत्मोन्नती नंतर आपण समाजाचे देणे लागतो याची जाणीव ठेवली की सामाजिक कर्तव्यपूर्ती नंतर समाजही आपला पुरस्कार देऊन गौरव करतो. ही आपली ओळख अनमोल असते असे मत सोलापूरचे सहायक पोलीस आयुक्त सुधीर खिराडकर यांनी व्यक्त केले. रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ ने आयोजित केलेल्या ''व्होकेशनल अवॉर्ड्स'' च्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. सोलापुरातील व्यवसाय आणि नोकरीच्या क्षेत्रात उत्कृष्ठ काम आणि त्याच बरोबर सामाजिक कार्यातही हातभार लावणाऱ्या वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. विजय आठवले, जिमनॅस्टिक आणि फिटनेस च्या इंटरनॅशनल कोच डॉ. मोहिनी तकते, वर्ल्ड ट्रेड एक्सपो, बांबू मिशन चे गोविंद झंवर, भावसार व्हिजनचे आशिष जवळकर, आत्मनिर्भर वस्ती संघाच्या महिला बचत गटाच्या अध्यक्षा सुनिता दळवी, परिचारिका प्रज्ञा कांबळे यांना देण्यात आला. याप्रसंगी सर्व पुरस्कार विजेत्यांच्या वतीने प्राध्यापक डॉक्टर विजय आठवले यांनी मनोगत व्यक्त केले आणि क्लब चे आभार मानले. या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार रोटरी नॉर्थ च्या अध्यक्षा डॉ जानवी माखिजा आणि संचालक सुनील दावडा यांनी शाल श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन केला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय वंदना कोपकर यांनी करून दिला. पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा परिचय डॉ सचिन जम्मा, दीपक आहुजा यांनी करून दिला. रोटरी क्लब च्या कार्याची माहिती आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्नील कोंडगुळे यांनी केले तर आभार सुनील दावडा यांनी मानले. कार्यक्रमास कीर्ती दावडा, निर्मला सिताफळे, आरती गांधी, क्षितिजा गाताडे, डॉ बाळासाहेब शितोळे, बळीराम पावडे, मुकेश मेहता, सीताराम महांकाळ, दौलत सिताफळे, संजय चौगुले, दीपक आहुजा, शितोळे, दीपक आर्वे, आनंद पारेकर, गंगाधर मदभवी, आदी उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### शांताबाई केंगनाळकर



**सोलापूर दि. २३ मार्च-**

शांताबाई संगप्पा केंगनाळकर (वय ८२) रा. गुमास्ता हौसिंग सोसायटी कुमठा नाका यांचे रविवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सूना, नातवंडे असा परिवार आहे. माजी उपमहापौर स्व. संगण्णा केंगनाळकर यांच्या त्या धर्मपत्नी व शिवसेना (ठाकरे) गटाचे शहराध्यक्ष शरणराज केंगनाळकर यांच्या त्या मातोश्री होत.

### तृप्ती कोठारी



**कुर्डुवाडी, दि. २३ मार्च-**

येथील तृप्ती परेश कोठारी (वय ५०) यांचे शनिवार दि.२२ रोजी रात्री ८:३०च्या सुमारास हृदयविकारने निधन झाले. इंडियन मेडिकल असोशिएशन व स्वामीनारायण सत्संग मंडळाचे अध्यक्ष मेडिकल व्यापारी परेश कोठारी यांच्या त्या पत्नी होत. रविवारी दुपारी १ च्या सुमारास त्यांच्यावर हिंदू स्मशानभूमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, सासू, दोन मुले, दीर असा परिवार आहे.

### कुसुम जगताप



**सोलापूर, दि. २३ मार्च-**

गुरुनानक चौक येथील किरण सोसायटीमधील रहिवाशी कुसुम अर्जुन जगताप (वय ७९) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी सुना, नांतवडे असा परिवार आहे.

### गंगाबाई सोन्नद

**सोलापूर, दि. २३ मार्च-**

इंदिरा नगर अशोक चौक येथील गंगाबाई निंगप्पा सोन्नद (वय ८६) यांचे रविवार २३ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. दोंदे नगर येथील सामाजिक कार्यकर्ते बसवराज सोनंद यांच्या त्या मातोश्री होत. त्यांची अंतयात्रा सोमवार २४ मार्च रोजी सकाळी १० वाजता इंदिरा नगर अशोक चौक येथील राहत्या घरापासून निघणार आहे. रुपाभवानी रुद्रभुमी येथे अंत्यविधी होतील.

# महूद, महिम कडकडीत बंद

## सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्याचा सांगोल्यात निषेध






**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२३ मार्च-**

सोशल मीडियावर महापुरुषांचा अवमान करणारी पोस्ट टाकल्याच्या घटनेचा निषेध करण्यासाठी सांगोला तालुक्यातील महूद व महिम येथे रविवार दि.२३ मार्च रोजी दिवसभर कडकडीत बंद पाळण्यात आला. याबाबत अधिक माहिती अशी, सोशल मीडियावर थोर महापुरुषांविषयी आक्षेपहार्य पोस्ट टाकल्याची घटना शनिवार दि.२२ मार्च रोजी रात्री उशिरा चर्चेत आली. यामुळे महूद येथील मुख्य चौकात युवकांनी रात्री ११ ते १२ असा सुमारे एक तास रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी घटनास्थळी पोलीस दाखल झाले. तसेच सांगोला पोलिसांना अशी आक्षेपहार्य पोस्ट टाकणाऱ्या युवकाला महिम येथून ताब्यात घेतले. सदर घटनेचा निषेध करण्यासाठी रविवार दि.२३ मार्च रोजी संपूर्ण दिवसभर महूद व महिम परिसरात कडकडीत बंद पाळण्यात आला. सर्व दुकाने, व्यवहार शंभर टक्के बंद ठेवून नागरिकांनी यास पाठिंबा दिला. तसेच महूद व महिम बंद शांततेत पार पडला. या बंद दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही. सायंकाळी उशिरा येथील ग्रामस्थांच्या वतीने पोलीस प्रशासनास निवेदन देण्यात आले. संबंधित युवकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.



## अन्नछत्र मंडळाकडून घडतेय विशाल कार्य; अभिनेत्री आशा काळेंकडून गौरवोद्गार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २३ मार्च-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्राद्वारे धार्मिक क्षेत्रातील विशाल कार्य भोसले पिता-पुत्र यांच्या हातून घडत असल्याचे गौरवोद्गार प्रसिद्ध मराठी अभिनेत्री आशा काळे यांनी काढले.

त्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आल्या असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, नामा भोसले, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, सरफराज शेख, मैनुद्दीन कोरबू, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, धनंजय निंबाळकर, विशाल घाडगे, रोहित कदम, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## चोरी करण्यासाठी घरात घुसलेल्या महिलेकडून डॉक्टर महिलेस मारहाण

**सोलापूर, दि. २३ मार्च -**

चोरी करण्यासाठी घरात घुसलेल्या अनोळखी महिलेने डॉक्टर महिलेला मारहाण करून जखमी केले. डॉ. संगीता वसंत सोनवणे (वय ४९, रा. युनायटेड रेसिडेन्सी, रेल्वे लाईन, सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. २२ मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास डॉ. संगीता सोनवणे या राहत्या घरी होत्या. त्यावेळी चोरी करण्याच्या उद्देशाने अनोळखी महिला ही सोनवणे यांच्या घरात शिरल्याने त्या महिलेस चोरी करण्यासाठी सोनवणे यांनी प्रतिकार केला. त्यावेळी त्या अनोळखी महिलेने डॉ. संगीता सोनवणे यांना मारहाण करून चावल्याने त्यांच्या सर्वांगास मुका मार लागला. त्यामुळे डॉ. संगीता सोनवणे यांना उपचाराठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## तत्त्वांची निष्ठा उंचवणारे सचिन भैय्या

*ज्यांची उंची पाहून उंचवावी लागते मान*
*ज्यांना आहे निर्मलाताईंचा सार्थ अभिमान*
*ज्यांची आहे तत्वांशी निष्ठा महान*
*प्रत्येक कार्यात आहे प्रत्यक्षपणाची जाण*
*असे आहेत सचिन भैय्या छान*

सचिन भैय्या म्हणजे कर्तव्य व निष्ठा यांच्यासोबत सर्वांचे मन जपणारे व्यक्तिमत्व. अगदी लहानपणापासून राजकारणातलं बाळकडू मिळूनही आपली वेगळी ओळख निर्माण करणारे सचिन भैय्या. ताईंनं बरोबर लहानपणापासूनच कडू-गोड अनुभवांची शिदोरी पाठीशी बांधूनही माणुसकी जपत काम करून घेण्याची पद्धत ही भैय्यांच्या व्यक्तिमत्त्वाची एक वेगळी ओळख.मात्र कोणतेही काम प्रत्यक्ष परिस्थितीमध्ये काय आहे. हे जाणून घेऊन अगदी लहान लहान गोष्टी पर्यंत बारकाईने लक्ष देतात . सचिन भैय्या व निर्मलाताई यांना पाहून अगदी राणी लक्ष्मीबाई ची आठवण आल्याशिवाय राहत नाही. निर्मलाताई आमदार असताना सचिन भैय्या व बिपिन भैय्या यांना वेळ देता येत नव्हता. याची खंत ताईंना होती. मात्र आपली आई समाजासाठी कार्य करते हे जणू अगदी लहानपणी जाणून घेतलं होतं. आई कामात व्यस्त असताना घरातील सर्वांची काळजी घेणे



वडिलांच्या आजारपणामध्ये ताईंबरोबर खंबीरपणाने उभे राहणे.... आपलेपणाने सर्वांची विचारपूस करणे प्रत्येक गोष्टीचा मध्य साधून कामाचे नियोजन करणे . सहकार्य, सतर्कता, प्रात्यक्षिकपणा ,संभाषण कौशल्य, आपलेपणा याचे उत्तम उदाहरण म्हणजे सचिन भैय्या.. आपली आई आमदार आहे हे माहिती असूनही कोणत्याही प्रकारचा गर्व न बाळगता अगदी सामान्यातल्या सामान्याला आपलंसं करून बोलणार व्यक्तिमत्व म्हणजे सचिन भैय्या. ताईंनी एवढंच शिल्पा भाभी ना ही साथ देणारे व प्रत्येक कामात भाभिना बरोबर घेऊन चालणारे. समाजहिता बरोबरच स्त्रियांचा सन्मान करणारे. अगदी कॉन्व्हेंट स्कूल मध्ये शिकूनही मराठी माध्यमांच्या शाळांमधील उपक्रमांचे कायम कौतुक करणारे...नवीन नवीन उपक्रम कसे राबवता येतील. आधुनिक तंत्रज्ञान व डिजिटल स्कूल याचा उपयोग कसा करता येईल याचा आग्रह धरून त्यासाठी योग्य त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणारे असे सचिन भैय्या. आपल्या माणसासाठी कायम धैर्याने, निष्ठेने व कर्तुत्वपणाने त्यांची साथ देणारे मैत्रीच्या जगातला राजा माणूस. विविध क्षेत्रातील मित्र असूनही त्यांना तेवढ्याच आपुलकीने जपणार व्यक्तिमत्व म्हणजे सचिन भैय्या अगदी सामान्य माणसालाही मानसन्मान देणारे संस्कार तर ताईंकडूनच मिळाले आहेत. मात्र त्याची अगदी मनापासून जपणूक करून सर्वांना योग्य तो न्याय, मान, सन्मान देऊन आपलेपणाची भावना निर्माण करणारे व्यक्तिमत्व म्हणजे सचिन भैय्या ठोकळ होय.



**- पूनम चव्हाण,** सहशिक्षिका
श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशाला
व कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर.

## हिंदू-मुस्लिम भगिनींनी इफ्तारच्या माध्यमातून साधला संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

भारतीय समाजात एकत्र राहताना प्रत्येक समाज घटकाची एकमेकांना माहिती व्हावी. एकमेकांची जगण्याची मूल्ये, संस्कृती आणि विचारधारा कळावी. भारतीय समाजामध्ये काही गोष्टीबाबतीत असणारा विसंवाद संपवावा, या हेतूने एशियन सेंटर फॉर सोशल स्टडी आणि गाझीउद्दीन अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने 'इफ्तार संवाद' कार्यक्रमाचे आयोजन सोशल हायस्कूल येथे करण्यात आले होते. यावेळी प्रा. आस्मा खान, अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या डॉ. अस्मिता बालगावकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी




शकुंतला सूर्यवंशी होत्या. यावेळी बोलताना आस्मा खान, डॉ. अस्मिता बालगावकर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सुमित्रा पवार यांनी तर प्रास्ताविक शबाना काझी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आसिफ इकबाल, मेहबूब कोथिंबीर, महेजबीन सरफराज, सरिता मोकाशी, मुईज अहमद, अल्ताफ कुडले आदींनी परिश्रम घेतले.

## उध्दव नगर-२ परिसरात स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च -**

उद्धव नगर भाग -२ परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाचे पाचवे वर्ष ३१ मार्च रोजी श्री स्वामी समर्थ प्रकट दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी सकाळी ७ ते ८ महाअभिषेक, ९ ते १२ भजन व कीर्तन १२ ते १२.३० महाआरती व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रकटदिनाच्या कार्यक्रमासाठी श्रीशैल कोरे, सुमित डिगे, नामदेव कोरे, तुकाराम कोरे यांचे सहकार्य लाभले. या संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजक श्री प्रभाकर वाघमारे व महानंदा वाघमारे यांनी केले आहे. या कार्यक्रमास सर्व स्वामीभक्तांनी येण्याचे




आवाहन वाघमारे परिवाराकडून करण्यात आले आहे.

## गंगाधर गाडगीळ : व्यक्ती आणि लेखक

मी १९८८ साली मुंबई शेअरबाजारात नोकरीला लागलो तेंव्हा माझ्या लक्षात आले की त्यावेळी बहुतेक शेअर दलालांच्या ऑफिसात रोखीचे व्यवहार सांभाळणारी माणसे ही महाराष्ट्रीय मंडळी असतात. नंतर कधीतरी त्याचे कारण सांगताना एक गुजराती शेअर दलाल मला म्हणाला ... तुम्ही मराठी माणसे चोख आणि रोख असता. तुम्ही गडबड करून करून फार फार तर काय कराल ? ऑफिसच्या कामासाठी बसने जाल आणि ऑफिस कडून टॅक्सीचे पैसे घ्याल. त्यातही मनोमन तुम्ही स्वतःला कदाचित नावे ठेवाल. असच थोडेसे काहीतरी म्हणजे ..आपण सर्वसामान्य मराठी माणसे स्वतःचे वर्णन पापभीरू असे करण्यात धन्यता मानतो. पापभीरू म्हणजे काय ? पाप करण्याची इच्छा आहे , संधी आहे ; पण हिंमत नाही अशी व्यक्ती आणि वृत्ती म्हणजे पापभीरू अशा पापभीरू मराठी माणसाचा साळसूदपणा म्हणजे गंगाधर गाडगीळ यांच्या लेखनाचा नायक ! हा केंद्रबिंदू धरून लेखन करणाऱ्या गंगाधर गाडगीळ यांचे सध्या जन्मशताब्दी वर्ष सुरू आहे. त्यानिमित्ताने ग्रंथाली प्रकाशनने एक पुस्तिका गंगाधर गाडगीळ : व्यक्ती आणि लेखक या नावाने प्रकाशित केली आहे. ६० पानी या पुस्तिकेची ( देणगी मूल्य १०० रुपये ) पहिली आवृत्ती १ मार्च २०२५ रोजी प्रसिध्द झाली आहे.

रामदास भटकळ , सुधा जोशी , सुरेखा सबनीस या तिघांनी गंगाधर गाडगीळ यांच्या बाबत लिहिलेले लेख , गंगाधर गाडगीळ यांच्या स्वतःच्या लेखनातील काही भाग आणि त्यांची एक नाटिका यांचा समावेश या पुस्तिकेत आहे. त्याशिवाय गंगाधर गाडगीळ यांची प्रकाशित पुस्तकांची समग्र यादी या पुस्तिकेच्या शेवटी देण्यात आली आहे. त्यातून गंगाधर गाडगीळ हे जसे




मराठी नवकथेचे प्रणेते म्हणून नावाजले जातात , तेवढे नसले तरी कविता हा साहित्यप्रकार वगळता बाकीचे अनेक साहित्य - प्रकार त्यांनी हाताळले आहेत ही बाब ही पुस्तिका प्रकर्षाने अधोरेखित करते. या पुस्तिकेतील सर्वोत्तम भाग म्हणजे उध्वस्त करणारे अनुभव या नावाने असणारे या पुस्तकातले प्रकरण. गंगाधर गाडगीळ यांनी लिहिलेल्या एका मुंगीचे महाभारत या त्यांच्या चरित्रातील तो उतारा आहे. एकंदरीतच गंगाधर गाडगीळ यांनी लिहिलेल्या अनेक साहित्यकृती आणि हे चरित्र याची एक वेगळीच संगती असावी असे वाचकाला वाटायला लावणारे असे हे प्रकरण आहे हे निश्चीत!

रामदास भटकळ सरांनी गंगाधर गाडगीळ यांच्यावर या पुस्तिकेत लिहिलेला लेख अगदी अप्रतिम आहे. लेखक - प्रकाशक म्हणून व्यावसायिक नाते आणि मित्र म्हणून कौटुंबिक नाते यांचे संतुलन फार उत्तम या लेखात सांभाळले आहे. पण या लेखाबाबत एक गंमत झाली आहे. ती म्हणजे रामदास भटकळ सरांनी त्यांच्या या लेखात गंगाधर गाडगीळ यांच्या लिलीचे फूल आणि दुर्दम्य या दोन पुस्तकांचा गंगाधर गाडगीळ यांनी लिहिलेल्या कादंबऱ्या म्हणून उल्लेख केला आहे. या पुस्तिकेच्या शेवटी गंगाधर गाडगीळ यांचे समग्र प्रकाशित साहित्य यादी प्रकाशित करण्यात आली आहे. त्यातही या दोन पुस्तकांचा कादंबरी विभागात समावेश आहे. त्याव्यतिरिक्त रामदास भटकळ सरांनी त्यांच्या या लेखात प्रारंभ , भरारी , गंधर्वयुग , दादाभाई नवरोजी याही कादंबऱ्या गंगाधर गाडगीळ यांनी लिहिल्या असे म्हटले आहे. पण यांचा उल्लेख या पुस्तिकेच्या शेवटी दिलेल्या यादीत नाही. याउलट , त्या यादीत संघर्ष चा उल्लेख आहे ; पण त्याचा उल्लेख रामदास भटकळ सरांच्या लेखात नाही. कदाचित ही कादंबरी अनुवादित असल्याने भटकळ सरांनी त्यांच्या लेखात याचा उल्लेख केला नसावा. कदाचित हे नजरचुकीनेही झाले असावे ; पण त्यामुळे वाचकांचा गोंधळ होऊ शकतो. गंगाधर गाडगीळांचे कथा - साहित्य हा सुधा जोशी यांचा लेख गंगाधर गाडगीळ यांच्या प्रदीर्घ कथालेखन कारकिर्दीचा समग्र , संपूर्ण आढावा आहे. निवडक गंगाधर गाडगीळ या सुधा जोशी यांनी संपादित केलेल्या आधीच्या ग्रंथातला हा भाग आहे. संक्षिप्त पण संतृप्त असेच या लेखाचे वर्णन करावे लागेल.

सरतेशेवटी ,

१. या पुस्तकातील प्रत्येक लेखाच्या खाली तो लेख लिहिल्याची किंवा पूर्व - प्रसिद्धीची तारीख दिली गेली असती तर तो लेख वाचक म्हणून समजून घेताना तो तो लेख काळा - वेळेच्या परिप्रेक्षात जास्त चांगलेपणाने बसवता आला असता.

२. आर्थिक नवलकथा हा प्रकार आपल्या मराठी भाषेत रुजवण्याचे श्रेय फार मोठ्या प्रमाणावर गंगाधर गाडगीळ यांना जाते. हा प्रकार आपल्या मराठी मधे त्या काळातील दुसऱ्या कोणत्याही दिग्गज साहित्यिकांनी हाताळलेला नाही. त्यामुळे गंगाधर गाडगीळ यांच्या अशा एखाद्या आर्थिक नवलकथेचा , अगदी त्रोटक स्वरूपात का होईना , या पुस्तिकेत करता आला असता तर ते जास्त उचित झाले असते .

३. रामदास भटकळ सरांचा लेख आणि गंगाधर गाडगीळ समग्र यादी यातली तफावत टाळता आली असती तर बरे झाले असते.

४. या पुस्तिकेत अनुक्रमणिका असणे आवश्यक वाटते.

५. या पुस्तिकेच्या शेवटी गंगाधर गाडगीळ यांच्या आजपर्यंत प्रकाशित झालेल्या सर्व पुस्तकांची यादी देताना ही पुस्तके खरेदीसाठी कुठे उपलब्ध होऊ शकतील हेही सांगितले गेले असते तर जास्त बरे झाले असते असे वाटते.

मात्र जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने मराठीतील तीन दिग्गज साहित्यिकांचे ( विद्याधर पुंडलिक , जयवंत दळवी आणि गंगाधर गाडगीळ ) कर्तृत्व शब्दबद्ध ( ऊ्ीशपीीरीळेप) करण्याचे जे हे काम ग्रंथाली प्रकाशन ने केले आहे त्याबद्दल ग्रंथाली प्रकाशन , सुदेश हिंगलासपूरकर, कुमार केतकर , डॉ. लतिका भानुशाली यांचे निश्चितच अभिनंदन केले पाहिजे आणि मनःपूर्वक आभार सुद्धा मानलेच पाहिजेत.

**- चंद्रशेखर टिळक**

## संक्षिप्त वृत्त



### ठोकळ प्रशालेतील विद्यार्थ्यांची ९५ माय एफएम रेडिओ स्टेशनला भेट

**सोलापूर दि. २३ मार्च -**

श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेतील इयत्ता आठवी मधील विद्यार्थी तसेच शिक्षकांनी जुळे सोलापूर येथील ९५ माय एफएम या रेडिओ प्रसारण केंद्रास भेट दिली. माय ९५ हा शब्द कदाचित भारतातील सोलापूर येथील मायएफएम ९५ या रेडिओ प्रसारण केंद्राचा संदर्भ घेतो. हे एक रेडिओ स्टेशन आहे जे त्याच्या सर्जनशील आणि नाविन्यपूर्ण प्रोग्रामिंगसाठी ओळखले जाते. हे स्टेशन २०१८ मध्ये उघडले गेले आणि सहा वर्षांपासून ते कार्यरत आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना संकीर्ण माहिती देण्यात आली .विद्यार्थ्यांनी या रेडिओ केंद्राद्वारे प्रसारित होणाऱ्या विविध कार्यक्रमाविषयी, मुलाखती, कलाकाराविषयी, तंत्रज्ञान, व मनोरंजना विषयी माहिती जाणून घेतली. साऊंड इंजिनियर सौरभ म्हमाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. रेडिओजॉकी आरजे श्रद्धा व आरजे अमृत यांनी आपल्या भाषेच्या शैलीतून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. विद्यार्थ्यांनी रेडिओ जॉकींशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी आकाशवाणीमध्ये वापरल्या जाणाऱ्या सॉफ्टवेअर आणि तंत्रज्ञानाबद्दल जाणून घेतले. ९५ मायएफएम सोलापूर रेडिओ केंद्राचे व्यवस्थापक सचिन खानापुरे यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमाबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष सचिन ठोकळ, संचालिका शिल्पा ठोकळ, सचिव भिकाजी गाजरे यांनी विद्यार्थी तसेच शिक्षकांचे कौतुक केले. उपक्रमासाठी प्राचार्य डी.डी. गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक अर्जुन सुरवसे, युसुफ शेख, सहशिक्षिका पूनम चव्हाण यांनी परिश्रम घेतले.



### जनसुरक्षा विधेयकाला माकपचा विरोध; आडम मास्तरांकडून आंदोलन

**सोलापूर, दि. २३ मार्च-**

हा कायदा म्हणजे मानव अधिकार,संवैधानिक अधिकार,नैसर्गिक न्यायतत्व यांचे पूर्णतः उल्लंघन करणारा आणि हुकूमशाही राजवट प्रस्थापित करणारा आहे.म्हणून हे विधेयक रद्द होणे अत्यंत गरजेचे आहे. लाठ्या काट्या तुरुंगवास होऊ, रक्त सांडू पण कामगार आणि जनतेविरुद्ध कायदे हाणून पाडण्याचा निर्धार केल्याचा इशारा ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ नरसय्या आडम मास्तर यांनी दिला . सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियनसच्या वतीने २३ मार्च हौतात्म्य दिनाचे औचित्य साधून सीटूचे राज्य महासचिव कॉ.एम.एच.शेख यांच्या नेतृत्वाखाली रविवारी जिल्हा परिषद पुनम गेट येथे महाराष्ट्र जन सुरक्षा विधेयक आणि कामगार विरोधी कायद्या विरोधात निदर्शने पार पडले.यावेळी मंचावर एम.एच.शेख, नसीमा शेख, नलिनी कलबुर्गी, व्यंकटेश कोंगारी, रंगप्पा मरेड्डी, अनिल वासम, दत्ता चव्हाण, विरेंद्र पद्मा, फातिमा बेग, श्रीनिवास म्हेत्रे आदींची उपस्थिती होती. अमित मंचले, सलीम मुल्लादाउद शेख, नरेश दुगाने,राजेश काशिद, जबर सगरी, नितीन कोळेकर, बजरंग गायकवाड, सुजित जाधव, रहीम नदाफ, प्रशांत चौगुले,प्रकाश कलबुर्गी, रफिक नदाफ,युसुफ शेख, विल्यम ससाणे,वसीम मुल्ला,बापू साबळे विक्रम कलबुर्गी,आप्पाशा चांगले, राजेंद्र गेंट्याल,हसन शेख,वसीम देशमुख, मोहन जंगम, नरसिंग म्हेत्रे, आदींसह जनसमुदाय मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ॲड कॉ.अनिल वासम यांनी केले.

# बुकडेपो, थंड पाणी, निवारा शेड, बैठक व्यवस्थेची सोय

**दक्षिणच्या तहसीलदारांचा लोकहितार्थ उपक्रम**

**नागरिकांनी व्यक्त केले समाधान**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

दक्षिण सोलापूर तहसीलदार कार्यालयात नागरिकांसाठी वाचन कोपरा करण्यात आला आहे. दैनिकांसह वाचनासाठी ग्रामगीता, पद्मभूषण तथा सोलापूरचे सुपुत्र मारुती चित्तमपल्ली यांची पुस्तके, टाईम पास, मनोरंजन यासह सर्व वृत्तपत्रे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. उन्हात इकडे तिकडे फिरण्यापेक्षा नागरिक इथे बसून पुस्तके वाचून ज्ञानात भर घालत आहेत. या उपक्रमाबद्दल तहसीलदार किरण जमदाडे यांचे कौतुक होत आहे.

सोलापूरमधील उन्हाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेल्याने अंगाची लाही लाही होत आहे. या तळपत्या उन्हात कामानिमित्त दक्षिण सोलापूर तहसील कार्यालयात प्रवेश करताच निवारा शेड, बाकडयांची बैठक व्यवस्था , थंड पाण्याचे वॉटर प्युरिफायर, एल ई स्क्रीन, स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष व वाचनासाठी मासिके व वृत्तपत्रे ठेवलेली आहेत. तहसीलदार किरण जमदाडे यांनी ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांसाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहेत. दक्षिणमधील नागरिकांना विविध शासकिय कामांसाठी शहरातील दक्षिण तहसील कार्यालयाला जावे लागते. शिधापत्रिका विषयक कामे, निराधार योजनेची कामे, रेकॉर्ड, निवडणूक तसेच दैनंदिन कामासाठी ग्रामीण भागातून शेतकरी, खातेदार व नागरिकांची नेहमी वर्दळ असते. तहसील जुनी दगडी इमारत, अपुरी जागा आणि आजुबाजुला असणाऱ्या अन्य शासकीय कार्यालयांमुळे येथे नेहमीच गर्दी असते.

संजय गांधी, श्रावणबाळ, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळसह अन्य निराधार योजनांसह पुरवठा व अभिलेख कक्ष या शाखेतील कामांसाठी गर्दी असते. काम होईपर्यंत वेळेचा सदुपयोग म्हणून लोक वाचत बसतात. मोबाइल चार्जिंगसाठी तहसीलदार यांनी चार्जिंग पॉईंटची व्यवस्था केली आहे. कमी वेळेत जलद चार्जिंगचे चार्जर बसवण्यात आले स्वच्छ आणि थंड पिण्याच्या पाण्याचीही सोय आहे. आकर्षक रोपांच्या कुंड्या ठेवण्यात आल्या आहेत.

**टाईमपास करताना ज्ञानार्जनास महत्व**

या कार्यालयात ग्रामीण भागातील नागरिकांची नेहमीच वर्दळ असते. सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. अधिकारी व संबंधित कर्मचारी वरिष्ठांच्या बैठकीला गेले असतील तर ते येईपर्यंत येथे आराम करत पुस्तके वाचत बसता येईल. दहा मिनिटाचे टाईमपास म्हणत मनोरंजनासह ज्ञानार्जन होते.

**- किरण जमदाडे, तहसीलदार, दक्षिण सोलापूर**

विविध शासकीय कामांच्या निमित्ताने तहसील कार्यालयात येत असतो. तहसीलदार किरण जमदाडे आहे यांनी उन्हाळ्यात लोकांना सावली, थंड पाणी, मोबाईल चार्जिंग व वाचनाची सोय उपलब्ध करून दिली आहे. तहसीलदार किरण जमदाडे यांचे कार्य कौतुकास्पद आहे.

**-शिवानंद बंडे, सरपंच, नांदणी**

शासकीय कामांसाठी दक्षिण तहसील कार्यालयात टाईमपास म्हणून बसल्यानंतर विविध वृत्तपत्रांसह नामवंत लेखकांची पुस्तके वाचण्याचा योग आला. शिवाय थंड पाणी व चार्जिंग स्टेशनचाही लाभ घेतला. तहसीलदारांचे स्तुत्य उपक्रम आहे.

**- सिध्दाराम स्वामी, शेतकरी, कूसुर**

# रस्त्यावरील सांडपाण्याने व्यापाऱ्यांना त्रास

**मंद्रुप ग्रामपंचायतीकडून कारवाईची मागणी**

**सांडपाण्याचा व्यवसायांना फटका**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

मंद्रुप मधील हुतात्मा चौक ते महात्मा बसवेश्वर चौकपर्यंत असणाऱ्या मुख्य रस्त्यावर घरातील सांडपाणी रस्त्यावर सोडल्यामुळे नागरिकांसह बाजारपेठेतील व्यापार्यांनाही त्रास होत आहे . मंद्रुप ग्रामपंचायतने रस्त्यावर पाणी सोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे .

मंद्रुप ग्रामपंचायतीकडून दीड वर्षांपूर्वी जोड बसवण्णा मंदिर ते महात्मा बसवेश्वर चौक पर्यंत ५०० मीटर अंतराचा सिमेंट कॉंक्रीट रस्ता करण्यात आला आहे. सुरुवातीपासूनच हा रस्ता निकृष्ट करण्यात येत असल्याचे नागरिकांनी तक्रार केला आहे. शिवाय या रस्त्यावर घरातील सांडपाणी सोडल्यामुळे रस्त्याचा दर्जा खालावत जाऊन खड्डे पडले आहेत. रस्त्यावरील सिमेंटचा थर पूर्णपणे उडून चालला आहे. मुख्य रस्त्यावर सोनेचांदी, खत बी बियाणे, किराणा, कापड, इलेक्ट्रीकसह इतर दुकानांचा बाजारपेठ आहे. त्यामुळे रस्त्यावरून रहदारी मोठ्या प्रमाणात सुरु असते. वाहनचालकांसह अबालवृद्धांना सांडपाण्याचा त्रास होत आहे. मळसिध्द देवालयासह इतर मंदिरांना जाणाऱ्या भक्तांना सांडपाण्यातून रस्ता काढत मंदिराला जावे लागत आहे. त्यामुळे भाविकांमधूनही नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीकडून सोडण्यात आलेल्या नळाचे पाणी ओव्हरफ्लो झाल्यानंतर नागरिकांकडून सांडपाणी बिनधास्तपणे रस्त्यावर सोडण्यात येते. यामुळे परगावहून आलेल्या नागरिकांमधून ग्राम पंचायतच्या कारभाराबद्दल नाराजी व्यक्त होत आहे.



**व्यवसायांवर परिणाम**

मुख्य रस्त्यांवर बाजारपेठ असल्याने मोठया प्रमाणात दुकाने आहेत. त्यामुळे दररोज रस्त्यावर सांडपाणी असल्याने ग्राहकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. व्यवसायावर परीणाम होत असल्याने ग्रामपंचायतीने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावे.

**- बसवराज सुतार, व्यापारी मंद्रुप**

**दंडात्मक कारवाई करणार**

ग्रामपंचायतने बनवलेल्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्यावर नागरिकांकडून सांडपाणी सोडण्यात येते . यामुळे रस्त्यांवरून रहदारी करणार्यांना त्रास होत आहे . नागरिकांना वारंवार सूचना देऊनही सांडपाणी रस्त्यावर सोडण्यात येते आहे . त्यामुळे ग्रामपंचायत मध्ये ठराव करून सांडपाणी सोडणार्यांवर दंडात्मक कारवाई करणार आहे.

**- नागेश जोडमोटे, ग्रामपंचायत अधिकारी, मंद्रूप**

# गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**यंदा हरिनाम सप्ताहाचे ५१ वे वर्षे**


**तभा वृत्तसेवा,**
**तामलवाडी, दि. २३ मार्च-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे चैत्र शुद्ध १ रोजी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ होणार असून, यंदा या अखंड हरिनाम सप्ताहाचे हे ५१ वे वर्षे आहे.

संतश्रेष्ठ जगद्‌गुरु तुकाराम महाराज यांचे विद्यमान वंशज वै. सद्‌गुरू सोपानकाका महाराज देहुकर, वै. श्रीगुरु ज्ञानेश्वर (माऊली) महाराज देहुकर यांच्या कृपाशीर्वादाने श्रीगुरु बापुसाहेब महाराज देहुकर यांच्या मार्गदर्शनाखाली व श्रीगुरु कान्होबा महाराज देहुकर यांच्या उपस्थितीत गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर तामलवाडी येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ होणार आहे.

यंदा चैत्र शु. १, वार रविवार रोजी सकाळी गाथापुजन करुन सप्ताहास प्रारंभ करण्यात येणार असून, सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रमामध्ये पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते १० गाथा पारायण, १०.३० ते १२.३० गाथा भजन, दुपारी ३ ते ५ गाथा पारायण, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, ६ ते ७ प्रवचन, व रात्री ८ ते १० संकीर्तन सेवा होणार आहे. या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये ह.भ.प. विनायक पाटील महाराज, ह.भ.प. अंगद चुंगे महाराज, ह.भ.प. पंढरी पाटील महाराज, ह.भ.प. शाम जोशी महाराज, ह.भ.प. सचिन जोशी महाराज, ह.भ.प. दत्तात्रय क्षीरसागर महाराज यांची प्रवचन सेवा होणार आहे तर श्रीगुरु हरिप्रसाद महाराज देहुकर, श्रीगुरु चैतन्य महाराज देहुकर, श्रीगुरु बापुसाहेब महाराज देहुकर मळोलीकर, श्रीगुरू भानुप्रसाद महाराज देहुकर, श्रीगुरु महेश महाराज देहुकर, श्रीगुरु कान्होबा महाराज देहुकर यांची संकीर्तन सेवा होणार आहे तर श्रीगुरु बापुसाहेब महाराज (अण्णासाहेब) देहुकर यांची काल्याची संकीर्तन सेवा होईल व दिंडी नगरप्रदक्षिणा होऊन सप्ताहाची सांगता होईल. या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये गावातील सहदेव विभुते, वसंत घोटकर, विलास शिंदे, शंकर सुधाकर घोटकर, सुनिल माळी, हणमंत पाटील, जेष्ठ पत्रकार अविनाश गायकवाड यांच्या वतीने वारकऱ्यांची अल्पोपहाराची सोय करण्यात आली आहे. तर गणेश चेंडके, विश्वंभर घोटकर, संतोष शिंदे, रामदास गडगडे, रवी राजकुमार पाटील, अर्जुन लोंढे, त्र्यंबक दिक्षीत, शिवदास पाटील, बाळासाहेब पाटील, यशवंत लोंढे, डॉ. रविराज गायकवाड व दत्तात्रय वडणे हे अन्नदाते वारकऱ्यांसाठी अन्नदान करणार आहेत. तसेच सप्ताहातील संपूर्ण चहापानाची व्यवस्था अप्पुराजे भोसले यांच्यावतीने करण्यात येणार आहे.






# मांगल्याची गुढी उभारुन करा हिंदू नववर्षाचे स्वागत

**पंचांगकर्ते मोहन दाते यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

साडेतीन मुहूर्तापैकी एक शुभ दिवस आणि नववर्षाचा आरंभदिन म्हणून गुढीपाडव्याचे महत्व आहे. हिंदू तथा मराठी नववर्षाची सुरुवात गुढीपाडव्याने होत आहे. नवीन शके १९४७ या संवत्सराचे नाव विश्वावसु संवत्सर असे आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी आपल्या नवीन वर्षाची सुरुवात होते. या दिवशी सकाळी घरोघरी गुढ्या उभ्या करुन, तोरणे लावून नवीन वर्षाचे स्वागत केले जाते. आपली कालगणना हजारो वर्षे जुनी आहे. ती ग्रहांवर आधारित कालगणना पंचांगाच्या माध्यमातून आपल्याला कळते म्हणून संवत्सरारंभाच्या दिवशी गुढीबरोबर पंचांगावरील गणपतीचे पूजन करावयास सांगितले आहे.

दरम्यान, हा उत्सव घरोघरी करावयाचा असल्यामुळे आपण स्वतंत्रपणे राहात असल्यास आपल्या घरी ही पूजा करुन गुढी उभी करण्यास काहीच हरकत नाही. त्याकरिता असे कोणतेच बंधनही नाही. त्यामुळे गुढीपूजन, पंचांगपूजन अवश्य करावे. गुढीपूजनाकरिता कोणताही विधी नाही. गुढी उभी करणे हे मांगल्याचे प्रतीक आहे. त्यामुळे मंगलमय वातावरण तयार व्हावे याकरिता जे काही करता येण्यासारखे असेल तर सर्व करता येते. गुढी उभी करण्यासाठी आपण जी काठी वापरणार आहोत ती स्वच्छ धुवून, पुसून घ्यावी. त्याला रेशमी वस्त्र बांधून त्यावर एखादे चांदीचे भांडे किंवा घरातील कोणतेही स्वच्छ भांडे ठेवावे. गुढीला कडुनिंबाची पाने, आंब्याच्या डहाळ्या बांधाव्यात, साखरेची माळ घालावी. जिथे गुढी उभी करावयाची आहे ती जागा स्वच्छ करुन रांगोळी काढावी. अंघोळ करुन त्या जागी गुढी बांधावी व हळद, कुंकू, फुले वाहून तिची पूजा करावी. ब्रह्मदेवाने या सृष्टीला चालना दिलेली असल्याने या गुढीलाच ब्रह्मध्वज असेही म्हटले जाते. म्हणून ब्रह्मध्वजाची मंत्राने प्रार्थना करावी.



**सोलापूर : गुढीपाडव्यानिमित्त शहरातील बाजारात साखरेचे हार, खोबरे-खारीक हार दाखल झाले आहेत. रविवार लोकमान्य टिळक चौक परिसरात टिपलेल हे छायाचित्र. (छायाचित्र केवल तिवारी)**

**ब्रह्मध्वज नमस्तेऽस्तु सर्वाभिष्ट फलप्रद ।**
**प्राप्तेऽस्मिन्वत्सरे नित्यं मदगृहे मंगलं कुरु ।।**

ही प्रार्थना झाल्यावर पंचांगाचे पूजन करुन नवीन वर्षाचे पहिल्या दिवसाचे पंचांग वाचावे. त्यानंतर कडुनिंब, गूळ, जिरे आदी घालून केलेले कडुनिंबाचे पाणी घ्यावे. त्यानंतर वर्षभरातील महत्वाच्या घटना पिक-पाणी यांची माहिती करुन घ्यावी. सकाळी लवकर गुढी उभी करावी आणि सूर्यास्ताचे सुमारास नमस्कार करून ती पुन्हा उतरवून ठेवावी.

**- मोहन दाते, पंचांगकर्ते**

**या वर्षातील तिथीनुसार काही प्रमुख दिवस**

| | |
|---|---|
| गुढीपाडवा | ३० मार्च, रविवार |
| श्रीराम नवमी | ६ एप्रिल, रविवार |
| अक्षय्य तृतीया | ३० एप्रिल, बुधवार |
| बुद्धपौर्णिमा | १२ मे, सोमवार |
| आषाढी एकादशी | ६ जुलै, रविवार |
| श्रीकृष्ण जयंती | १५ ऑगस्ट, शुक्रवार |
| गणेशोत्सव | २७ ऑगस्ट, बुधवार ते ६ सप्टेंबर, शनिवार |
| घटस्थापना | २२ सप्टेंबर, सोमवार |
| दसरा | ऑक्टोबर, गुरुवार |
| नरक चतुर्दशी | २० ऑक्टोबर, सोमवार |
| लक्ष्मीपूजन | २१ ऑक्टोबर, मंगळवार |
| दिवाळी पाडवा | २२ ऑक्टोबर, बुधवार |
| भाऊबीज | २३ ऑक्टोबर, गुरुवार |
| कार्तिकी एकादशी | २ नोव्हेंबर, रविवार |
| दत्त जयंती | ४ डिसेंबर, गुरुवार |
| मकर संक्रांति | १४ जानेवारी, बुधवार |
| महाशिवरात्रि | १५ फेब्रुवारी, रविवार |




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## महावितरणच्या तंत्रज्ञाला मारहाण करणाऱ्यावर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

थकीत वीज बिलाचा भरणा करण्यासाठी सांगायला गेलेल्या वीज वितरण विभागाच्या कर्मचाऱ्यास ग्राहकाने मारहाण केली, तसेच वीट हातात घेवून मारण्यासाठी अंगावर गेला. याप्रकरणी एकावर शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने जोडभावी पेठ पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना शनिवारी सकाळी अकराच्या सुमारास मड्डी वस्ती सोलापूर या ठिकाणी घडली आहे. याबाबत महावितरण विभागाचे तंत्रज्ञ स्वप्निल बळीराम शेप (वय ३१ रा. जुनी मिल कपांउड,एम एसईबी कॉलनी सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून राजू राजाराम निंबाळकर यांचा मुलगा (रा. मड्डी वस्ती सोलापूर) यांच्यावर गुन्हा नोंद झाला आहे. तंत्रज्ञ स्वप्नील शेव त्याचा मित्र वरिष्ठ तंत्रज्ञ संतोष जाधव मड्डी वस्ती परिसरात थकीत वीज बिल च्या पावत्या वाटत होते. राजू निंबाळकर यांच्या घरी गेले होते. थकीत वीज बिल भरा अन्यथा वीज पुरवठा खंडीत केला जाईल असे सांगत असताना आरोपीने शिवीगाळ करून फिर्यादीच्या तोंडावर चापट मारली. गळ्यावर नखाने ओरबडले. सदर ठिकाणी पडलेली विट उचलून मारण्यासाठी फिर्यादीच्या अंगावर धावून गेला,फिर्यादी करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला असे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक बामणे करीत आहेत.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### बालरंगभूमीतर्फे नाट्याभिनयातील यशस्वी बालकलावंतांचा सत्कार

**सोलापूर, दि. २३ मार्च-**

बालरंगभूमी परिषद सोलापूर जिल्हा शाखेच्या वतीने जागतिक रंगभूमी दिनानिमित्त शहर व जिल्ह्यातील नाट्याभिनयातील यशस्वी बालकलावंतांचा सत्कार सोहळा गुरुवार दि. २७ मार्च रोजी सकाळी १० वाजता चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशालेत आयोजित करण्यात आला आहे. ज्या बाल कलावंतांनी एप्रिल २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत विविध नाट्य स्पर्धांमध्ये सहभागी होऊन शहरस्तर, जिल्हास्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारप्राप्त केले आहेत. अशा बालकलावंतांच्या पालकांनी व शाळाप्रमुखांनी मंगळवार दि. २५ मार्च पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशालेत पुरस्काराच्या प्रमाणपत्राची प्रत व नावासह माहिती जमा करावे. अधिक माहितीसाठी सुभाष माने ८१४९८३१३४४ व अर्चना अडसूळ ८६६८७९७५२७ यांच्या संपर्क साधावा, असे आवाहन बालरंगभूमी परिषद जिल्हा शाखेच्या अध्यक्षा सीमा श्रीगोंदेकर-यलगुलवार यांनी केले आहे.

### सोमवारपासून सूर्यनमस्कार व आसने या योगसत्राचे आयोजन

**सोलापूर, दि. २३ मार्च-**

विवेकानंद केंद्र कन्याकुमारी शाखेच्या वतीने योगिक सूर्यनमस्कार व आसने या योगसत्राचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २४ ते २ एप्रिल २०२५ दररोज सकाळी ६ ते ७.३० या वेळेत १६५, दमाणी सांस्कृतिक भवन, विवेकानंद केंद्र, रेल्वे लाईन्स येथे हे योगसत्र होणार आहे. या सत्रात तज्ञ मार्गदर्शक शास्त्रीय पद्धतीने सूर्यनमस्कार तसेच आरोग्यपूर्ण जीवनासाठी आवश्यक दररोज करण्याची आसने शिकवतील.

### भीमरत्न मंडळाच्या अध्यक्षपदी यशराज दंदाडे

**सोलापूर, दि. २३ मार्च-**

भिमरत्न जुळे सोलापूर मध्यवर्ती मंडळाच्या वतीने विश्वभूषण महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भीम जल्लोष



उत्सावासाठी नूतन पदाधिकारी निवडीची बैठक पार पडली. सदर बैठक मंडळाचे आधारस्तंभ सिताराम शिखरे यांच्या अध्यक्षतेखाली व सुरेश हरवाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. अध्यक्ष यशराज दंदाडे, उपाध्यक्ष अनिकेत शिंगे, खजिनदार चेतन सोनके, सचिव विनायक मग्रुमखाने, सहसचिव मंगेश सुरवसे, कार्याध्यक्ष सारिश डोलारे, प्रसिद्धीप्रमुख नागेश वंजाळे. यावेळी संस्थापक रतिकांत कांबळे, संतोष इरकशेट्टी, शिवा वाघमारे, ओंकार नलावडे, विशाल प्रक्षाळे, गजानन ननवरे, सुनिल पाटील, आदर्श काळे, श्रेयश गायकवाड, प्रफुल्ल जोशी, शुभम कांबळे, ऋषीकेश कुर्लेकर उपस्थित होते.

### भीमजल्लोष प्रतिष्ठानच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड

**सोलापूर, दि. २३ मार्च-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त भिमजल्लोष प्रतिष्ठानच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात



आली. छत्रगुण माने यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे उपाध्यक्ष हरिष गायकवाड, भारत देडे, सचिव अतिष चौधरी, सहसचिव सोमनाथ सोनकांबळे, खजिनदार प्रमोद साबळे, सहखजिनदार अनिल जेटीथोर, कार्याध्यक्ष रमेश कांबळे, मार्गदर्शक गौतम वाघमारे, गौतम चौधरी, नारायण गायकवाड. सदस्य मनोज गोडवे, गिरजप्पा माने, राजगुरु, अनिल सिद्धगणेश, संतोष सोनकांबळे, सागर साबळे, शुभम गायकवाड, राहुल वाघमारे, विशाल माने,

### विवेकानंद प्रशालेतील विद्यार्थ्यांनी अनुभवले 'छावा'चे शौर्य

**सोलापूर, दि. २३ मार्च-**

स्वामी विवेकानंद शिक्षण संकुल एम आयडीसी सोलापूर येथील विद्यार्थ्यांनी 'छावा' हा चित्रपठ लक्ष्मीनारायण चित्रपटगृहात दाखवण्यात आला. यावेळी थिएटरमध्ये अभिषेक सिताप या विद्यार्थ्याने पोवाडा सादर केला. यावेळी मुख्याध्यापिका सीमा यलगुलवार, शहापुरे, मिरेकर, माने, शिंदे, कोळी, सपताळे, निलंगीकर, राठोड, राऊत, गंभिरे उपस्थित होते.

## विभागीय आयुक्तांचे 'चॅलेंज' स्वीकारले

# 'सात सुत्री' आराखड्याचे 'नाविन्यपूर्ण' कामकाज करुन जिल्हा 'राज्य स्तरावर' प्रथम आणणार

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेप्रमाणे राज्यात सर्वत्र १०० दिवसीय कृती आराखड्यातील सात सुत्री कार्यक्रमाची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे. याच धर्तीवर सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रशासनातील सर्व सहकार्यांना घेवून या १०० दिवशीय कृती आराखड्याचा जिल्हाभर जागर सुरू केला आहे. या कार्यक्रमातून सर्वसामान्यांचा शासकीय कार्यालयाकडे पाहण्याचा दृष्टीकोनही सध्या बदलतो आहे. आता याच कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावर जिल्ह्याचा प्रथम क्रमांक आणणार असल्याचा संकल्प निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी व्यक्त केला. दरम्यान, यामुळे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी जिल्हा प्रशासनाला केलेल्या आवाहनाचा सोलापूर जिल्ह्याला फायदाच होणार आहे.

नुकताच विभागीय आयुक्त पुलकुंडवार यांचा सोलापूर जिल्हा दौरा झाला आणि त्यांनी जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात १०० दिवसीय कृती आराखडा कार्यक्रमाची आढावा बैठक घेतली. याच बैठकीत त्यांनी सोलापूरच्या जिल्हा प्रशासनाचे काम पाहून कौतुकाची थाप दिली आणि या कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावर सोलापूर जिल्ह्याचा प्रथम क्रमांक यावा, अशी अपेक्षाही व्यक्त केली होती. या अनुषंगाने आरडीसी कुंभार यांच्याशी चर्चा केल्यावर त्यांनी वरील स्पष्टोक्ती दिली. सोलापूर जिल्हा प्रशासनातील सर्व कार्यालये आता खटाखट होत असून, जुन्या दप्तरातील सर्व अभिलेखे चांगल्या पध्दतीने सांभाळले आहेत.

### निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांचा संकल्प




जिल्हाधिकाऱ्यांचा 'सनद वाटप' उपक्रम कौतुकास्पद ठरला आहे. या अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाचा पोट खराबा जमीन तसेच बिगर शेती असलेल्या जमिनीसाठी सनद वाटप कार्यक्रम हा अत्यंत चांगला असून, राज्यातील इतर जिल्ह्यापेक्षा वेगळा व लोकांसाठी खूप महत्त्वपूर्ण कार्यक्रम झाला आहे. अभिलेखासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करून त्या अनुषंगाने अभिलेखाचे निंदनीकरण व सुसूत्रीकरण केले जात आहे आणि याची दखल विभागीय स्तरावर सध्या घेतली जात आहे. यामुळेच उर्वरित कालावधीतही आराखड्यातील सात सुत्री कार्यक्रमाची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करणार आहोत आणि राज्यात सोलापूर जिल्हा चमकविण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे.

विभागीय आयुक्तांनीही सोलापूर जिल्हा प्रशासन या अंतर्गत चांगले काम करत असून, या अंतर्गत राज्यस्तरावर जिल्ह्याचा प्रथम क्रमांक येण्यासाठी सर्व कार्यालय प्रमखांनी अत्यंत काटेकोरपणे नियोजन करावे, असा सल्ला दिल्याने जिल्हा प्रशासनातील सर्व विभागप्रमुख आता चांगलेच कामाला लागल्याचे दिसून येत आहे. विभागीय आयुक्तांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे जिल्ह्यातील सर्व शाळांना आता सीसीटीव्ही बसवून घेतले जाणार आहेत आणि उद्योग वाढीसाठी उद्योगस्नेही वातावरण निर्माण करणार आहोत. यामुळे जिल्ह्यात गुंतवणूक झाल्यानंतर उद्योग वाढ मोठ्या प्रमाणावर होऊ शकते त्या अनुषंगाने गुंतवणूक तसेच पायाभूत प्रकल्पासाठी प्रयत्न आम्ही करणार आहोत आणि जिल्ह्याचे नाविन्यपूर्ण कामकाज करून दाखविणार असल्याचीही माहिती आरडीसी कुंभार यांनी शेवटी दिली.

### कामकाजाची लवकरच हायटेक संस्थेकडून होणार तपासणी



मी सोमवारी या मोहिमेबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून विस्तारित माहिती घेवून ११ तालुक्यातील सर्व कार्यालय प्रमुखांनी त्यांचे कार्यालय तसेच कार्यालय परिसर, कार्यालयातील स्वच्छता घरे तसेच अभ्यांगतासाठी असलेली स्वच्छतागृहे कायम स्वरुपी स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी पुन्हा एकदा सांगणार आहे. जिल्हास्तर तसेच तालुका स्तरावरील सर्व कार्यालय प्रमुखांनी या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याची गरज आहे. कारण या केलेल्या काम काजाचे श्रेष्ठ संस्थेकडून तपासणीचे काम लवकरच सुरू होणार आहे. यामुळे सोलापूर जिल्ह्याचे कामकाज राज्यातच सर्वोत्कृष्ट ठरेल, यासाठी आम्ही सर्वजण प्रयत्न करणार आहोत.

**- मनिषा कुंभार, निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर**

### १०० दिवसीय कृती आराखड्याची मोहीम फत्ते करणार



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेप्रमाणे १०० दिवसीय कृती आराखड्यातील सात सुत्री कार्यक्रमाची सोलापूर जिल्ह्यात अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करणार आहोत. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक गोष्टींचे मायक्रोप्लॅनिंग करून आपला जिल्हा राज्यात पहिला आणण्यासाठी सुरू केलेली ही मोहीम, चॅलेंज फत्ते करणार आहोत.

**- अमृत नाटेकर, उपजिल्हाधिकारी (महसूल) सोलापूर**

## नंबरप्लेटच्या होम डिलिव्हरी शुल्कात सवलत देण्याचा आदेश

### वाहनधारकांना दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ मार्च -**

एका ठिकाणी किमान २५ किंवा त्याहून अधिक वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट) बसवण्यासाठी नोंदणी झाली असल्यास तेथील वाहनांना नंबरप्लेट लावण्यासाठी कोणतेही अतिरिक्त होम फिटमेंट शुल्क आकारू नये, असा आदेश परिवहन आयुक्तालयाने दिला आहे. या निर्णयामुळे वाहनधारकांना दिलासा मिळणार आहे.

**काही सूचना नव्याने**

राज्यात एक एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या वाहनांसाठी उच्चसुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट) बसवण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी परिवहन विभागाने नव्याने काही सूचना काढल्या आहेत. वाहन संघटनांनी नवी नंबरप्लेट बसवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, अशी सूचना परिवहन विभागाने राज्यातील बस, रिक्षा, टॅक्सी, ट्रक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना केली आहे.




### नियमभंग केल्यास कारवाईचा इशारा

एक एप्रिल २०१९ नंतर नोंदणी झालेल्या नवीन वाहनांना वाहन वितरकांकडून एचएसआरपी बसवणे बंधनकारक आहे. मात्र, काही वितरकांनी एचएसआरपी वाहनांना बसवण्याऐवजी थेट वाहन मालकांना वितरित केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे अशा वितरकांवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा परिवहन विभागाने दिला आहे.

### शुल्काबाबत नाराजी

दुचाकी वाहनांसाठी घरी जाऊन नंबरप्लेट बसवण्यासाठी १२५ रुपये, तर चारचाकी वाहनांसाठी २५० रुपये शुल्क होम डिलिव्हरी म्हणून आकारण्यात येते. याबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात होती. एका ठिकाणी किमान २५ किंवा त्याहून अधिक वाहनधारकांनी एचएसआरपी बसवण्यासाठी अर्ज केल्यास, त्यांच्या सोयीच्या ठिकाणी किंवा गृहनिर्माण सोसायटीमध्ये एजन्सीद्वारे कोणतेही अतिरिक्त होम फिटमेंट शुल्क न आकारता एचएसआरपी बसवण्यात येईल.

## भैय्या चौकातील रेल्वे पूल पाडणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

सोलापूर शहरातील भैय्या चौक ते मरीआई चौकादरम्यान ब्रिटिशांनी बांधलेला शंभर वर्षांचा रेल्वे पूल लवकरच पाडण्यात येणार आहे. पुलाचे आयुर्मान १०० वर्षांपेक्षा जास्त झाल्याने, पूल धोकादायक स्थितीत आला आहे. अशा अवस्थेत कोणतीही दुर्देवी घटना घडू नये यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, मध्य रेल्वे, आणि महापालिका प्रशासनाकडून ठोस पावले उचलली जात आहेत. त्याअनुषंगाने रविवार (दि.२४) मार्च मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांकडून या पुलाची कोर कटींग मशीनच्या सहाय्याने पाहणी करण्यात आली. यापाहणी दरम्यान ब्रिटिशांनी बांधलेल्या पुलाचे सर्वेक्षण करण्यात आले.

दरम्यान, रविवार (दि.२४) मार्च रोजी रेल्वेच्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी पाहणी केली. मरीआई चौक ते भैय्या चौक येथे १०० वर्षांपूर्वीच्या त्या रेल्वे पुलावर मशीनद्वारे छिद्र पाडून पूल बांधणीसाठी कोण कोणत्या साहित्य वापरण्यात आले. या संबंधी माहिती संकलित करण्यात आली. सदरची माहिती संकलित केल्यानंतर पुढील प्रक्रिया केली जाणार असल्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले. १०० वर्षापूर्वीचा ब्रिटिशांनी बांधलेला रेल्वेपूलाचे पाडकाम सुरू करण्याअगोदर रस्ते मार्गात बदल करून पर्यायी वाहतूक व्यवस्था केली जाणार आहे. रेल्वेसाठी सुद्धा पर्यायी मार्ग उपलब्ध करण्यात येणार आहे.असेही यावेळी सांगण्यात आले.



### रेल्वे प्रशासनाकडून प्राथमिक सर्वेक्षण

मध्य रेल्वेच्या सोलापूर रेल्वे विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी रविवारी सदरच्या पुलाची पाहणी केली आहे. सदरचा पूल पाडकाम व नवीन पूल आराखड्याचा प्रस्ताव मध्यरेल्वे प्रशासनाकडे सादर करण्यात आला आहे. त्यावर अंतिम निर्णय अपेक्षित असून लवकरच शिक्कामोर्तब होईल. सर्वेक्षणानंतर पाडकामाचे प्रत्यक्षरित्या कामकाज चालू होईल.

**- राकेश जवादे, प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण**

## सीईओंकडून शिक्षणाधिकाऱ्यांना कार्यालयात बसण्याची तंबी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी सचिन जगताप हे कार्यालयात जास्त वेळ बसत नाहीत. तसेच वेळेवर कामे पूर्ण करत नसल्याबाबत शिक्षक व संस्थेच्या पदाधिकार्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याकडे केली होती . त्या अनुषंगाने जंगम यांनी जगताप यांची बैठक घेऊन अधिक वेळ कार्यालयात बसण्याची तंबी दिला आहे.

माध्यमिक शिक्षण विभागाच्या तक्रारी पंधरा दिवसात सुरळीत करण्याचे आदेश दिले. दरम्यान, माध्यमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयातील गर्दी कमी करण्यासाठी येणाऱ्या शिक्षक,



शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांच्या प्रश्नांची उकल होईल, अशी रचना करणे, टप्पा अनुदानातील माध्यमिक शाळांच्या कर्मचाऱ्यांच्या शालार्थ आयडीच्या त्रुटी पूर्ततेसाठी आवश्यकतेनुसार कॅम्प घेणे,

यासाठी कर्मचार्यांची कमतरता असल्याकडे सीईओचे लक्ष वेधण्यात आले. त्यावर त्यांनी नुकत्याच झालेल्या पदोन्नतीमध्ये प्राथमिक शिक्षण विभागाला मोठ्या संख्येने कर्मचारी मिळाले आहेत. यातील काही कर्मचारी माध्यमिक शिक्षण विभागाकडे मागणीनुसार देण्यात येतील, असे सांगितले. कोर्टसंबंधी प्रकरणे तातडीने निकाली काढणे, मुख्याध्यापक पदोन्नती, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वेतनवाढ, भविष्य निर्वाह निधीची कामे व वैद्यकीय बिलांची पूर्तता तत्काळ करणे, अशा सूचना सीईओंनी दिल्या आहेत. माध्यमिक शिक्षण विभागातील प्रलंबित प्रकरणे तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या. प्रकरणांचा तत्काळ निपटारा न लावल्यास कारवाईचा इशारा दिला आहे.




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०६५

**घर बांधिले डोंगरी ।**
**विषया हिंडे दारोदारी ।।**

आत्मज्ञान प्राप्तीसाठी किंवा ईश्वराला जाणून घेण्यासाठी बरेच लोक कठीण मार्गाचा अवलंब करतात. संतांनी संसारात राहूनही संसारात न अडकता आत्मज्ञान प्राप्त करून घेता येते. तसेच ईश्वराला जाणून घेता येते असे सांगितले असतांना व तसा मार्गही दाखविला असतांनाही संसार सोडून दूरक्षेत्री, डोंगरदऱ्यांनी वास्तव करणारे लोक आहेत. डोंगरात गेले म्हणजे आत्मज्ञान प्राप्त होईलच असे नाही. तेथे गेल्यानंतरही जर संसार आठवत असेल, काम क्रोध साथ सोडत नसतील तर वैराग्य अवस्था प्राप्त होणार नाही. वैराग्य हा प्रामुख्याने मनाचा व इंद्रियांचा विषय आहे. ज्याला मन आणि इंद्रिय ताब्यात ठेवता आली त्याला वैराग्य प्राप्तीसाठी या शरीराला डोंगरदऱ्यात नेण्याची आवश्यकता पडत नाही. यावरून लक्षात येते की डोंगरदरी वास्तव्य केले तरीही मनासह इंद्रियांवर नियंत्रण करणेच आवश्यक आहे. संत मुक्ताईंच्या,

**घर बांधिले डोंगरी ।**
**विषया हिंडे दारोदारी ।।**



या म्हणण्याप्रमाणे डोंगरातही मन विषयामागे धावत असेल तर वैराग्य अवस्था प्राप्त होणार नाही. अध्यात्मात वैराग्याला फार महत्व आहे. सुखी संसारासाठी, आनंदी जीवनासाठी काही प्रमाणात का होईना वैराग्य अवस्था प्राप्त होणे आवश्यक असते. संसार अवघड असतो, असे म्हटले जाते. खरे म्हणजे संसाराला आपणच अवघड केलेले असते. म्हणून या अवघड संसाराला सोपे करण्याची जबाबदारीही आपलीच आहे. याला जर सोपे केले तर संसार सोडून डोंगरदऱ्यांनी किंवा दूरक्षेत्री जाण्याची गरज असणार नाही. श्रीज्ञानेश्वर माऊलींनी, तरी जयाचिया इंद्रियांचिया घरा । नाहीं विषयांचिया येरझारा । जो आत्मबोधाचिया वोवरां । पहुडला असे ।। या ओवीतून इंद्रियांवर विजय मिळवलेल्या व्यक्तीच्या शरीरात, इंद्रीयांच्या घरी, मनात विषयांची येरझार संपलेली असते. असे लोक आत्मानंदात रममाण झालेले असतात, असे म्हटले आहे. इंद्रियांच्या घरांत विषयांची येरझार संपली असणाऱ्यांना डोंगरात घर बांधण्याची गरज कशाला पडेल? संतांनी ही अवस्था संसारात राहून अनुभवली. म्हणून त्यांनी अनुभवाचे बोल आपणास सांगितले. आपण किती घेतो, काय घेतो, कोणाचे घेतो, यावर बरेच अवलंबून असते. एखादा विषय खूप सतावत असेल, झटकन सुटत नसेल तर थोडा थोडा सोडण्याचा प्रयत्न करायला हवा. प्रयत्नाअंती काहीही शक्य आहे. कोणीतरी येईल आणि मंत्र, प्रसाद, औषध देऊन आपणास विषयातून मुक्त करेल असे घडणे कठीण असते. आपली मानसिकता व दृढ निश्चय हाच विषयापासून मुक्त होण्याचा किंवा विषयांना कमी करण्याचा मार्ग होय. त्यामुळे काय योग्य आणि काय अयोग्य हे आपणच ठरवले पाहिजे. जे आपणास अयोग्य दिसते, ते तरी किमान तत्काळ सोडले पाहिजे. म्हणजे उर्वरित अयोग्य सोडून देणे सोपे होऊ शकते.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : सोमवार**
**दि. २४ मार्च २०२५**
**विक्रम संवत् २०८०-८१**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - फाल्गुन**
**कृ. दशमी (२९.०५)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र - उत्तराषाढा (२८.२६)**
**योग - परिघ (१६.४३)**
**करण - वणिज (१७.२७)**

**दिनविशेष - चांगला दिवस, जागतिक क्षयरोग दिन, श्री गणेश प्रकट दिन - यवतमाळ**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ :** आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन :** सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु :** सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर :** दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ :** व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन :** श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दुःखी रहाल.


# गतवर्षात २३ हजार जणांनी घेतली 'डायल ११२' ची मदत

## कॉल आल्यावर अवघ्या आठव्या मिनिटाला पोलीस घटनास्थळी हजर

**तभा वृत्तसेवा । अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

सोलापूर शहरातील पोलिसांशी तत्काळ संपर्क साधण्यासाठी १०० हा हेल्पलाईन क्रमांक देण्यात आला होता. तीन वर्षापूर्वी १०० नंबर बदलून ११२ नंबर हा देण्यात आला असून, या नंबरवर गत वर्षात तब्बल २२ हजार ७१९ नागरिकांनी डायल ११२ या हेल्पलाइनची मदत घेतली आहे. डायल ११२ नंबरवर सर्वाधिक कॉल हे महिलांविषयक तक्रारीचे आलेले असल्याचे दिसून येते.







११२ हा नंबर डायल केल्यानंतर अवघ्या आठव्या मिनिटाला सोलापूर शहर पोलीस घटनास्थळी हजर राहिले असून या वेळेत सुधारणा करण्यासाठी सोलापूर शहर पोलिसांकडून नियोजन करण्यात आले असून, त्यासाठी कर्मचारी यांना वाहने देण्यात आली आहेत. तर चालू तीन महिन्यात सोलापूर शहर पोलिसांनी त्यांचा रिस्पॉन्स टाईम ६.५५ मिनिटांपर्यंत आणलेला आहे. सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयामध्ये डायल ११२ साठी पोलिस उपायुक्त मुख्यालय हे नोडल अधिकारी म्हणून तर सहायक पोलिस आयुक्त नियंत्रण शाखा यांच्या नेतृत्वाखाली २ सुपरवायझर म्हणून पोलिस अधिकारी आणि १४ कर्मचारी दिवस-रात्र कार्यरत आहेत.

सोलापूर शहरात ७ पोलिस ठाणे आहेत. जिल्ह्यात एकूण २५ पोलीस ठाणे आहेत. दरम्यान, या पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीमध्ये तत्काळ मदत हवी असल्यास त्यांना यापुढे ११२ हा हेल्पलाईन क्रमांक डायल करावा असे आवाहन ही पोलीस विभागामार्फत करण्यात आले आहे. विशिष्ट यंत्रणेच्या साहाय्याने एका ठिकाणी फोन लावल्यावर अवघ्या काही सेकंदांत हा फोन कोठून आला, हे संबंधितांना कळणार आहे. त्यानंतर तेथील पोलीस नियंत्रण कक्ष, अग्निशमन दल, महिला हेल्पलाइन, चाइल्ड हेल्पलाइझ यांना एकाचवेळी या कॉलची माहिती दिली जाणार आहे. जेणेकरून घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार सर्व यंत्रणा घटनास्थळी दाखल होऊ शकतील. यासाठी हा नंबर पोलिस विभागाने अस्तित्वात आणला आहे. महाराष्ट्र राज्यात केव्हाही आणि कुठेही विशेष गरजा असलेल्यांसह सर्व व्यक्तींना सार्वजनिक सुरक्षितता आणि सुरक्षिततेसाठी एकात्मिक, तत्काळ आपत्कालीन सेवा प्रदान करणे हेच या यंत्रणेचे उद्दीष्ट आहे.

**सन २०२४ मध्ये सोलापूर शहर पोलिसांकडे आलेले कॉल**

| कॉलचा प्रकार | कॉलची संख्या | कॉलचा प्रकार | कॉलची संख्या |
|---|---|---|---|
| महिलांविषयक | ७,४३३ | संशयितांबाबत | ३५ |
| बालकांशी संबंधित | ३१४ | आगीबाबत | १८१ |
| गुन्हे संदर्भात | ४,६०९ | प्राण्यांविषयी | १२५ |
| जेष्ठ नागरीक | १,२२२ | बेवारस वस्तूबाबत | १०० |
| रॉयटबाबत | २१९ | चौकशीबाबत | १,६४४ |
| हरविलेबाबत | १०२ | मृतदेहाबाबत | १२० |
| चोरीबाबत | ९१० | घटनेबाबत | ८ |
| त्रस्त झाल्याबाबत | २,३९५ | आंदोलनाबाबत | २ |
| रस्ते अपघाताबाबत | ७२२ | अनोळखी व्यक्तीबाबत | ११८ |
| माहितीबाबत | १,६६२ | | |

डायल ११२ या नव्या प्रणालीमुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळत आहे. नागरीकांना तत्काळ मदत पोहोचत असल्याने पोलिसांची प्रतिमा देखील उंचावत आहे. मागील वर्षभरात कॉल केलेल्या २२ हजार ७१९ नागरीकांपर्यंत अवघ्या ७ ते ८ मिनिटात पोलीसांनी घटनास्थळी दाखल होऊन पीडीतांच्या समस्या सोडविल्या आहेत. तसेच एखाद्या तक्रारदाराचे निरसन होईपर्यंत पोलिसांनी घटनास्थळी थांबुन त्यांना मदत केली आहे.

**- राजन माने, सहायक पोलिस आयुक्त, सोलापूर शहर पोलिस आयुक्तालय.**

# विविध उपक्रमांनी जल दिन साजरा

## ६३५ ग्रामपंचायतींना अभिनंदन प्रमाणपत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

जागतिक जल दिनानिमित्त तालुका व ग्रामपंचायत स्तरावर पाण्याचे महत्त्व, वापर हाताळणी याबाबत जनजागृती शालेय विद्यार्थ्यांची स्वच्छता फेरी, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची परिसर स्वच्छता करणे आदी उपक्रमांबरोबर जल जीवन मिशन अंतर्गत हर घर जल झालेल्या ग्राम पंचायतींचे सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांना प्रमाणपत्र वितरीत करून अभिनंदन करण्यात आले.





जिल्हा परिषदेचे मुख्य अधिकारी कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात तालुका व ग्रामपंचायत स्तरावर जागतिक जल दिनानिमित्त पाण्याचा काटकसरीने वापर, जलसंवर्धन,पिण्याच्या पाण्याचे स्त्रोतांचे शुध्दीकरण व स्वच्छता ठेवणे, शाळा, अंगणवाडी, ग्राम पंचायतमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे तसेच पिण्याच्या पाण्याची जागा, पाणी पुरवठा करणारी यंत्रणा यांची साफसफाई करणे, शाळा, अंगणवाडी परिसर स्वच्छता करणे, जलसंवर्धन याबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती करन्यासाठी मार्गदर्शन करून तालुका व ग्रामपंचायत स्तरावर तसेच शाळा व अंगणवाडी मध्ये जलप्रतिज्ञा घेण्यात आली.

दरम्यान जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हयात ६३५ इतके गावे हर घर जल झाली आहेत.सदर प्रमाणित झालेल्या ग्रामपंचायतींना राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी राज्य स्तरावरून पाठविण्यात आलेले अभिनंदन पत्र दिलेले आहेत. त्यामुळे सदरचे अभिनंदन प्रमाणपत्र २२ मार्च या जागतिक जलदिनाचे औचित्य साधून तालुका स्तरावर गट विकास अधिकारी, उपअभियंता (ग्रा.पा.पु.विभाग) यांच्या हस्ते सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांना वितरीत करून अभिनंदन करण्यात आले असल्याचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल जाधव यांनी सांगितले.

# एप्रिल महिन्यात 'त्या पक्षाचे' नमुने पाठविणार

## अहवाल निगेटिव्ह येताच प्रतिबंध उठविण्यात येणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

शहरात विविध ठिकाणी कावळे, घार व बगळे असे जवळपास १०० च्यावर पक्षी मृत्युमुखी पडल्याच्या घटना गेल्या काही दिवसांपासून घडल्या. यातील काही नमुने निदान बर्ड फ्लूचे झाले होते. यामुळे जिल्हा प्रशासन अलर्ट झाले आणि त्यांनी घरगुती कोंबड्यांचे काही नमुने घेवून पुणे आणि भोपाळ येथील लॅबला पाठविले होते. त्याचा अहवाल निगेटिव्ह आल्याने सर्वांचे टेन्शन कमी झाले मात्र तरीही अजून एकदा मरतुक होणाऱ्या काही पक्षाचे पुन्हा एकदा एप्रिलमध्ये अहवाल तपासण्यासाठी पाठविण्यात येणार आहे. हे अहवाल पॉजिटिव्ह येताच शहरातील त्या तीन ठिकाणचा प्रतिबंधात्मक आदेश जिल्हा प्रशासनाकडून उठविण्यात येणार आहे.

घरगुती कोंबड्यांचे अहवाल पॉजिटिव्ह आले तरी त्या प्रतिबंधीत भागातील चिकन दुकाने बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली होते. आता कोंबड्यांचे नमुना रिपोर्ट निगेटिव्ह आल्याने प्रतिबंधित केलेले क्षेत्र उठवावे, अशी मागणी चिकन दुकानदार आणि काही नागरिकांतून जिल्हा प्रशासनकडे होत आहे. मात्र एप्रिल महिन्यात पुन्हा एकदा काही पक्षाचे नमुने पुणे येथील लॅबला पाठविण्यात येणार असून, हे रिपोर्ट निगेटिव्ह आले तर प्रतिबंध घातलेले किल्ला खंदकबाग, श्री सिद्धेश्वर तलाव परिसर आणि धर्मवीर संभाजी महाराज तलाव हा परिसर नागरिकांसाठी पूर्ववत करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून मिळाली.

# चन्नवीर चिट्टे परिवाराचे काम स्तुत्य

## पालिका निवृत्त कर्मचारी सुभाष जकापुरे; चन्नवीर चिट्टे परिवाराच्या वतीने पाणपोई उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

सोलापुरात उन्हाचा पारा वाढत असून अंगाची लाही लाही होत असून अशावेळी नागरीकांसाठी रस्त्यांवर थंड पाण्याची सोय करणे हे अत्यंत पुण्याचे काम असून याकामासाठी चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराचे काम अत्यंत स्तुत्य असल्याचे प्रतिपादन महानगपालिकेचे निवृत्त कर्मचारी सुभाष जकापुरे यांनी केले. भवानी पेठ येथे नॅशनल लॉन्ड्रीच्या बाजूला पाणपोईचे उद्घाटन सुभाष जकापुरे व सामाजिक कार्यकर्ते भिमाशंकर पदमगोंडा यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी चन्नवीर चिट्टे म्हणाले, दरवर्षी मित्र परिवाराच्या वतीने आम्ही लोकांच्या सोयीसाठी पाण्याचे जार ठेवून लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करत असतोच. आमच्या या कामाचे सातत्य पाहून यावेळी संजय होमकर यांनी वॉटर कुलर उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानले.

यावेळी भाजयुमो प्रदेश सचिव अक्षय अंजिखाने, सागर अतनुरे, शिवसेनेचे (उबाठा) विभागप्रमुख शिवा ढोकळे, भिमाशंकर जमादार, राहुल पावले, बाळू होमकर, रवि तंबाके, सतिश पारेड्डी, गुरूराज पदमगोंडा, लक्ष्मीकांत बिराजदार, यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चन्नवीर चिट्टे मित्र परिवाराचे सदस्य पप्पू क्षीरसागर, कल्याण करजगी, श्रीनिवास दासरी, रवि शहापूरकर, जगदीश यनगुंडी, सद्दाम कोसगीकर, महेश हलसगीकर, साई सज्जे, किरण वल्लाल, शिवानंद पाटील, चेतन तुम्मा, मल्लिनाथ चिट्टे, अंबादास पाटील आदींनी परिश्रम घेतले.

# सेवानिवृत्त प्राचार्य व प्राध्यापक संघटनेच्या अध्यक्षपदी प्राचार्य शेख

**सोलापूर, दि. २३ मार्च -**


असोसिएशन ऑफ कॉलेज अँड युनिव्हर्सिटी सुपरअँन्यूएटेड टीचर्स या सेवानिवृत्त प्राचार्य व प्राध्यापक संघटनेचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य एम ए शेख व सचिव पदावर प्रा उत्तमराव चौगुले यांची सर्वानुमते निवड झाली आहे.

याशिवाय प्राचार्य के एम जमादार यांची मार्गदर्शक म्हणून तर डॉ एल एम तायडे उपाध्यक्ष प्रो व्ही बी आगासे कोषाध्यक्ष तर प्रो एम पी साळुंखे सहसचिव म्हणून निवड करण्यात आली सदस्य म्हणून प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे प्राध्यापिका डॉ नभा काकडे डॉ पी बी शिंदे प्राचार्य डॉ तानाजीराव लोखंडे डॉ एस यु शिंदे डॉ बी आर फुले यांची म्हणून निवड झाली आहे. सोलापूर कार्यकारणीचे केंद्रीय अध्यक्ष डॉ एम ए वाहुळ सचिव डॉ जे एम मंत्री व कोषाध्यक्ष प्राचार्य एस बी नाफडे यांनी अभिनंदन केले आहे.

# भालचंद्र साखरे यांना समाजभूषण पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

जालना येथील भाऊ फाऊंडेशन पँथर्स महाराष्ट्र शोतोकॉन व क्रीडा मंडळाच्या वतीने देण्यात येणारा समाजभूषण पुरस्कार मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाकडील कर्मचारी भालचंद्र साखरे यांना जाहीर झाला आहे. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे. कामगार, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल भालचंद्र साखरे यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे, असे संस्थेचे मास्टर अनिल पगारे यांनी पत्राद्वारे कळविले आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल कामगार शक्ती युनियनचे संस्थापक जनार्दन शिंदे, जनरल सेक्रेटरी चांगदेव सोनवणे, चित्रकार विठ्ठल मोरे, अशोक इंगळे, केरबा माने आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.



# संभाजी आरमारतर्फे शहीदांना मानवंदना



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**


२३ मार्च १९३१ या दिवशी सशस्त्र क्रांती लढा उभारून ब्रिटिशांना दणका देणारे क्रांतीवीर शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरू या महान सेनानींना ब्रिटिश सरकारने फाशीची शिक्षा दिली होती. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सर्वोच्च त्याग करणाऱ्या या क्रांतीवीरांना प्रतिवर्षाप्रमाणे संभाजी आरमारच्यावतीने मानवंदना देण्यात आली. भारत माता की जय, वंदे मातरम इन्कलाब जिंदाबाद शहीद जवान अमर रहे या जयघोषात संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून शहीदांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी श्रीकांत डांगे म्हणाले, केवळ सत्याग्रहाच्या मार्गाने देश स्वतंत्र झाला नसून चंद्रशेखर आझाद यांच्या नेतृत्वाखाली शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्यासारख्या असंख्य जिगरबाज क्रांतिवीरांच्या लढ्याचा धसका ब्रिटिशांनी घेतला होता. त्यामुळेच हा देश सोडून ब्रिटिशांना जावे लागेल. या सर्वोच्च बलिदानाचे स्मरण आणि प्रेरणा प्रत्येक भारतीयाने काळजात जपून ठेवली पाहिजे आणि त्या राष्ट्र निर्माणाच्या मार्गाने वाटचाल केली पाहिजे असे प्रतिपादन केले.

यावेळी संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, जिल्हाप्रमुख अनंतराव नीळ, शहरप्रमुख सागर ढगे, शिक्षक संघटनेचे अजिंक्य पाटील, अर्जुन शिवसिंगवाले, जिल्हा संघटक अमित कदम, उपशहरप्रमुख रेवण कोळी, राज जगताप, अविनाश विटकर, मल्लिकार्जुन पोतदार, द्वारकेश बबलादीकर, संतोष कदम, रोहन तपासे, गिरीश जवळकर, आकाश भोसले, निहाल शिवसिंगवाले, प्रवीण मोरे, सचिन लंगाळे, संजय मस्के, मोहन येड्लेलू, जनार्दन मदले, उदय राजपूत, बाळासाहेब वाघमोडे उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलकः- (८७) संघबंदी

महात्मा गांधींच्या हत्येनंतर संघावर प्रतिबंध लादला. त्यावेळी श्री. गुरुजी जेलमध्ये बंद होते. ते १९ महिने जेलमध्ये होते. त्यानंतर संघ निर्दोष ठरला. आणि गुरुजी निर्दोष सुटले. संपूर्ण मानव जातीवर प्रेम करणाऱ्या या महामानवाचा दिल्लीत सन्मान समारोह होता. भारतातील तसेच विश्वातील गणमान्य मान्यवरांची उपस्थिती होती. लाखो स्वयंसेवक जमले होते. ते त्यांच्या आदेशाची वाट पाहत होते. पण गुरुजींनी व्यासपीठावरून असे सांगितले जे काही घडले, ते विसरून जा. ज्यांनी आम्हाला करावासात डांबले ते सर्व आपलेच आहेत. दाताच्या मध्ये जीभ आली व जीभ दबली, तर आम्ही दात तोडतो का ? नाही. कारण दात आमचेच असतात. म्हणून सर्व काही विसरा व संघाच्या शाखा वाढवण्याच्या कामाला लागा. अगदी असेच २१ मार्च १९७७ ला इंदिरा गांधींच्या शासनाने संघावरील बंदी उठवली व त्यावेळी पूजनीय श्री बाळासाहेब देवरस कारागृहातून बाहेर आले. पुणे येथे त्यांचे स्वागत झाले. त्यावेळी स्पष्ट शब्दात संघाची भूमिका स्पष्ट करताना, आणीबाणी हे दुःस्वप्न होते, ते क्लेशदायक नक्कीच होते. तरी शासन व शासकही आपलेच आहेत. त्यामुळे सर्व काही झाले गेले विसरून जा. व क्षमाशील बना, असे उपस्थितांना ऐकवले. श्री गुरुजी व श्री देवरस या दोघांनीही सर्वेषाम् अविरोधेन हेच तत्व सर्वांनी अवलंबावे असे म्हटले.

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### स्वरचैतन्य संगीत समूहाच्या स्वरगंध कार्यक्रमाने पंढरपूरचे रसिक मंत्रमुग्ध

**पंढरपूर, दि. २३ मार्च -**

पंढरपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या स्वरचैतन्य संगीत समूह यांच्या स्वरगंध कार्यक्रमाने पंढरपूर येथील रसिक मंत्रमुग्ध झाले या कार्यक्रमाचे आयोजन श्रीहरी कुलकर्णी व शर्मिला देशपांडे यांनी केले होते प्रमुख पाहुणे म्हणून सीमाताई परिचारक उपस्थित होत्या.गाण्यांची आवड असणारे हौशी कलाकार यांनी नव्या आणि जुन्या हिंदी आणि मराठी सदाबहार गाण्यांची अतिशय उत्कृष्ट मांडणी केली. यावेळी श्रीहरी कुलकर्णी, शर्मिला देशपांडे, उदय उत्पात,बाळासाहेब यलमार, रत्नाकर देशपांडे, विद्या बहिरट, सारिका कोठाडिया, मानसी कर्वे, अनुराधा कोठाडिया भाभी, सायली नीरज शहा, श्रेया शिरगावकर, सुवर्णा सावळे,रोहन कोठाडिया,अमृता वैभव सातगिले, श्रद्धा गुज्जलवार, अमिता इनामदार, राजाराम मस्के या हसी कलाकारांनी अत्यंत सुंदर अशी गाणी सादर केली. कार्यक्रमास डॉ. प्रसाद कुलकर्णी,दिलीप टोमके डॉ.वर्षा काने, मिलिंद जोशी, डॉ. श्रीधर यलमार उपस्थित होते.

### वाशिंबेचे ॲड. योगेश झोळ यांना ऑल इंडिया बार कौन्सिलची सनद

**करमाळा, दि.२३ मार्च-**

वाशिंबे (ता. करमाळा) येथील ॲड. योगेश झोळ यांना ऑल इंडिया बार कौन्सिलची सनद मिळाली असून यामुळे त्यांचा



देशभरातील कोणत्याही न्यायालयामध्ये वकिली करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे विविध स्तरातून कौतुक केले जात आहे. ॲड. योगेश झोळ हे करमाळा तालुक्यातील वाशिंबे या गावातील प्रगतशील शेतकरी भास्कर झोळ यांचे चिरंजीव त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण वाशिंबे येथील शरदचंद्र पवार विद्यालयामध्ये झाले तसेच वकिलीचे शिक्षण यशवंतराव चव्हाण विधी महाविद्यालय पुणे येथून झाले आहे. सध्या ते शिवाजीनगर येथील जिल्हा आणि सत्र न्यायालय पुणे येथे प्रॅक्टिस करत आहेत. ऑल इंडिया बार कौन्सिलच्या वतीने घेण्यात आलेल्या व कठीण समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत त्यांनी अत्यंत चांगले गुण मिळवून यश संपादन केले आहे. यामुळे त्यांचे विविध स्तरातून कौतुक होत असून अभिनंदन केले जात आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कोल्हापूर जिल्हा निरीक्षकपदी महेश बोचरे

**करकंब, दि. २३ मार्च-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अ.प.) कोल्हापूर जिल्हा निरीक्षकपदी करकंब ता.पंढरपूर येथील महेश बोचरे (राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश



सरचिटणीस) यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खा.प्रफुल पटेल,महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे,राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष सनी मानकर, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची या पदावर निवड करण्यात आली. या निवडीनंतर यापुढेही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष,राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पक्षाची ध्येयधोरणे तळागाळात पोहोचावी तसेच पक्ष वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

### तरुणाकडून वाहनांची तोडफोड करून दुकानदारास केली मारहाण

**बार्शी, दि. २३ मार्च-**

तालुक्यातील आगळगाव येथे २० मार्च रोजी मध्यरात्री आणि दुसऱ्या दिवशी दुपारी घडलेल्या दोन घटनांमुळे गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील सुरज हनुमंत डमरे यांच्या वाहनांची तोडफोड करुन, त्यांचा किराणा दुकानातील कामगारास मारहाण केल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. सुरज डमरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मध्यरात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास संशयित गणेश भगवान थिटे हा त्यांच्या घरासमोर लावलेल्या चारचाकी वाहनाजवळ संशयास्पद हालचाल करताना दिसला. कामगाराने त्यास जाब विचारला असता तो पळून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी ७.३० वाजता पाहणी केली असता डमरे यांच्या होन्डा सिटी गाडीची मागील काच फोडलेली आढळली. तसेच ट्रॅक्टरचा सायलेन्सर तोडण्यात आला होता. यामुळे अंदाजे २५००० रुपयेचे नुकसान झाले असून, गाडीतून ४५०० किंमतीची जुनी बॅटरीही चोरीला गेली. याप्रकरणी तक्रार देण्यासाठी डमरे पोलीस ठाण्यात पोहोचले असता, त्यांना त्यांच्या पत्नीचा फोन आला. त्यानुसार, गणेश थिटे हा दुकानात घुसला आणि कामगार लखन रघुनाथ साळुंके याला शिवीगाळ करत काठी व बिअरच्या बाटलीने मारहाण केली. तसेच दुकानातील साहित्याची तोडफोड करुन ८००० रुपयांचे नुकसान केले. यानंतर तो डमरे यांच्या राहत्या घरी पोहोचला व तिथे घरातील महिलांना धमक्या दिल्या.

### बार्शीत तरुणाने गळफास घेऊन केली आत्महत्या

**बार्शी, दि. २३ मार्च-**

शहरातील अलिपूर रोडवरील व्हनकळस प्लॉट येथे ३९ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुधीर उर्फ बबलू राजाराम रामगुडे (वय ३९) यांनी त्यांच्या राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, दि.२१ मार्च रोजी सायं. ५ वाजता त्यांनी आपल्या वडिलांना आणि मामाला चहा देऊन वरच्या मजल्यावर गेले. त्यानंतर रात्री ९ वाजता जेवणासाठी हाक मारली असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यावेळी झोपले असतील असे समजून कुटुंबियांनी जेवण करुन झोप घेतली. मात्र, दुसऱ्या दिवशी म्हणजे २२ मार्च रोजी दुपारी १२.३० वाजता पुन्हा हाक मारली असता प्रतिसाद मिळाला नाही. यावेळी मामाने वर जाऊन पाहिले असता सुधीर यांनी घराच्या वरील मजल्यावर बाथरुमच्या समोरील मोकळ्या जागेत स्लॅबवरील लोखंडी हुकाला तारेने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले.तातडीने इतर नातेवाईकांना कळविण्यात आले.

# माढा, कुर्डूवाडीतील बेदाणे सौदे सुरू करा

## सभापती हरिष गायकवाड यांचे आ. अभिजीत पाटलांना आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ मार्च -**



पंढरपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे कामकाज चांगल्या प्रकारे सुरू आहे. बेदाणा सौदे बाजारात वेळेचे नियोजन व्हावे म्हणून सहा आडत व्यापाऱ्यांना केवळ एका दिवसांसाठी सौदे करू नये अशी सूचना करण्यात आली होती. मात्र यामुळे ३०० शेतकऱ्यांचे नुकसान झाले असा आवाज आ. अभिजीत पाटील यांनी चक्क विधानसभेत उठविला होता. आमदार अभिजीत पाटील यांना त्यांच्या मतदार संघातील शेतकऱ्यांचा इतका कळवळा असेल तर त्यांनी माढा आणि कुर्डूवाडी येथे बेदाणे सौदे सुरू करावेत, अशी उपरोधिक टिका पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीश गायकवाड यांनी केली. अधिवेशनामध्ये विधानसभेत आमदार अभिजीत पाटील यांनी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बेदाणा सौद्याच्या वेळी शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीबद्दल प्रश्न उपस्थित केलेला होता. त्याबाबत पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड यांनी पत्रकार परिषद घेऊन आमदार अभिजीत पाटील यांनी केलेल्या आरोपांना सडेतोड उत्तर दिले. त्याप्रसंगी ते बोलत होते. या पत्रकार परिषदेस प्रशांत देशमुख उपस्थित होते.

### नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या नावाची यादी द्यावी

गेल्या आठवड्यात झालेल्या बेदाणा सौदे बाजारात सहा व्यापाऱ्यांना सहभागी होण्यास मनाई करण्यात आली होती. यामुळे ३०० शेतकऱ्यांचे नुकसान झाले म्हणून आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत आवाज उठविला. आमदार पाटील यांनी कोणकोणत्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांच्या नावाची आम्हाला यादी द्यावी अन्यथा आमदार पाटील यांनी त्यांच्या मतदार संघात असलेल्या ४२ गावातील शेतकऱ्यांसाठी वेगळी बाजार समिती निर्माण करावी असे गायकवाड यांनी सांगितले.

### येथील बाजार समितीत डाळिंबाची किलोवर विक्री

पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालास व बेदाणा डाळिंबला चांगले दर मिळावेत म्हणून माजी आमदार (कै.) सुधाकरपंत परिचारक यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून डाळिंब व बेदाणा सौदे बाजार सुरू केले. राज्यात सर्वत्र डाळिंब कॅरेटवर विक्री होत असताना परिचारक यांनी पंढरपूरला राज्यात पहिल्यांदा किलोवर डाळिंब सौदे बाजार सुरू केले. यामुळे शेतकऱ्यांचा फायदा झाला आहे असेही सभापती गायकवाड यांनी स्पष्ट केले.

### गेल्या महिन्यात १३१ कोटी रुपयांच्या बेदाण्याची विक्री

पंढरपूर येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये बेदाणा सौदे बाजार चांगल्या प्रकारे व्हावा म्हणून अडत व्यापारी व शेतकऱ्यांना सोयी सुविधा देण्यात आल्या आहेत. गेल्या महिन्यात १३१ कोटी रुपयांच्या बेदाण्याची विक्री झाली तसेच बेदाण्याला विक्रमी ६५१ रुपये विक्रमी दर मिळाल्याचे सांगितले.

### ट्रायल बेसीसवरती बाजार समितीने घेतला होता निर्णय

बेदाणा सौदे बाजार दुपारी दोन वाजता सुरू होतो. बाजार समितीमध्ये ३० आडत व्यापारी आहेत. प्रत्येकाला पंधरा मिनिटे दिल्यास सौदे बाजार होण्यास रात्रीचे दहा वाजतात. विशेष म्हणजे सूर्य मावळल्यानंतर बेदाणा कलर व्यवस्थित दिसत नाही. यामुळे शेतकऱ्यांना दर कमी मिळतो. यासाठी बेदाणा सौदे बाजार सूर्यास्ताच्या आत व्हावेत अशी मागणी शेतकरी व बेदाणा असोसिएशन यांनी केली होती. या मागणीची दखल घेऊन बाजार समितीने ट्रायल बेसीसवर सहा व्यापाऱ्यांना एका दिवसांसाठी बेदाणा सौदे बाजारात सहभाग घ्यावयचा नाही अशी नोटीस दिली होती अशी माहिती सभापती गायकवाड यांनी दिली.

### बेदाण्याला महाराष्ट्रात रेकॉर्डब्रेक दर पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीतच

मागच्या आठवड्यातील ज्या मंगळवारच्या सौद्याची विधानसभेपर्यंत ऐवढी चर्चा झाली, त्या सौद्याच्या वेळी पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या इतिहासात पहिल्यांदाच २५२ गाडी बेदाण्याची आवक झालेली होती. एक गाडी दहा टनाची या हिशोबाने साधारण पंचवीसशे टन माल विक्रीसाठी आलेला होता. त्यामधील बावीसशे टन माल विक्री झाला. त्या बावीसशे टनाला सरासरी दोनशे ते अडीचशे रुपये प्रतिकिलो भाव मिळाला. तर बाजार समितीमध्ये एका दिवशी ६० ते ६१ कोटी रुपयांची रेकॉर्डब्रेक विक्री त्या दिवशी झालेली आहे. महाराष्ट्रात एका दिवशी बेदाण्याच्या एका किलोला ६५१ रुपये इतका विक्रमी दर हा पंढरपूर कृषी उत्पन्न बाजार समितीतच त्या दिवशी मिळालेला असल्याचे देखील सभापती हरिष गायकवाड यांनी सांगितले.

## महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेच्या विभागीय कार्यवाहपदी कल्याण शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ मार्च-**



महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा पंढरपूरचे प्रमुख कार्यवाह तथा जिल्हा प्रतिनिधी कल्याण शिंदे यांची महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे या संस्थेवर विभागीय कार्यवाहपदी निवड झाली आहे. ही निवड साहित्य परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत एकमताने करण्यात आली. १ एप्रिल ते ३१ मार्च २०२६ या कालावधीसाठी ही निवड असणार आहे, या कालावधीत साहित्य महामंडळाचे कार्यालय मसाप पुणे कडे आल्याने या पदाला महत्त्व प्राप्त झाले आहे. साहित्य परिषदेच्या माध्यमातून कल्याण शिंदे यांनी मराठी भाषा साहित्य समीक्षा संमेलन, बालकुमार साहित्य संमेलन, शिवार साहित्य संमेलन, व्याख्यानमाला, कविसंमेलन, कथाकथन आदी कार्यक्रम राबवले आहेत. त्यांचे साहित्य क्षेत्रातील प्रा. मिलिंद जोशी, सुनिताराजे पवार, विनोद कुलकर्णी, पद्माकर कुलकर्णी, ॲड. जे. जे. कुलकर्णी, डॉ. द. ता. भोसले, नानासाहेब रत्नपारखी, सिद्धार्थ ढवळे, अशोक माळी, भास्कर बंगाळे, प्रा. धनाजी चव्हाण, प्रा.डॉ. रमेश शिंदे, मंदार केसकर, शिवाजीराव बागल यांनी अभिनंदन केले.

## जिजाऊ रथयात्रा सोमवारी टेंभुर्णी शहरात

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. २३ मार्च -**



मराठा सेवा संघाच्यावतीने मराठा जोडो अभियानांतर्गत जिजाऊ रथयात्रा सोमवारी २४ मार्च रोजी टेंभुर्णी येथे येत आहे. रथयात्रेच्या स्वागतासाठी व सभेसाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या रथयात्रेच्या नियोजनासाठी गेले काही दिवस टेंभुर्णी, कुर्डूवाडी शहर व परिसरातील ग्रामीण भागातील मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांच्या बैठकांचे आयोजन केले जात आहे. माढा तालुक्यातून असंख्य शिवप्रेमी नागरिक या रथयात्रेच्या स्वागतासाठी व सभेसाठी उपस्थित राहणार आहेत. अठरापगड जातीतील मराठा बहुजन समाजबांधवांना एकत्रित करण्यासाठी मराठा सेवा संघाच्या वतीने मराठा जोड़ो अभियान राबविण्यात येत आहे. त्यासाठी १८ मार्च रोजी शहाजी महाराजांच्या जन्मदिनी वेरुळ येथील भोसले गढी येथून जिजाऊ रथयात्रेचा प्रारंभ झाला. महाराष्ट्रदिनी १ मे रोजी लाल महाल पुणे येथे या रथयात्रेची सांगता होणार आहे. २४ मार्च सोमवारी या रथयात्रेचे आगमन पंढरपूरहून अकलूज टेंभुर्णी येथे होईल. छत्रपती संभाजीराजे चौक ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक आगमन होईल. कुर्डूवाडीतील सभेसाठी रथयात्रा रवाना होईल. गावदेवी मंदिरापासून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत जिजाऊ रथयात्रचे चौकाचौकात स्वागत होईल. त्यानंतर संध्याकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे. २५ मार्च रोजी मंगळवारी रथयात्रा कुर्डूवाडीहून माढा , मोहोळमार्गे सोलापुराकडे रवाना होईल. जिजाऊ रथयात्रेच्या टेंभुर्णीतील स्वागत सोहळ्याला व कुर्डूवाडीतील सभेला मराठा व बहुजन समाजातील युवक, युवती, विविध सामाजिक संघटना आणि कार्यकर्ते, शिवप्रेमी नागरिक उपस्थित राहतील, असे आवाहन जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांनी टेंभुर्णीत आयोजित पत्रकार परिषदेत केले. याप्रसंगी सतीश चांदगुडे, सचिन खुळे,गोरख देशमुख, वैभव महाडिक, मियुर काळे, विलास कोठावळे, पपेश पाटील, योगेश मुळे, गणेश भोसले, अशोक खटके, शरद लिगाडे, संजय देशमुख, महेश देशमुख, अमोल पाटील, अजय गायकवाड, भारत जगताप, विजय काळे, योगेश मस्के, दादा मुळे, गणेश थोरात, बाळासाहेब पवार,अविनाश नांगरे, नानासाहेब देशमुख, अजित बेसुळके, सचिन जाधव, विनोद देशमुख उपस्थित होते.

## पै. अजम शेखने पटकाविली चांदीची गदा

### श्री क्षेत्र करजगी (क) श्री देवीच्या यात्रेनिमित्त कुस्ती स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२३ मार्च-**



कर्नाटकातील श्री क्षेत्र करजगी (क) ता. अफजलपूर (जि. कलबुर्गी) येथील श्री देवीच्या यात्रेनिमित्त घेण्यात आलेल्या अंतिम निकाली कुस्ती स्पर्धेत श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले ग्रुपचा पै. अजम शेख याने चांदीची गदा पटकविल्याने सर्वस्तरातून स्वागत व कौतुक होत आहे.

सालाबादाप्रमाणे यात्रेनिमित्त ही कुस्ती स्पर्धा घेण्यात येतात. त्यामध्ये पै. अजम शेख याने कर्नाटकचा पै. कुमार कमोजगी यास आसमान दाखवत निकाली कुस्ती जिंकली. पै. अजम शेख यास वस्ताद पै. मौला शेख यांचे मार्गदर्शन लाभले. पै. शेख यास सदर चांदीची गदा अमोलराजे भोसले यांच्या हस्ते नुकतीच न्यासाच्या अतिथी कक्षात देण्यात आली. पै. अजम शेख याच्या विजयाबद्दल श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, न्यासाचे विश्वस्त,पै. अजम शेख यांचे वस्ताद पै. मौला शेख (बादोला), पै. महेश कुलकर्णी सर्व सदस्य, सेवेकरी, कर्मचाऱ्यांकडून कौतुक होत आहे. याप्रसंगी निखील पाटील, ऋषी लोणारीसह कुस्तीगीर उपस्थित होते. दरम्यान श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली आणि संकल्पनेतून तालुक्यातील सराव करण्याऱ्या गोरगरीब 'कुस्तीगरांसाठी स्वामींचा प्रसाद रुपी खुराकाचे कीट वाटप करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत न्यासाकडून दरमहा ७७ कीटचे वाटप करण्यात येते. विशेष टीमच्या माध्यमातून सर्वे करून तालुक्यातील ७७ पैलवानांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान याकामी महाराष्ट्र केसरी पै.मौला शेख बादोला, पै.महेश कुलकर्णी, सरफराज शेख, अतिश पवार यांचे सहकार्य लाभत आहे.

## करमाळा भुईकोट किल्ला संवर्धनाचे काम सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २३ मार्च-**



शासनाच्या पुरातत्त्व व संग्रहालय विभागाअंतर्गत करमाळ्यातील ऐतिहासिक किल्ल्याचे संवर्धन व जतन करण्यात येत असून या कामासाठी २ कोटी निधी माजी आमदार संजयमामा शिंदे यांनी सोलापूर जिल्हा नियोजन मंडळामधून मिळविला होता. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, माढा या तालुक्यांबरोबरच उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा, भूम आदी भागावरती राजे रावरंभा निंबाळकर यांची सत्ता होती. करमाळ्यातील कमलादेवीचे मंदिर तसेच भुईकोट किल्ला याची बांधणी राजे जानोजी, रंभाजी (रावरंभा) निंबाळकर यांनी सतराव्या शतकात केली.

सध्या किल्ल्याची अनेक ठिकाणी पडझड झालेली आहे. शहराचा हा ऐतिहासिक वारसा जतन होण्यासाठी या संपूर्ण किल्ल्याची डागडुजी होण्यासाठी आणखी करोडो रुपयांची गरज असून तो निधी संजयमामा शिंदे यांनी त्यांची राजकीय ताकद वापरून राज्य सरकारकडून उपलब्ध करून द्यावा, अशी इतिहासप्रेमी, नागरिकांकडून अपेक्षा व्यक्त होत आहे.

## आयुष्यात मनासारखे जगता आले पाहिजे

### डॉ. दिलीप पांढरपट्टे

### मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंती निमित्त व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२३ मार्च-**



आपल्या आयुष्यात मोठ्या प्रमाणात भौतिक सुखसुविधा मिळाल्या म्हणजे यशस्वी झालो असे म्हणता येत नाही. कारण सर्व गोष्टी मिळून ही अनेक लोक दु:खी आहेत. समाजातील इतर लोकांना त्रास न देता आपल्या आयुष्यात मनासारखे जगता आले पाहिजे, असे प्रतिपादन माजी आयएएस अधिकारी तथा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी सदस्य डॉ. दिलीप पांढरपट्टे यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयामधील कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्पर्धा मार्गदर्शन केंद्र आणि यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई शाखा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त आजची तरुणाई: संधी आणि आव्हाने या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त आयएएस अधिकारी दिनकरराव जगदाळे हे होते.

याप्रसंगी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. रामेश्वर कोठावळे, कला शाखा समन्वयक डॉ. बिरा पारसे आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगत दिनकरराव जगदाळे म्हणाले की, फक्त एमपीएससी हा यशस्वी होण्याचा मार्ग नाही. इतर क्षेत्रात स्वत:च्या पायावर उभे राहून यशस्वी उद्योजक होता येईल. स्पर्धा परीक्षेत यश मिळाले नाही तर विद्यार्थ्यांच्या मनामध्ये नैराश्य निर्माण होवून पुढील आयुष्य जगणे खडतर बनते. जीवनात नेहमी समाधानी राहणे तितकेच महत्त्वाचे बनले आहे, असे विचार त्यांनी व्यक्त केले. प्रास्ताविक संस्थेचे खजिनदार तथा यशवंतराव चव्हाण सेंटरचे सदस्य जयकुमार शितोळे यांनी केले. प्रमुख पाहुण्याचा परिचय डॉ. राहुल पालके यांनी करुन दिला. सूत्रसंचलन प्रा. किशोर गरड यांनी केले तर आभार डॉ. बिरा पारसे यांनी मानले.

## मोडनिंब येथे पार्थ पवार यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम

### राष्ट्रवादीचे नेते उदय माने यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**मोडनिंब, दि. २३ मार्च -**

उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पाच दिवस विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व उदयकीर्ती अर्बन बँकेचे चेअरमन उदय माने यांनी दिली.

यावेळी राष्ट्रवादी युवकचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, नवी मुंबई कार्याध्यक्ष कांबळे व प्रमोद जाधव उपस्थित होते. मंगळवार दि.२५ मार्च रोजी रांगोळी स्पर्धा (खुला गट) स्पर्धा सकाळी ११ वा पार पडणार आहे.या स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस सोन्याची नथ,द्वितीय बक्षीस पैठणी साडी तर तृतीय बक्षीस डिनर सेट आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तृप्ती लेंगरे व भक्ती पवार यांच्याशी संपर्क साधून नाव नोंदणी करून घेण्याचे आवाहन संयोजकांनी केले आहे.या स्पर्धा उदय किर्ती अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड येथे संपन्न होणार आहेत. मोडनिंबचे उदय माने हे राष्ट्रवादी काँग्रेसचे ३५ ते ४० वर्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते असून त्यांनी आजपर्यंत पक्षाच्या मार्फत तसेच वैयक्तिक स्वखर्चातून अनेक सामाजिक उपक्रम, विकास कामे राबवली आहेत

### २१ हजार वह्या, ब्लँकेट वाटप

पार्थ पवार यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवार ते रविवार (दि.२६ ते३०) मार्च पर्यंत सोलापूर जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेमधील गरीब गरजू मुला-मुलींना २१००० वह्या वाटप करण्यात येणार आहेत.तसेच मंगळवार दि.०१ एप्रिल पासून वृद्धाश्रमातील व्यक्तींना मदत म्हणून सोलापूर जिल्ह्यातील विविध वृद्धाश्रमातील वृद्धांना २१००० ब्लँकेट वाटप करण्यात येणार आहे.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## महर्षी प्रशालेतील सर्व शिक्षकांची तपासणी

**शंकर नगर प्राथमिक आरोग्य केंद्राचा उपक्रम**



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ मार्च-**

निरोगी शिक्षक हाच देशाचे उज्वल भविष्य घडवू शकतो. देशाचे भविष्य घडविणारा शिक्षक सदृढ असावा. भविष्यात होणारा संभाव्य आजार टाळता यावेत. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून शंकर नगर प्राथमिक आरोग्य केंद्र व म हर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यांनी संयुक्तपणे ६० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रक्त तपासणी केली.

महर्षी प्रशालेतील शिक्षकांची रक्त तपासणी,रक्तातील साखर, बी.पी.तपासणीची मागणी मुख्याध्यापक संजय गळीतकर यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र कडे केली होती. त्यांच्या मागणी वरुन प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल अव्हाड, आरोग्य सेवक विलास झुरुळे व म हालब टेक्निशियन सुवर्णा कारंजे यांनी तपासणी केली. यावेळी स्थानिक प्रशाला समिती सभापती ॲड. नितिन खराडे, सदस्य कैलास चौधरी, अनिल जाधव, नितिन इंगवल- देशमुख, विनोद जाधव उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### शिवाजी महाविद्यालयात भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांना अभिवादन

**बार्शी, दि. २३ मार्च-**

शिवाजी महाविद्यालयात शहीद दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. शेख यांनी भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या सार्वजनिक उत्सव समितीचे चेअरमन डॉ. एस. बी. शिंदे , डॉ. आर. बी. पालके, प्रा. डॉ. एस. एन. जाधव, प्रा. एस. व्ही. लोंढे हे उपस्थित होते. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉ. पालके यांनी शहीद दिनाचे महत्त्व व इतिहास मांडला. भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकाराचे ब्रिटीश राजवाटीविरोधीचे योगदान त्यांनी स्पष्ट केले. आजच्या तरुणाईने इतिहासाचे आकलन करताना राष्ट्रहिताला बाधक असणाऱ्या गोष्टी दूर सारुन विधायक वृत्तीने कार्य करण्याचे गरजेचे असे ते म्हणाले. स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करणे हे मूलभूत कर्तव्य त्यांनी याप्रसंग विशद केले. प्राचार्य डॉ. ए. बी. शेख यांनी क्रांतिकारकांच्या कार्याचे स्मरण करून इतिहासाचे आकलन चिकित्सक पद्धतीने करणे गरजेचे आहे असे मत मांडले. याप्रसंगी प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.



### मंगळवेढा येथे आ. समाधान आवताडे यांच्या उपस्थितीमध्ये इफ्तार पार्टी

**मंगळवेढा दि.२३ मार्च-**

मंगळवेढा शहरातील सुतार गल्ली येथे पवित्र रमजान महिन्यानिमित्त हिंदू-मुस्लिम बांधवांनी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या उपस्थितीमध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. रमजान या पवित्र महिन्यात रोजा ग्रहण असणाऱ्या मुस्लिम बांधवांसोबत इफ्तार केला जातो. अशा सर्व बांधवांच्या वतीनं तसेच मुस्लिम बांधवांच्या माध्यमातून आमदार आवताडे यांचा आदरपूर्वक सत्कार करुन स्वागत करण्यात आले. आ आवताडे यांनीही सन्मान स्वीकारून रमजानच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.या इफ्तार पार्टीसाठी माजी नगराध्यक्ष प्रकाश गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रदेश कार्यालय सरचिटणीस लतीफ तांबोळी, माजी उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर भगरे, नगरपरिषद माजी पक्षनेते अजित जगताप, खरेदी-विक्री संघाचे चेअरमन सिद्धेश्वर आवताडे, माजी नगरसेवक पांडुरंग नाईकवाडी-कोळी, उद्योजक सरोज काझी, प्रवीण खवतोडे, बबलू सुतार, नजीर इनामदारउपस्थित होते.



### वळसंगमधे कुरेशी परिवारातर्फे इफ्तार पार्टी

**वळसंग, दि.२३ मार्च -**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथे कुरेशी परिवारातर्फे रमजाननिमित्त माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. माजी तंटामुक्त अध्यक्ष सत्तार कुरेशी व माजी उपसरपंच आरिफ कुरेशी यांच्या पुढाकारातून झालेल्या या कार्यक्रमात श्री. म्हेत्रे यांच्यासह सरपंच जगदीश अंटद, मल्लिनाथ पाटील, यासीन कुरेशी, मुक्तार कुरेशी, गनी कुरेशी, सादिक कुरेशी, माजी ग्रामपंचायत सदस्य बुडन कुरेशी, जावेद कटरे, आरिफ आमलीचुंगे, उद्योजक सिद्धेश्वर मोरे, बालाजी पारसवार, माजी मुख्याध्यापक सिद्धारूढ काळे, माजी सरपंच श्रीशैल दुधगी, सिद्धाराम कोडले, विनोद सुरपुरे व गावातील इतर मान्यवर उपस्थित होते.

### प्रा. राजेंद्र ठोंबरे यांना महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार जाहीर

**सांगोला, दि. २३ मार्च-**



सांगोला शहरातील ज्येष्ठ नागरिकांच्या गेट टुगेदरचे जनक व सामाजिक कार्यकर्ते प्रा.राजेंद्र ठोंबरे यांना शब्दगंध समूह प्रकाशन या संस्थेचा महाराष्ट्र आयकॉन हा पुरस्कार जाहीर झाला आहे. लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे एका कार्यक्रमात तो प्रदान करण्यात येणार आहे. सांगोला परिसरात दरवर्षी ज्येष्ठ नागरिकांना एकत्र करुन गेट टुगेदर घेण्यात त्यांचे योगदान आहे. सोशल मीडिया व वृत्तपत्रात ते नियमित लेखन करतात. याआधी सांगोला येथून स्टार ऑफ द गेट टुगेदर व कराड येथील पलपब प्रकाशन यांनी नेशनल एक्सलन्स अवार्ड हे पुरस्कर देवून सन्मानित केले आहे.

# पिलीव गटातील शेकडो कार्यकर्ते भाजपमध्ये

## पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खा.निंबाळकर व माजी आ.सातपुते यांच्या उपस्थितीत प्रवेश संपन्न

**तभा वृतसेवा**
**पिलीव दि २३ मार्च -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव जिल्हा परिषद गटातील शेकडो कार्यकर्त्यांनी ग्रामविकास व पंचायत राज्यमंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर व माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या उपस्थितीत आज भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे येथील मोहीते-पाटील गटाला मोठा धक्का बसला आहे.



पिलीव जिल्हा परिषद गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश पाटील, माजी लोकनियुक्त सरपंच नितीन मोहीते, माजी सरपंच प्रकाश घाटे, तंटामुक्ती अध्यक्ष महादेव जरग, विद्यमान ग्रामपंचायत सदस्य अरुणसिंग जामदार, मौला मुलाणी, सुनिल खुर्द, दिपक जाधव, बाजीराव जाधव यांच्यासह अडीचशे कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

यावेळी भाजपच्या शाखेचे उद्घाटन व पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा नागरी सत्कार करण्यात आला. माळशिरसचे माजी आमदार रामभाऊ सातपुते यांनी पिलीव भागातील विकास कामासाठी मोठा निधी दिला असून भाजपच पिलीव भागाचा विकास करु शकते असा दावा गणेश पाटील व नितीन मोहीते यांनी केला. यावेळी श्री. पाटील यांनी राष्ट्रीयकृत बँकेची दुसरी शाखा सुरु करावी, दुष्काळी भागाला पाणी द्यावे, प्राथमिक आरोग्य केंद्रास नवीन इमारत मंजूर करावी, सुसज्ज बसस्थानक, हिंदुसाठी स्मशानभूमी तसेच रस्त्यांच्या समस्या सोडवण्याची मागणी केली.

यावेळी माजी आमदार सातपुते यांनी गेल्या पाच वर्षात ८२ कोटी रुपयापेक्षा जास्त निधी दिल्याचे सांगितले. यामध्ये पिलीव येथील विश्रामगृह, महालक्ष्मी देवस्थान दोन कोटी, साठवण तलाव, रस्ते, पिलीव-माळशिरस रस्ता २४ कोटी यासह अनेक विकासकामे केल्याचे सांगितले.

यावेळी माजी खा रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी आपण २२ गावांचा पाणीप्रश्न सोडविणार असल्याचे सांगितले. यावेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष चेतनसिह केदार, राहुल मदने, शिवराज पुकळे, गणेश पाटील, नितीन मोहीते यांनीही म नोगत व्यक्त केले.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महालक्ष्मी देवस्थानचा तिर्थक्षेत्र ब वर्गात समावेश, आरोग्य केंद्रासाठी निधी ,सुसज्ज बसस्थानक, राष्ट्रीयकृत बँकेची शाखा , दुष्काळी २२ गावांचा पाणीप्रश्न, रस्ते व इतर सर्व कामांसाठी निधी उपलब्ध करुन देणार असल्याचे सांगितले. आगामी निवडणुकीत भाजपप्रणीत पॅनलला निवडुन दया निधी द्यायचे काम माझे असल्याचे सांगितले. यावेळी के. के. पाटील, रंजनभाऊ गिरमे, माळशिरसचे माजी नगराध्यक्ष आपासाहेब देशमुख, बाळासाहेब सरगर, सोपानकाका नारनवर, तालुकाध्यक्ष शरद मदने, संजय देशमुख, शरद मोरे, हनुमंत सुळ, बाळासाहेब वावरे, अतुल सरतापे, सचिन पाटील, ॲड. सत्यजित गलांडे आदी अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महालक्ष्मी पॅनलचे अंकुश भैस, अतुल नष्टे, प्रमोद भैस, आनंता जामदार, प्रविण वाघमारे, फिरोज शेख , मेजर गलांडे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले. संतोषकुमार शेंडगे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. निलेश कांबळे यांनी आभार मानले.



## अरण सबस्टेशनचा आ. पाटलांच्या हस्ते प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब,दि.२३ मार्च-**

माढा तालुक्यातील अरण येथील सबस्टेशनचा आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते प्रारंभ करण्यात आला. अर्थसंकल्पीय अधिवेशनात ग्रामीण भागातील विजेच्या समस्यांबाबत व्यथा मांडल्या आहेत. लवकरच त्याचा देखील पाठपुरावा करून कामे मार्गी लावण्याचा विश्वास आमदार पाटील यांनी यावेळी दिला.

अनेक वर्षांपासून माढा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी शेतकऱ्यांना रस्ते, वीज, पाणी या मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. पुरेसा वीजपुरवठा मिळत नसल्याने शेतकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. याकडे गांभीर्याने लक्ष घालून येथील ५ के.व्ही. सबस्टेशनची क्षमता दुप्पट केली असल्याचे पाटील यांनी सांगितले. नव्याने उभारण्यात आलेल्या सब स्टेशनची क्षमता दुप्पट झाल्याने अरण गावासह तुळशी, जाधववाडी, बैरागवाडी या गावांतील नागरिकांना सुरळीत वीजपुरवठा होणार असल्याने समाधान व्यक्त केले. यावेळी जि.प.सदस्य भारत शिंदे, चंद्रकांत गिड्डे, एकनाथ सुर्वे, हरिदास रणदिवे, शरद मोरे, नारायण माळी, प्रमोद कुटे, बालाजी पाटील, यशवंत शिंदे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नवीन पात्र केसरी रेशन कार्डधारकांना धान्य मिळावे

**अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार महासंघाचे मंत्रालयात सचिवांना निवेदन**



**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि.२३ मार्च,**

इष्टांक वाढ करून केशरी कार्ड धारकांना धान्य देण्यात यावे, नोव्हेंबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या चार महिन्यांचे मार्जिन २८ मार्च पर्यंत जमा करावे, २०२२ मध्ये केलेला भरणा तात्काळ परत मिळावा, प्राधिकारपत्र तात्काळ नूतनीकरण करून मिळावेत तसेच शिधापत्रिका विषयाची कामे पुरवठा विभागा मधूनच व्हावीत याबाबतचे निवेदन अखिल महाराष्ट्र राज्य स्वस्त धान्य दुकानदार संघटना महासंघाच्या सोलापूर जिल्हा शाखेतर्फे महाराष्ट्र राज्य अन्न व नागरी पुरवठा ग्राहक संरक्षण विभागाचे सहसचिव तातोबा कोळेकर यांना देण्यात आले.

यावेळी सहसचिव कोळेकर यांनी इष्टांकबाबत लवकरच नविन शासन निर्णय काढण्यात येईल व इष्टांक वाढवून मिळेल असे सांगितले. ज्या धान्य दुकानदारांची महिति प्राप्त झाली आहे त्या धान्य दुकानदारांना ३० मार्च पर्यंत मार्जिन जमा होईल असही सहसचिव कोळेकर यांनी सांगितले. नोव्हेंबर व डिसेंबर २०२२ मध्ये धान्य दुकानदारांनी चलनाद्वारे केलेला रोख भरणा दि.२० एप्रिल पर्यंत परत न मिळाल्यास दि.२५ एप्रिल रोजी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय हलगीनाद आंदोलन करणार असल्याचे ग्रामीण महासंघ सोलापूर जिल्हा संघटनेकडून सांगण्यात आले. काही विषयांवर सकारात्मकता दाखवल्याबदल महासंघ जिल्हा संघटनेकडून सहसचिव कोळेकर यांचे आभार मानण्यात आले.

यावेळी जिल्हाध्यक्ष विजय मंडलिक, पंढरपूरचे तालुकाध्यक्ष किरण दाणोळे, उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, महावीर वाकसे उपस्थित होते.

## भीमा-सीना जोडकालवा परिसरातील शेतीपंप वीजपुरवठा पूर्ववत करा

**आ. नारायण पाटलांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२३ मार्च -**

भीमा-सीना जोडकालवा परिसरातील पिकांना जीवदान देण्यासाठी या भागातील शेतीपंपाचा वीजपुरवठा पुर्ववत करावा व शेतकऱ्यांना मुबलक वीज द्यावी अशी मागणी आमदार नारायण पाटील यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आमदार नारायण आबा पाटील यांनी शेतकऱ्यांना बसणारा संभाव्य आर्थिक फटका व पिकांची सद्यस्थिती याचा प्रशासनाने गंभीर विचार करावा असे त्यामध्ये सुचित केले आहे. याबाबत बोलताना आमदार पाटील म्हणाले, भीमा-सीना बोगदा तसेच सीना नदीच्या दोन्ही तीरावरील शेती पंपाच्या वीज पुरवठ्यात प्रशासनाने



कपात केली असुन याचा थेट परिणाम शेतातील उभ्या पिकांवर होत आहे. उजनीतून सीनेचे सोडलेले आवर्तन पुर्ण होईपर्यंत या परिसरातील शेती पंपाच्या वीज पुरवठ्यात खंड पाडला आहे. वास्तविक पाहता यामुळे कंदर, सातोली, केम तसेच दहिवली, उपळवटे, ढवळस, बारलोणी, महादेववाडी, गवळेवाडी, पिंपरी, कव्हे आदि गावाच्या शिवारातील तसेच बोगदा व नदी काठच्या उभ्या पिकांवर गंभीर परिणाम होऊ लागला आहे. केळी सारखी नगदी पीक वेळीच पाणी नाही मिळाले तर वाया जाईल . त्याचा उत्पादनावर दुष्परिणाम होऊन करोडो रुपयांचे नुकसान होईल. त्यामुळे पिकांना जीवदान देण्यासाठी या भागातील शेतीपंप वीजपुरवठा पुर्ववत करावा व शेतकऱ्यांना मुबलक वीज देण्यात यावी असे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

## दुध उत्पादक शेतकऱ्यांचे तीन महिन्यांचे अनुदान रखडले

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि २३ मार्च -**

महाराष्ट्र शासनाने दुध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देणयासाठी अनुदान जाहीर केले. मात्र शेतकऱ्यांना सदरचे अनुदान मिळालेच नसून ते रखडले आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात व दुष्काळी स्थिती असताना शेतकऱ्यांना जास्तच अडचणीत आणण्याचे काम शासनाने केले आहे.

शासनाने सप्टेंबर महिन्यापर्यत दुधाला प्रतिलिटर पाच रुपये एवढे अनुदान जाहीर केले. सदर सप्टेंबर महिन्याचे अनुदान शासनाने अदयापही दिले नाही. सप्टेंबरनंतर शासनाने सदरच्या अनुदानात दोन रुपयाची वाढ केली. यामुळे प्रतिलिटर अनुदान सात रुपये केले .मात्र शासनाने यामध्ये आक्टोंबर व नोव्हेंबर या दोन महीन्याचे अनुदान शेतकऱ्यांना दिलेच नाही. एकतर सध्या उन्हाळयाचे दिवस असून पिलीव परीसरात सध्या भीषण पाणीटंचाई जाणवत आहे. यामुळे जनावरांना चारा व पाणी याची प्रचंड टंचाई जाणवत आहे. यामुळे शेतकरी सध्या प्रचंड आर्थीक अडचणीत आहे. सध्या अनेक शेतकऱ्यांकडे पाणी नसल्यामुळे शेतात चारा उपलब्ध नाही. हा चारा विकत घेण्यासाठी सध्या दुध उत्पादक शेतकऱ्यांना मोठी आर्थीक झळ सोसावी लागत आहे. अश्या अडचणीत शासनाने शेतकऱ्यांना मदत करणे आवश्यक असताना तीन महीन्याचे अनुदान दिले नाही. यामुळे सध्या दुध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. हे अनुदान शासनाने त्वरीत दयावे अशी मागणी दुध उत्पादक शेतकऱ्यांतून होत आहे.

> सध्या आमच्या कडे पिण्याच्या तसेच शेतीच्या पाणयाची भिषण टंचाई जाणवत आहे. यामुळे जनावरांना चारा ,पाणी कुठून आणायचा हा प्रश्न आमच्या पुढे आहे. अडचणीच्या काळात शासनाने दुधाचे अनुदान रखडविले आहे. हे अतिशय चुकीचे आहे. शासनाने ताबडतोब आमचे रखडविलेले अनुदान दयावे.
> - सागर भैस , दुध उत्पादक शेतकरी, पिलीव.

# बार्शी महालोकअदालतीत सुमारे साडेआठ लाखांची वसुली

**न्यायालयात महायात्रेचे स्वरुप**

**६ हजार ६३८ प्रकरणे निकाली**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२३ मार्च-**

बार्शी न्यायालयातील राष्ट्रीय महालोकअदालतीत ३५२ प्रलंबित दिवाणी तसेच तडजोडपात्र फौजदारी खटले व दाखल पूर्व ६ हजार २८६ असे एकुण ६ हजार ६३८ प्रकरणे तडजोडीने मिटवली. त्यातून सुमारे ८ कोटी ४४ लाख ६९ हजार ५६६ रूपयांची वसुली झाली.

राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश एम. एस. शर्मा यांचे मार्गदर्शनाखाली व सचिव यु.



पी. देवर्षी यांच्या सहकार्याने बार्शी तालुका विधी सेवा समिती तसेच वकील संघाच्या संयुक्त विदयमाने ही महालोकअदालत झाली. जिल्हा न्यायाधीश विक्रमादित्य के. मांडे यांचे अध्यक्षतेखाली ही अदालत झाली. यामध्ये बार्शी न्यायालयात प्रलंबीत दिवाणी व फौजदारी असे ५ हजार ५३० व दाखलपूर्व ११ हजार १४६ असे एकुण १६ हजार ६७६ प्रकरणे पॅनलमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात आली. एकुण पाच पॅनलमध्ये जिल्हा न्यायाधीश विक्रमादित्य के. मांडे, श्रीमती आर. एम. कंटे, सह दिवाणी न्यायाधीश एस. बी. विजयकर, सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती एच. यु. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती आर. पी. बागडे यांचा समावेश होता. गुन्हा कबुली खटल्यांसाठी सह दिवाणी न्यायाधीश श्रीमती जी. एस. पाटील यांची नेमणूक होती. विशेष बाब म्हणजे सहदिवाणी न्यायालय व स्तर श्रीमती आर. एम. कटे यांचे पॅनलसमोर पक्षकार विश्वंभर मन्मथ कानडे, (वय ८०) या जेष्ठ नागरिकाचे प्रकरण तडजोडीने निकाली काढण्यात आले. सह दिवाणी न्यायाधीश एस. बी. विजयकर यांचे पॅनलमध्ये लकव्याने आजारी असलेल्या वयोवृध्द पक्षकारांची प्रत्यक्ष पडताळणी पॅनलप्रमुखांनी न्यायालयाबाहेर येऊन केली. मोटार अपघात प्रकरणांत सुमारे ३७ लाख ४५ हजाराची नुकसान भरपाई मंजुर झाली. ३४ प्रलंबित प्रकरणांत तडजोड होऊन सुमारे ९० लाख ६३ हजार ४६३ रूपयांची वसुली तर रक्कम वसुलीच्या ३५ प्रकरणांत तडजोडीने १ कोटी ४१ लाख ७८ हजार ९७२ रूपयांची वसुली झाली. प्रलंबीत तडजोडपात्र फौजदारीची १० व कबुलीची १५५ प्रकरणे निकाली करण्यात आली. त्यात सुमारे १ लाख ६३ हजार १५० रूपयांचा दंड वसुल झाला. नगरपरिषदेने स्वतंत्र मंडप उभारून करसंकलनाची सुविधा उपलब्ध करुन दिली होती. एकुण ५ हजार २७३ करवसुलीचे दाखलपुर्व प्रकरणे तडजोडीने निकाली निघुन त्यात सुमारे ५ कोटी २१ लाख ६७ हजार ४२६ रुपये इतकी रक्कम वसुल झाली. मुख्यधिकारी बी. जी. चव्हाण यांचेसह कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. बार्शी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. आर. एन. गुंड व वकील संघाचे सर्व पदाधिकारी, पॅनल विधीज्ञ, सर्व न्यायालयातील कर्मचारी, पोलीस कर्मचारी, बँका तसेच फायनान्स कंपन्या, नगरपरिषद बार्शी, पंचायत समिती बार्शी, वीज वितरण कंपनी यांचे प्रतिनिधी यांचे विशेष सहकार्य लाभले.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लग्नाचे अमिष दाखवून २१ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**
लोहारा तालुक्यातील एका गावात २१ वर्षीय तरुणीवर गावातीलच एका तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २१ मार्च २०२५ रोजी रात्री ११.१५ च्या सुमारास पीडिता आपल्या घरी असताना आरोपीने तिच्या घरात जबरदस्ती प्रवेश केला. लग्नाचे आमिष दाखवून त्याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. यानंतर, पीडितेच्या आई व भावास शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी पीडितेच्या तक्रारीनुसार लोहारा पोलिस ठाण्यात आरोपीविरुद्ध भादंवि कलम ६४(१), ६९, ११५(२), ३५२, ३५१(२), (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



#### छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**तुळजापूर, दि.२३ मार्च -**
शहरातील पूजारी नगर सोसायटी फाऊंडेशन तर्फे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज बलिदान मास सुरू असल्याने पूर्णाकृती पुतळ्यास दैनंदिन छत्रपती संभाजीराजे यांच्या पराक्रमाचा इतिहास शौर्यगाथा सांगत राजा शिवछत्रपती क्रिकेट क्लब नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असते. याच बलिदान मास प्रसंगी पूजारी नगर सोसायटी फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पूजारी,उपाध्यक्ष उमाजी गायकवाड, सचिव अनिल आगलावे, महेश पूजारी, वंश पूजारी आदींसह सिध्दीराज कदम, विपीन शिंदे, प्रसाद पेंदे, ऋषिकेश साळुंके, अमर गायकवाड, सोनु शिंदे, किरण चिवचिवे, नितीन भांजी, धनंजय सावंत, बबलू सरवदे, प्रणव मलबा, सुदर्शन वाघमारे, राजन भांजी, आनंदी गायकवाड, नितीन सुर्यवंशी उपस्थित होते.

#### प्रीती देशमुख यांची प्राध्यापक पदी नियुक्ती

**वाशी, दि.२३ मार्च -**
वाशी येथील वसंतराव जनार्दन कवडे यांची नात प्रीती सुरेश देशमुख ही एम.एस.सी भौतिक शास्त्र या विषयासाठी असिस्टंट प्राध्यापक पदावर बारामती येथील शारदाबाई पवार कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शारदा नगर बारामती येथे निवड झाली आहे. तिचे प्राथमिक शिक्षण तसेच इयत्ता नववीपर्यंत शिक्षण जिल्हा परिषद शाळा ईट येथे झाले आहे. नंतर दहावी ते एम.एस.सी भौतिक शास्त्राचे शिक्षण त्यांनी बारामती येथे शारदाबाई पवार या कॉलेजमध्ये पूर्ण केले आहे. त्यांनी आतापर्यंतच्या पदवीधर व पदवी तर शैक्षणिक वर्षात भौतिक शास्त्र या विषयात प्रत्येक वर्षी प्रथम क्रमांक वर यश संपादन केले आहे. त्यांच्या या पुढील वाटचालीसाठी वाशी येथील ज्येष्ठ नागरिक संघटनाच्या वतीने बळीराम जगताप, बळीराम कवडे, तसेच वसंत कवडे, दादासाहेब चेडे, सुरेश गाढवे, मधुकरराव कवडे, विलासराव देशमुख, शिवाजी क्षीरसागर, बाबूशा कसबे यांनी फेटा, पुष्पहार, शाल घालून त्यांना शुभेच्छा दिल्या.

### जातिवादक शिवीगाळ करणाऱ्यावर गुन्हा नोंदची मागणी करत पोलीस स्टेशनमध्ये ठिय्या आंदोलन...

# काक्रंबा गावात गोमांस विक्रीच्या कारणावरून तणाव

### चार किलोमीटर पायी चालत पोलीस स्टेशनपर्यंत मोर्चा...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२३ मार्च -**
तालुक्यातील काक्रंबा गावात असणाऱ्या झोपडपट्टी भागात गोमांस विक्रीसाठी धाराशिववरून आलेला रिक्षा पकडून पोलिसांच्या ताब्यात दिला. गावात गोमांस विक्रीला मज्जाव करणाऱ्या तरुणांसोबत बाचाबाची होऊन गावात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. यानंतर आक्रमक झालेल्या दोन समाजातील जवळपास दोन अडीचशे महिला आणि पुरुषांनी काक्रंबा गावातून तुळजापूर पर्यंत तीन चार किलोमीटर पायी चालत घोषणाबाजी देत पोलीस स्टेशन गाठले. घोषणाबाजी देत आलेल्या या नागरिकांनी जातिवाचक शिवीगाळ करणाऱ्यावर गुन्हा दाखल करा म्हणत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे मराठवाडा उपाध्यक्ष तानाजी कदम यांच्या अध्यक्षतेखाली ठिय्या आंदोलन केले.

पोलीस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, अज्ञात इसम गोमास विक्री करत असलेबाबत तुळजापूर पोलीस स्टेशन येथे तक्रार झाली असून, काल रात्री काक्रंबा गावातील ज्ञानेश्वर तुकाराम घोगरे, प्रकाश गजेंद्र झाडे, चैतन्य माने (ह.मु काक्रंबा), विराज भारत गडदे, सारंग परमेश्वर कानडे, वैभव शशिकांत बनसोडे हे दुपारी १२:३० च्या दरम्यान भिमनगर येथे येवुन गावात गोमास विक्रीला तुम्ही खात असल्याशिवाय कसं काय येतो असे म्हणून दारात बसलेल्या महिला सुनंदा सतीश चंदनशिवे, राणी अविनाश पांडगळे, राजश्री सिकंदर पांडगळे, ज्योती रविंद्र साबळे यांना शिवीगाळ करुन पुन्हा जर गावात गोमास विक्री करण्यासाठी जर कोणी आलेला दिसला तर कोणालाही जिवंत सोडणार नाही अशी धमकी देवून गेले.

त्यानंतर घडलेला प्रकार महिलांनी मारुती चंदनशिवे संध्याकाळी सांगितल्यानंतर आम्ही रात्री ८ ते १८:३० च्या दरम्यान वरील लोकांना तुम्ही महिलांना अशी जातीवाचक शिवीगाळ का केली म्हणून विचारत असताना त्यातील विराज भारत गडदे याने या तुम्हा लोकांना लई माराव लागते. यांच्यामुळे गावात गोमास विक्री होते व यांच्यामुळे आपला धर्म भ्रष्ठ होत आहे असे म्हणून ज्ञानेश्वर तुकाराम घोगरे यास खाली पाडले व ज्ञानेश्वर घोगरे याने मारहाण करण्यास सुरुवात केली.

सदरील निवेदनावर दिगंबर सिताराम मस्के यांची स्वाक्षरी आहे.

## उमरग्यात युवकाला मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ मार्च -**
उमरगा तालुक्यातील कसगी गावात जुन्या भांडणाच्या कारणावरून युवकाला मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी उमरगा पोलिस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




दि.२२ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास कसगी येथील महात्मा बसवेश्वर चौकात फिर्यादी मल्लिकार्जुन शरणाप्पा कोळनुरे (वय ३१, रा. कसगी, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांना आरोपी अर्जुन लवटे, आकाश टकले, बिरु माशाळे आणि राजेंद्र माशाळे (सर्व रा. कसगीवाडी, ता. उमरगा, जि. धाराशिव) यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरून अडवले. यावेळी आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच लोखंडी रॉड आणि बॅटने हल्ला करून त्यांना जखमी केले. एवढेच नव्हे, तर जीवे ठार मारण्याची धमकीही दिली.

याप्रकरणी मल्लिकार्जुन कोळनुरे यांनी उमरगा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपींवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पुढील तपास उमरगा पोलिस करीत आहेत.

## दहावीच्या विद्यार्थ्यांची कल चाचणी घ्या : उमाकांत कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**
दहावीनंतर विद्यार्थ्यांच्या करिअरची दिशा ठरविण्यास महत्वपूर्ण असणारी कलचाचणी गेल्या चार वर्षांपासून बंद असून ही कलचाचणी तत्काळ सुरु करण्यात यावी , अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे.



निवेदनात म्हटले आहे की, दहावी व बारावीचे वर्ष म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्वाचा कालावधी असतो. आयुष्याला वळण मिळण्याच्या या काळातच त्यांच्या करिअरची दिशा ठरत असते. विद्यार्थ्यांचा कल , आवड कोणत्या विषयात, क्षेत्रात आहे. हे शिक्षक व पालक यांना समजून घेण्यासाठी राज्याच्या शिक्षण विभागामार्फत मोफत कलचाचणी घेण्यात येत होती.

तथापि गेल्या चार वर्षांपासून ही कलचाचणी परीक्षा बंद करण्यात आली आहे. यामुळे पालक व विद्यार्थी यांना पुढील शिक्षणासाठीचे पर्याय निवडताना अडचणी येत आहेत.

खासगी संस्थांकडून कलचाचणी करुन घेण्यासाठीचा आर्थिक खर्च सर्वसामान्य व ग्रामीण भागातील पालकांना परवडणारा नाही.

त्यामुळे यंदा फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये दहावीची परीक्षा दिलेल्या सुमारे १६ लाख विद्यार्थ्यांची शिक्षण विभागामार्फत कलचाचणी घेण्यात यावी तसेच किमान दहा शाळांमागे एक याप्रमाणे समुपदेशक शिक्षक यांची नेमणूक करण्यात यावी, अशी मागणी शिक्षक परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष उमाकांत कुलकर्णी यांनी शुक्रवारी (ता.२१) निवेदनाद्वारे शिक्षणमंत्र्यांकडे केली आहे.

> कलचाचणी ही मानसशास्त्रीय चाचणी असून याद्वारे विद्यार्थ्यांचा कल, आवड, व्यक्तिमत्त्व, कौशल्य, नैसगिर्क बुध्दिमत्ता, बुद्ध्यांक, स्ट्राँग पॉईंट, वीक पॉईंट इत्यादी बाबी समजण्यास मदत होते. दहावी नंतर पुढील उच्च शिक्षणासाठी कोणत्या ज्ञानशाखेत प्रवेश घ्यावा, कोणता पदवी अभ्यासक्रम निवडावा याबाबतच्या गोंधळातून बाहेर पडण्यासाठी कलचाचणी महत्वाची ठरते. विद्यार्थ्यांना योग्य त्या शैक्षणिक व व्यावसायिक शिक्षणक्रमाची निवड करणे कलचाचणी मुळे सोपे जाते.
>
> **- उमाकांत कुलकर्णी**
> राज्य कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद.

## तुळजापूरात 'खोक्या' साठी पारधी समाजाचे रस्ता रोको आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२३ मार्च -**
पारधी समाजाने दि.२३ मार्च रोजी जुन्या बसस्थानका समोरील विश्वनाथ चौकात सतीश भोसले उर्फ खोक्या भाईच्या समर्थनार्थ रस्ता रोको आंदोलन केले.

सतीश भोसले याला जाणिवपूर्वक अडकण्यात येत असल्याचा आरोप पारधी समाजाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. खोक्याला प्रयागराजमधून अटक करण्यात आली. आणि वनविभागाने खोक्याचे घर वन विभागाच्या जमिनीवर असल्याचे सांगून त्याच्या घरावर बुलडोजर फिरवला. काही अज्ञातांनी त्याच्या घरातील वस्तू जाळून टाकल्या महिलांना मारहाण झाल्याचाही आरोप देखील करण्यात आला होता.

सतीश भोसले हा केवळ पारधी समाजातील असल्याने अन्यायकारकपणे अडकवले जात असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजीतून केला. आंदोलन स्थळी तहसील कार्यालयाचे मंडलाधिकारी यांना निवेदन देण्यात आले त्यानंतर वाहतूक सुरळीत चालू झाली.

या आंदोलनात पारधी समाजाच्या महिलांसह पारधी समाज कार्यकर्त्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

## कळंबमध्ये ऑप्टिकल दुकान फोडले

### २८ हजार ४१५ रुपयांचा ऐवज चोरीला



**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२३ मार्च -**
कळंब शहरातील आठवडी बाजार रोड येथे असलेल्या मैत्री ऑप्टीकल्स दुकानाचे शटर अज्ञात चोरट्याने उचकटून दुकानातील चष्मे आणि रोख रक्कम असा एकूण २८,४१५ रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, दि.२१ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजल्यापासून ते दि.२२ मार्च रोजी सकाळी १० वाजेच्या दरम्यान ही चोरी घडली. फिर्यादी विष्णु श्रीमंत लांडगे (वय २३, रा. बारामाई गल्ली, केज, जि. बीड) यांनी कळंब पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला आणि दुकानातील महागडे चष्मे व रोख रक्कम असा मिळून २८ हजार ४१५ रुपयांचा माल चोरून नेला.

याप्रकरणी कळंब पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३३१ (४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

कळंब शहरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागरिकांनी घराबाहेर जाताना सतर्क राहण्याचे आवाहन कळंब पोलिसांकडून करण्यात आले आहे.

### पहिलीपासून सीबीएसई अभ्यासक्रम लागू...

## निर्यणाचे स्वागत करत उमरग्यात मिठाई वाटून आनंदोत्सव साजरा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ मार्च -**
उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये शासनाने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली वर्गाला जिल्हा परिषदेच्या सर्व शाळेमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम लागू केल्याबद्दल उमरगा येथील अशोक बनसोडे, माधव पाटील, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, मुख्याध्यापिका उपासे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शाळेतील विद्यार्थ्यांनी मिठाई वाटून या निर्णयाचे स्वागत करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी महिला व बालकल्याण कडून चालवण्यात येणाऱ्या अंगणवाडीताई मुळे, फर्जाना, प्राथमिकचे सर्व शिक्षक यांनी सहभाग घेतला. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना पहिलीपासून सीबीएससी करून शासनाने अनेक गरीब मुलांना न्याय मिळवून दिलेला आहे. या निर्णयामुळे ज्यांच्याकडे आर्थिक परिस्थिती नाही महागडी फीस भरून सीबीएसईच्या शाळेत जाऊ शकत नाही अशा सर्व सामान्य गोरगरीब, दीनदलित, अनाथ विद्यार्थ्यांना आता सीबीएसईचे शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेतून विद्यार्थ्यांना मिळणार आहे. त्यामुळे या निर्णयाचे स्वागत शाळेतील सर्व शिक्षकांबरोबरच पालकातून व समाजातून मोठ्या प्रमाणात होत आहे.कार्यक्रमांमध्ये अशोक बनसोडे यांनी पाच किलो मिठाई विद्यार्थ्यांना वाटून आनंदोत्सव साजरा केला.

या आनंदामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी सर्व शिक्षक व पालक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

यावेळी धनराज तेलंग, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, सदानंद कुंभार, संजय रूपाजी, ममता गायकवाड, वर्षाराणी पाटील, सोनाली मुसळे, पुजा गुंडीले, धनराज गाडेकर, व इतर सर्व शिक्षक उपस्थित होते.

## धाराशिव व कळंब शहरातील अल्पसंख्यांक भागाच्या विकासासाठी निधी द्यावा : शेख

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**
धाराशिव व कळंब शहरातील अल्पसंख्यांक वस्ती असलेल्या भागांमध्ये विकासाची कामे झालेली नाहीत. त्यामुळे तो भाग अविकसित राहिलेला आहे.

त्या भागात विकासात्मक कामे करण्यासाठी अल्पसंख्यांक विकास अंतर्गत भरीव निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी

भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चाचे धाराशिव कळंब

विधानसभा अध्यक्ष शौकत शेख यांनी राज्याचे अल्पसंख्यांक क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांची मंत्रालयात दि.२१ मार्च रोजी सदिच्छा भेट घेऊन केली आहे.

## नळदुर्ग पोलिस ठाण्यात शांतता कमिटी बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ मार्च -**
नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या वतीने २३ मार्च रोजी आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत आगामी काळातील सण आणि उत्सव शांततेत साजरे करण्याची अपील केली गेली. सहाय्यक पोलिस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके यांनी सर्वांना पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. या बैठकीत माजी नगराध्यक्ष शहेबाज काजी, मुश्ताक कुरेशी, माजी नगरसेवक कमलाकर चव्हाण, शहर शिवसेना प्रमुख संतोष पुदाले आणि अन्य प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते.

बैठकीत गुडी पाडवा, रमजान ईद आणि श्रीराम जन्मोत्सवाच्या उत्सवांना शांततेत साजरे करण्याची चर्चा झाली.

यावेळी, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कडक कारवाईची मागणी करण्यात आली. तसेच मटका आणि जुगार बंद करण्याची मागणीही उठवली गेली.

सामाजिक कार्यकर्त्या कल्पना गायकवाड यांनी बायपास रस्त्यावर टवाळखोर युवकांच्या छेडछाडीवर कडक कारवाई करण्याची सूचना केली.

शांतता कमिटीच्या सदस्यांनी सर्व सण आणि उत्सव डॉल्बी मुक्त साजरे करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या बैठकीत करण्यात आलेल्या मागण्या लवकरच तात्काळ कार्यवाहीसाठी पोलिस प्रशासनाकडे पाठवण्यात आल्या आहेत.

## टीबी हारेगा, इंडिया जीतेगा या मोहिमेसाठी नेते विरुद्ध अभिनेते यांच्यात रंगला क्रिकेट सामना

### सामान्यात खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचाही सहभाग....




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**
'टीबी मुक्त भारत' या महत्वाकांक्षी अभियानाच्या प्रचारासाठी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या पुढाकाराने मुंबईतील वांद्रे कुर्ला संकुल (BKC) येथील एमसीए क्रिकेट मैदानावर विशेष क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले.

या सामन्यामध्ये नेते संघाकडून धाराशिव लोकसभा मतदार संघाचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी सहभागी होत फलंदाजी व गोलंदाजीचा आनंद घेतला. 'नेते' विरुद्ध 'अभिनेते' अशा दोन संघांमध्ये खेळवण्यात आलेल्या या रोमांचक सामन्यात अभिनेता संघाने विजय मिळवला.

सामना अत्यंत अटीतटीचा झाला. दोन्ही संघांनी उत्कृष्ट फलंदाजी आणि गोलंदाजी करत सामना रंगतदार केला. अखेरच्या षटकात अभिनेता संघाने शानदार कामगिरी करत नेते संघावर विजय मिळवला.

या सामन्यात खेळाडूंनी क्रिकेटच्या माध्यमातून क्षयरोगाविषयी जनजागृती करण्याचा संदेश दिला.

या विशेष सामन्याच्या निमित्ताने क्षयरोग निर्मूलन मोहिमेस चालना देण्याचा उद्देश होता. उपस्थित मान्यवरांनी आणि खेळाडूंनी 'टीबी मुक्त भारत' या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. समाजात क्षयरोगाविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि लोकांनी वेळीच उपचार घ्यावेत, यासाठी अशा उपक्रमांचे महत्व अधोरेखित झाले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांचे विशेष कौतुक करण्यात आले. या उपक्रमामुळे टीबी मुक्त भारताच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल टाकण्यात आले असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

# नांदेड जिल्हा विकासाच्या प्रवाहात आणू

## नरसी येथिल पक्ष प्रवेश सोहळ्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आश्वासन

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २३ मार्च**

मराठवाड्यातील नांदेड जिल्हा हा मला विकासाच्या प्रवाहात आणून दाखवेन आज विरोध जरी राज्याच्या तिजोरीत खडखडाट आहे असे जरी म्हणत असले तरी मी राज्याचा अकरा वेळा अर्थसंकल्प सादर करणारा एक व्यक्ती आहे उलट त्याचबरोबर येथील शेतकऱ्यांत आर्थिक सुबत्ता आली पाहिजे त्या साठी आता थोड्याच दिवसात राज्य प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असलेला तूम्हाला पाहायला मिळेल असे असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.नरसी येथील पक्ष प्रवेश सोहळ्यात ते बोलत होते.

या सोहळ्यात जिल्ह्यातील जेष्ठ नेत्यांपैकी एक गणल्या जाणारे व अखिल भारतीय काँग्रेस पक्षातील जेष्ठ नेते तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगांवकरांनी राज्यांतील उपमुख्यमंत्री अजित पवार, महाराष्ट्र राज्याचे प्रांतध्यक्ष सुनील तटकरे, राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री नवाब मलिक,आमदार संजय बनसोडे,यांच्या उपस्थितीत आपले कट्टर समर्थक माजी आमदार अविनाश घाटे, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा माजी जि.प.सदस्य डॉ.मिनल ताईसह नायगांव तालुक्यासह बिलोली,देगलूर मधील आजी-माजी नगरसेवक, सरपंच खतगांवकर हित चिंतकांसह अनेक कट्टर समर्थकांनी नरसी येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात यावेळी जाहीर पक्ष प्रवेश केला.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रवेश सोहळ्या प्रसंगी सर्व प्रथम राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज,शंकरराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पअर्पण करीत दिपप्रज्वलन करून महाराष्ट्र गीताने पक्ष प्रवेश सोहळ्याला सुरुवात करण्यात आली.तद्नंतर उपमुख्यमंत्री अजित पवारांचा भास्करराव पाटील खतगावकर व डॉ. मिनल ताई खतगांवकर यांच्या सकारात्मक उर्जे चा प्रतीक असलेला खोबरा हार घालून यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर म्हणाले कि, राज्यातील आघाडी सरकार मधील राष्ट्रवादी पक्ष घटक पक्ष आहे राज्यातील शेतकरी व सर्व सामान्यांच्या हितांचे जर हा पक्षाचा जिल्ह्यात एक आमदार जरी आसलो तरी आता नव्यानेच जिल्ह्यातील मुरब्बी राजकारणी म्हणून परिचित असलेले भास्करराव पाटील खतगावकर हे आता माझ्या जोडीला असुन उद्याच्या होणा-या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत मी आणि भास्करराव पाटील खतगावकर व आमच्या पक्षातील प्रमाणिक मावळ्यांच्या बळावर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेवर झेंडा फडकविल्या शिवाय राहणार नाही असे जाहिर आवाहन प्रताप पाटील चिखलीकर यांनी केले.

जिल्ह्याचे मुरब्बी राजकारणी माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर म्हणाले कि गेल्या काही अनेक वर्षापासून जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या शेतीसाठी लागणारे पाण्याचा मानणार धरणातील प्रश्न आहे लेंडी धरणाच्या प्रश्नः यासारखे प्रश्न प्रलंबित आहेत त्यासाठी ते फक्त आपला पक्ष आपल्या माध्यमातूनच तूम्ही सोडवू शकता अशी मागणी करीत आपल्या स्नुषा व माजी जिल्हा परिषद सदस्या डॉ. मिनल ताईना तूमच्या दोन समान तूमची मूलगी म्हणून तूमच्या कडे सोपवितो व ती तूमच्या नेतृत्वाखाली सामाजिक कार्य उल्लेखनीय करेल असा विश्वास यावेळी बोलून दाखवला.

## 'शाहू'ची गांधीतीर्थ स्वच्छ शाळा स्पर्धेच्या अंतिम फेरीत निवड

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २३ मार्च**

येथील 'श्री शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालया'ची गांधीतीर्थ स्वच्छ शाळा स्पर्धेच्या अंतिम फेरीत निवड झाली असून संपूर्ण नांदेड जिल्ह्यासाठी ही बाब अतिशय आनंदाची व अभिमानाची आहे. विशेष म्हणजे यंदाच्या 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२' मध्ये शाळेला विभागीय पातळीवर पारितोषिक मिळाले आहे. ऑक्टोबर महिन्यात मुंबई येथे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, शिक्षणमंत्री दीपक केसरकर, राज्याचे शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक आदींच्या हस्ते शाळेला पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला होता.

जळगाव येथील 'महात्मा गांधी रिसर्च फाउंडेशन' ही एक सुविख्यात संस्था असून या संस्थेतर्फे ही स्पर्धा आयोजित करण्यात येते.



महाराष्ट्रातील सर्व शाळांमधून यंदा 'शाहू'ची अंतिम फेरीत निवड झाली असून या प्रतिष्ठेच्या सन्मानासाठी नामांकन मिळणं ही बाब भूषणावह आहे. त्यासाठी श्री लाल बहादूर शास्त्री शिक्षण संस्थेचे सचिव शिरिषभाऊ देशमूख गोरठेकर, संचालक कैलासभाऊ देशमूख गोरठेकर, प्राचार्य संजय देशमुख कामनगावकर, संस्थेचे विविध पदाधिकारी, पत्रकार आदींसह सर्व स्तरांतून 'शाहू परिवारा'वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### सांस्कृतिक कार्य विभागाची सांस्कृतिक मानवंदना

**नांदेड**-चित्रपट कथा व पटकथाकार वसंत सबनीस यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागाने सांगितिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन २२ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता केले होते. चित्रपट कथा व पटकथाकार वसंत सबनीस यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त वसंत बहार या सांस्कृतिक कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांची असून मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा अपर मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विभाग विकास खारगे यांच्या मार्गदर्शनातून कार्यक्रमाची निर्मिती झाली आहे. या कार्यक्रमात ख्यातनाम कलावंत सहभाग घेतला. संगीत संयोजन आनंदी विकास तर संवाद निरजा आपटे, देविदास फुलारी यांचा होता. ख्यातनाम गायक गायिका सागर जाधव, शेफाली कुलकर्णी, विश्वास अंबेकर, मीना सोलापूरे, आसावरी रवंदे या कलाकारांच्या कला सादरीकरणातून तसेच मुर्तिकार व्यंकट पाटील यांच्या सादरीकरणातून चित्रपट कथा व पटकथाकार वसंत सबनीस यांच्या स्मृतीला उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहसंचालक श्रीराम पांडे यांनी केले.

### बहुजन सेवा संघाच्या वतीने ॲड. परमेश्वर गोणारे यांचा सत्कार



**नांदेड**-ऑल इंडिया बार एक्झाम परीक्षेमध्ये परमेश्वर गोणारे हे नुकतेच उत्तीर्ण झालेले असून या अनुषंगाने त्यांचा बहुजन सेवा संघाचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष माननीय मनीष भाऊ कावळे यांच्या हस्ते जाहीर सत्कार करण्यात आला यावेळी बहुजन सेवा संघाचे केंद्रीय सदस्य सखाराम मामा इंगोले तसेच जिल्हा कार्यकारणी सदस्य माननीय भीमरावजी सातोरे तसेच कर्मचारी शाखेचे सदस्य गौतमजी भंडारे तसेच सेवा संघाचे कार्यालयीन सचिव नारायणराव घुले आदी कार्यकर्ते उपस्थित होते. ॲड. परमेश्वर गोणारे हे ऑल इंडिया बार एक्झाम परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाल्यामुळे आदिवासी कोळी समाज तथा संपूर्ण बहुजन समाजामध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झालेले आहे निश्चितच त्यांच्या कायदेशीर ज्ञानाचा फायदा व लाभ बहुजन समाजाला मिळणार आहे.

### सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची इब्राहीमबेग पटेल निवासस्थानी भेट



**नरसी**-महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील हे २३ मार्च रोजी रविवारी नायगांव तालुका दौ-यावर आले असता नरसी येथील पोलीस पाटील इब्राहीम बेग पटेल यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन विवीध विषयावर संवाद साधला याप्रसंगी अहमदपूर येथील मौलाना आझाद एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष मुजीब पटेल जहागीरदार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा नरसीच्या वतीने पोलीस पाटील इब्राहीम बेग पटेल यांनी कौटुंबिक सत्कार केला. याप्रसंगी सपोनि श्रीधर जगताप, उपसरपंच प्रतिनिधी अलीम बेग पटेल, उद्योजक मोबीन पटेल, वसीम बेग पटेल, नयूम पटेल, अस्लम बेग पटेल, गौसमामू, सय्यद पीररसाब आदींची उपस्थीती होती.

### 'स्वारातीम' विद्यापीठामध्ये शहीद दिनानिमित्त अभिवादन

**नांदेड**-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील स्वागत कक्षामध्ये दि.२३ मार्च रोजी शहीद दिनानिमित्त शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर, रवींद्र गुर्जर, शितल कोकाटे, शिरीष सहस्त्रबुद्धे, नारायण हरळीकर, शामराव जोशी, विलास पोतदार, पराग लोणकर, सुनील करमरकर, तनुजा शाह, आदित्य हर्डीकर, जयश्री बोकील, सुप्रिया गोडबोले, सुचिता नांदापूरकर फडके, सायली धोंगडे, म. इ. तंगावार, सुरश्री जोशी, अनघा नाटेकर, रवींद्र अभ्यंकर, दाक्षायणी पंडित, संपदा पाटगावकर, विकास साटम, रत्नाकर रेगे, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, अधिसभा सदस्य शिवाजी चांदणे, रामदास खोकले, गोपिराज हंबर्डे, मारोती कदम, बबन हिंगे यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

## दलित साहित्याने मला जगण्याचा सन्मान दिला : दत्ता भगत

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २३ मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या वतीने दिनांक २२ मार्च २०२५ रोजी दलित साहित्य जागतिक परिप्रेक्ष्य ( Dalit literature a perspective) आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन दत्ता भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या याप्रसंगी बोलताना म्हणाले की दलित साहित्यांनी माला जगण्याचा सन्मान दिला .यार्चासत्रात देश विदेशातील अभ्यासकानी दलित किंवा आंबेडकरी साहित्य या विषयावर मार्गदर्शन केले.



स्वारातीम विद्यापीठ येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या वतीने दलित साहित्य : जागतिक परिप्रेक्ष्य या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात आपले मनोगत व्यक्त करताना दत्ता भगत म्हणाले की मी तसा एका शैक्षणिक कुटुंबाचा भाग होतो; माझे आणि यापरिसराचे जिव्हाळ्याचे नाते होते त्या सर्व माझ्या स्मृती जागी झाल्या. या व अशा अनुभवातून मला जगण्याचा सन्मान मिळाला.

दलित किंवा आंबेडकरी साहित्य हा आधुनिक भारतीय साहित्यातील एक महत्त्वाचा साहित्य प्रवाह आहे सामाजिक व वांग्मयीन अशा दुहेरी विचार मंथनातून स्वातंत्र्योत्तर काळात ही संज्ञा पुढे आली. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी या कार्यक्रम आयोजक डॉ.पी.विठ्ठल यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पी. विठ्ठल यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. राजेंद्र गोणारकर व डॉ.राजपालसिंग चिखलीकर यांनी केले.सदरील कार्यक्रम यशस्वीरित्या पारपाडण्यासाठी डॉ. शिवराज मंगनाळे, डॉ. वैजनाथ अनमुलवाड, डॉ. योगिनी सातारकर, डॉ. सविता पाटील, संदिप एडके,काळबा हनवते, डॉ. हर्षवर्धन दवणे, डॉ. संदीप जाधव, डॉ. प्रशांत घोडवाडीकर, प्रदीप बिडला, स्वप्नील नरबाग, प्रकाश दीपके, सतिश वागरे, सचिन खडके, गजानन इंगोले, संभा कांबळे, बालाजी शिंदे, विशाल कंधारकर, प्रकाश तारू, विजय पांगरीकर, शशिकांत लोहबंदे, जनार्दन गवंदे, नरसिंग कागडा, शेख रशीद, ऋतुराज बुक्करे, ढोले आदींनी परिश्रम घेतले.

## जम्मू-कश्मीर मधील स्थित्यंतराचा अभ्यास आवश्यक : गिरीधर मामेडी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २३ मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शिक्षण शास्त्र संकुलाद्वारे जम्मू व काश्मीर येथील कलम ३७० हटविल्यानंतर झालेल्या सामाजिक, आर्थिक स्थित्यंतराच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय परिषदेचे दि. १९ ते २१ मार्च या कालावधीत आयोजन करण्यात आले होते. पीएम उषा अंतर्गत या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संशोधक विद्यार्थी, अभ्यासक यांनी सहभाग नोंदवून शोधनिबंधांचे वाचन केले.

आंतरविद्याशाखा अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. बाविस्कर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. काश्मीर विषयक प्रश्नांचे अभ्यासक



गिरिधर मामेडी हे उद्घाटक व बीजभाषक म्हणून उपस्थित होते. दीप प्रज्वलन व स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेला अभिवादन करून परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. कलम ३७० विषयक प्रश्न हे केवळ राजकीय प्रश्न नसून लोकशाही देशाची प्रादेशिक अखंडता सामाजिक सांस्कृतिक ऐक्य आणि जम्मू कश्मीर मधील जनतेच्या विकासाशी संबंधित होते म्हणून अडथळ्याच्या स्वरूपातील हे कलम हटविणे हे आवश्यक होते असे प्रतिपादन गिरीधर मामेडी यांनी व्यक्त केले. तसेच सर्व भारतीय नागरिकांनी काश्मीरला भेट देऊन तेथील परिस्थितीचा सकारात्मक अनुभव प्रत्यक्षपणे घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. जम्मू काश्मीरचा प्रश्न हा विशिष्ट प्रदेशाचा राजनैतिक प्रश्न नसून त्याचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक अनुबंध लक्षात घेता त्या सर्वांचा आंतरविद्याशाखीय अभ्यास शैक्षणिक दृष्टिकोनातून होणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊनच या परिषदेच्या आयोजन करण्यात आल्याचे डॉ. सिंकू कुमारसिंह यांनी आपल्या प्रास्ताविकात स्पष्ट केले.

जम्मू कश्मीर विषयक या प्रकारच्या चर्चेमुळे केवळ राजकारणाभिमुख चर्चा व माध्यमांच्याद्वारे प्रस्तुत असे एवढ्यावरच मर्यादित न राहता योग्य प्रकारची जागरूकता, माहिती नवीन ज्ञान व धोरण निर्मितीच्या दृष्टीने समोर येईल असे मत अध्यक्षीय समारोपात डॉ. बाविस्कर यांनी व्यक्त केले.

परिषदेच्या दुसऱ्या सत्रात अभ्यासक विनयसाठी चाटी यांनी कलम ३७० च्या कायदेविषयक बाजू त्या दूर करण्याची आवश्यकता व पर्यायी तरतुदी या सर्वांची मांडणी विशेष व्याख्याना द्वारे सादर केली. परिषदेच्या आमंत्रक डॉ. वैजयंता पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## उमरी ते शिर्डी पदयात्रेचे नांदेडमध्ये आगमन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ मार्च**

संत श्री दासगणू महाराज यांच्या कृपा आशीर्वाद लाभलेल्या उमरी ते शिर्डी पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून काल रविवारी यात्रेचे नांदेड शहरात आगमन झाले. विविध सामाजिक धार्मिक संस्थांनी ठिक ठिकाणी उत्स्फूर्त असे स्वागत करण्यात आले.

मराठवाड्यातुन मानाची असलेली उमरी ते शिर्डी ही पदयात्रा पालखी स्वरूपात असून मागील १४ वर्षापासून यात्रेचे आयोजन करण्यात येते. आनंदी दास देशमुख यांनी बाबा टायर्स येथे साईं पालखीचे पुष्पवृष्टी करून मोठे स्वागत केले...चहा, बिस्कीट अल्पोपहार देऊन आशीर्वाद घेतला. दरम्यान यात्रा झुलेलाल बाबा मंदिर येथे नतमस्तक झाली. वाजेगव येथे खा रवींद्र चव्हाण यांनी यात्रेला भेट दिली. यात्रेचे त्यांनी स्वागत केले. शिवाजीनगर येथील श्री हनुमान मंदिर येथे पालखीची आरती करण्यात आली, स्वागत झाले. साई भक्त तथा नांदेड मर्चंट को ऑपरेटिव्ह सहकारी बँकेचे अध्यक्ष दिलीप कंदकुर्ते व नानक साई फाऊंडेशन चे अध्यक्ष पंढरीनाथ बोकारे यांच्या वतीने यात्रेचे अध्यक्ष गोपाल राठोर, कार्यकारी अध्यक्ष अशोक मामीडवार, उपाध्यक्ष महेश नग्रूरवार (हुंडेकर), कृष्णा देशमुख,संदीप लापशेतवार यांचे प्रातिनिधिक स्वागत केले. जवळपास पंधरा दिवस चालणारी ही पदयात्रा रामनवमीच्या दिवशी शिर्डी येथे दाखल होणार आहे. शिर्डी येथे शिर्डी संस्थानच्या वतीने यात्रेचे जोरदार स्वागत करण्यात येते. श्री संत कवी दासगणु महाराज साई भक्त मंडळ गोरटे संचलित पालखीत जवळपास सव्वाशे भाविक भक्त सामील झाले आहेत.




नांदेड-काँग्रेस अल्पसंख्याक विभाग प्रदेश उपाध्यक्ष मसूद अहेमद खान यांच्यावतीने न्यू फेमस फंक्शन हॉल येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी खा. रविंद्र पाटील चव्हाण, आयोजक मसूद अहेमद खान, शेर अली, अल्पसंख्याक विभाग जिल्हाध्यक्षरहिम खान, शमीम अब्दुला, सुरेश गायकवाड, अलीम खान, सुभाष रायबोले, तिरुपती पा. कौंढेकर, संदिप सोनकांबळे, सुरेंद्र घोडजकर, गंगाधर सोनकांबळे, आदीसह मुस्लीम बांधव मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री अजित पवारांचे नांदेड विमानतळावर स्वागत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ मार्च**

महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री अजित पवार यांचे आज एक दिवसाच्या दौऱ्यासाठी श्री. गुरू गोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन झाले. यावेळी त्यांच्यासोबत प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, माजी मंत्री नवाब मलिक यांचेही आगमन झाले.

यावेळी त्यांचे आमदार विक्रम काळे, आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, आमदार राजू नवघरे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.



मनोहर चासकर, नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, राज्य उत्पादन शुल्कचे नांदेड विभागाचे विभागीय उपायुक्त डॉ. बी.एच.तळवी, अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर आणि विविध पदाधिकारी यांची उपस्थिती होती. जिल्ह्यामधील विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी ते नांदेड जिल्ह्याच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर आले आहेत.

## जागतिक वन दिनानिमित्त किनवट येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २३ मार्च**

दि. २१ मार्च २०२५ रोजी जागतिक वन दिनानिमित्त किनवट परिसरात सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड आणि वनविभागाच्या वतीने विविध ठिकाणी पर्यावरण संरक्षण आणि जनजागृतीसाठी कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमध्ये शैक्षणिक सहल, रॅली आणि धनादेश वाटप यांचा समावेश होता. या कार्यक्रमांनी वनसंवर्धनाचा संदेश प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवला.

मौजे कंचेली येथे रॅली आणि धनादेश वाटप

मौजे कंचेली येथे आयोजित कार्यक्रमाला उपवनसंरक्षक केशवजी वाबळे, सहायक वनसंरक्षक श्रीकांत इटलोड आणि वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) उमेश ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती. वनरक्षक आणि वनपाल, शिवणी, आप्पारावपेठ यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन केले. येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेत एक भव्य रॅली काढली. या रॅलीद्वारे वनसंवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्यात आला. विद्यार्थ्यांनी घोषणांच्या माध्यमातून जागरूकता निर्माण केली.

या प्रसंगी शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीसाठी मंजूर झालेल्या धनादेशांचे वाटप करण्यात आले. वनविभागाच्या या



पुढाकाराने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. तसेच, उपवनसंरक्षक वाबळे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे वनरक्षक आणि वनपाल यांच्या युनिफॉर्मसाठी मंजूर झालेल्या धनादेशांचेही वाटप कर्मचाऱ्यांना करण्यात आले. ज्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले. वाबळे यांनी मार्गदर्शन करताना वनसंवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांचे आवाहन केले आणि वनविभाग शेतकरी व कर्मचारी कल्याणासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

बेंदी तांडा येथे शैक्षणिक सहल आणि वन भ्रमंती सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांच्या वतीने विभागीय वनाधिकारी श्री. संदीप बाबू चव्हाण आणि सहायक वनसंरक्षक सौ. शुभांगी लोणकर यांच्या मार्गदर्शनाखाली बेंदी तांडा येथील जिल्हा परिषद शाळेतील सुमारे ४० विद्यार्थ्यांसाठी पैनगंगा अभयारण्यात शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. या सहलीत विद्यार्थ्यांनी वन भ्रमंती (सफारी)चा आनंद घेतला आणि जंगलांचे महत्त्व, वन्यजीव संरक्षण, तापमानवाढीचे दुष्परिणाम आणि वृक्षलागवडीचे फायदे याबाबत माहिती मिळवली.

संदीप चव्हाण यांनी एक विद्यार्थी, एक झाड संकल्पना समजावून सांगितली आणि येत्या पावसाळ्यात वृक्षलागवडीचे आवाहन केले. यंदाच्या वने व अन्न या संकल्पनेवरही त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात सहायक वनसंरक्षक भरत खेळबाडे, वनपरिक्षेत्र अधिकारी धीरज मदने, संध्या बगडे यांच्यासह एस. पी. डोईफोडे, टी. ए. देवकते, बालाजी एस. भुरके, सुनील खामकर, बाळासाहेब तिडके, शिक्षकवृंद, वन्यजीव रक्षक तसिफ खान आणि पैनगंगा अभयारण्यातील टीम तसेच वनमजूर रसूल शेख, रामराव राठोड, अंकुश राठोड, वेदचार्य राठोड यांनी मोलाचे योगदान दिले. सहलीच्या समारोपात विद्यार्थ्यांना जेवण देण्यात आले.

व्यापक सहभाग आणि प्रभावी संदेश दोन्ही ठिकाणच्या कार्यक्रमांना वनविभागातील कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. जागतिक वन दिनानिमित्त आयोजित या विविध उपक्रमांनी पर्यावरण संरक्षण आणि वनसंवर्धनाचा संदेश प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवला.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## डॉ. श्रीधर कोल्हे यांना उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च -** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने युवकांच्या करियरला योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रभर विविध महाविद्यालयात करियर कट्टा हा उपक्रम राबविला जातो. यंदा लातूरच्या जयक्रांती महाविद्यालयात हा उपक्रम अतिशय पद्धतशीरपणे राबविल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे यांना स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ नांदेड येथे जिल्हास्तरीय उत्कृष्ट प्राचार्य या पुरस्काराने प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे.

याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी माजी मंत्री तथा शारदाभुवन एजुकेशन सोसायटीचे सचिव डी.पी. सावंत होते. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ मनोहर चासकर, प्रमुख पाहूणे म्हणून तर तसेच प्रा. डॉ. किरण कुमार बोदर, कुलसचिव डॉ. पवार, महाराष्ट्र माहिती सह्यायता केंद्राचे अध्यक्ष यशवंत शितोळे, प्राचार्य बाळासाहेब जाधव व प्रा. डॉ. सतिश चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

करियर कट्टा हा महाराष्ट्र शासनाचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची पूर्व तयारी करवून, विद्यार्थ्याला सक्षम बनविणारा अभिनव उपक्रम असुन या अंतर्गत मराविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाठी आय.ए.एस. आपल्या भेटीला, उद्योजक आपल्या भेटीला ई. योजना करीअर कट्टा मार्फत राबविल्या जातात. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी भारतीय राज्य घटनेवरील ऑनलाईन व्याख्यानांचे आयोजन करण्यात येते. या विविध उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे कार्य प्रो. डॉ. श्रीधर कोल्हे यांनी अतिशय उत्कृष्टरित्या व प्रभाविपणे केले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान केला आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## पटवेकर यांची डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेवर नियुक्ती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च -** डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्याच्या मराठवाडा विभागाच्या सहसचिवपदी निलंगा तालुक्यातील निटूर येथील श्री. के. वाय. पटवेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत कार्यरत राहील.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी ही घोषणा केली असून डिजिटल मीडिया क्षेत्रातील पत्रकारांसाठी कार्य करण्याच्या त्यांच्या अनुभव व योगदानाचा विचार करून त्यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे. श्री. पटवेकर हे डिजिटल माध्यमाच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून कार्यरत आहेत आणि पत्रकारितेच्या उच्च मूल्यांची जोपासना करत आहेत. या नियुक्तीनंतर पटवेकर यांच्यावर विविध जबाबदाऱ्या येणार असून, डिजिटल मीडिया क्षेत्रातील हित जोपासण्यासाठी आणि पत्रकारांसाठी कार्य करण्याचा त्यांनी संकल्प व्यक्त केला आहे. त्यांच्या निवडीबद्दल ज्येष्ठ पत्रकार संजय जेवरीकर, दीपरत्न निलंगेकर, सतीश तांदळे, संजय स्वामी, दिपक बाचे, विनोद कांबळे, लिंबराज पन्हाळकर, बालाजी उबाळे, नेताजी जाधव, किरण कुलकर्णी यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले.

## स्नेहसंमेलनातून मिळतो विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव : ॲड. गोजमगुंडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च -** प्रत्येक माणसामध्ये जन्मतःच काही उपयोजित कला गुण असतात. वार्षिक स्नेहसंमेलनातून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना त्यांचे कलागुण व्यक्त करण्याचे व्यासपीठ मिळत असल्याचे प्रतिपादन समारोप प्रसंगी ॲड. शैलेश गोजमगुंडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. प्रशांत मान्नीकर होते. यावेळी मंचावर डॉ. गणेश लहाने, डॉ. बाळासाहेब चव्हाण, क्रीडा संचालक डॉ. नितेश स्वामी, डॉ. मनिषा अष्टेकर, डॉ. विशाल वर्मा, डॉ. साईनाथ उमाटे, प्रा. शशिकांत स्वामी, डॉ. वैशाली सातपूते, डॉ. सुभाष मोरे, राजेश सेलूकर, ज्ञानेंद्र कातपुरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गणेश लहाने यांनी केले. अध्यक्षीय भाषणात बोलताना प्राचार्य डॉ. मान्नीकर म्हणाले, दयानंद वाणिज्य महाविद्यालय हे विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी काम करीत आहे. यावेळी क्रीडा, स्नेहसंमेलन निमित्ताने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा, ग्रंथालय विभाग आणि गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराला नागरिकांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च -** विलासराव देशमुख फाऊंडेशनच्या पुढाकारातून व विलासराव देशमुख वैद्यकीय शासकीय महाविद्यालय यांच्या सहकार्यातून ट्वेंटीवन ग्रीच्या संचालिका सौ. अदिती अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच लातूर शहरातील प्रभाग क्र.५ मधील कोल्हे नगर येथे आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना अंतर्गत सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले.या सर्वरोग तपासणी व उपचार शिबिराला नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात महिला डॉक्टरांद्वारे महिलांची स्तन विकाराची आयब्रेस्ट स्कॅन मशीनद्वारे मोफत तपासणी,त्वचारोग बालरोग विविध रक्त तपासण्या नेत्ररोग त्याचबरोबर एकूण १३५६ आजारावर शस्त्रक्रिया बद्दल नागरिकांना माहिती देण्यात आली तसेच ३७७ रुग्णांची सर्वरोग आरोग्य तपासणी करून त्यांना औषध गोळ्यांचे वाटप करून महिलांना त्यांच्या आरोग्याबद्दल जागरूक करून त्यांना मोफत तपासणी आणि उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव,डॉ. मेघराज चावडा संगीता मोळवणे , हेमंत लोहारे , वैद्यकीय कर्मचारी, जिल्हा काँग्रेस कमिटीचे विविध पदाधिकारी व गजानन बोयणे यांनी प्रयत्न केले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.

# लोकअदालतसह शास्ती माफी योजनेस प्रचंड प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च -** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व लातूर शहर महानगरपालिका लातूर यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीस थकबाकीदार मालमत्ता धारक यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

राष्ट्रीय लोक अदालत आयोजन चे मनपा मुख्यालय येथे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व्ही.व्ही पाटील, केसतीकर व मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले होते. सदरील लोक अदालत येथे पॅनल प्रमुख म्हणून पी. एम शिंदे निवृत्त जिल्हा न्यायाधीश व वकील प्रतिनिधी म्हणून वाघमारे यांनी काम पाहिले व एकूण २६१ प्रकरणात तडजोड करण्यात आली.

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता धारकाकडून सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात १००% कर वसुली करण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी कर संकलन विभागास दिले होते. त्यादृष्टीने उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या मार्गदर्शनाखाली कर संकलन विभाग वर्षाच्या सुरुवाती पासूनच टॅक्स वसुलीच्या दृष्टीने विविध उपक्रम/योजना राबवित आहे.. त्यानुसार मालमत्ता धारकाना विविध सूट/सवलती देण्यात आले होते. सोबतच थकबाकीदार मालमत्ता धारक यांच्याकडील थकीत कराची रक्कम पाहता ही प्रकरणे राष्ट्रीय लोकअदालत मधे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला व त्याकरिता १००% शास्ती माफी सुद्धा लागू करण्यात आली होती. तसेच सदर योजना एक दिवसासाठी संपूर्ण मालमत्ता धारकासाठी लागू करण्यात आली होती. त्यामध्ये लोकअदालत सोबतच शहरातील इतर थकबाकीदार असे मिळून तब्बल १५०० थकबाकीदार मालमत्ता धारकाकडून एकाच दिवसात ५ कोटी चा कर संकलन करण्यात कर विभाग यशस्वी झाला आहे.. १००% शास्ती माफी योजना व लोक अदालत मधे अधिकाधिक नागरीकाना सहभागी होता यावे या दृष्टीने कर अधीक्षक, क्षेत्रीय अधिकारी निर्मला माने , संतोष लाडलापुरे, बंडू किसवे, समाधान सूर्यवंशी यांच्यासह सर्व कर पर्यवेक्षक व वसुली लिपिक यांनी अथक परिश्रम घेतले.



सदरील सुटला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून लोकअदालत सह क्षेत्रीय कार्यालयात नागरिकानी टॅक्स भरणा करण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती.

उर्वरीत थकबाकीदार यांनी आपला थकीत टॅक्स भरून महांपलिकेला सहकार्य करावे असे आवाहन उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

## ‘उमंग’ वार्षिक स्नेहसंमेलनाची जल्लोषात सांगता

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च -** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी व सचिव रमेश बियाणी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या ‘उमंग’ वार्षिक स्नेहसंमेलन-२०२५ ची मोठ्या जल्लोषात सांगता झाली.

सदरील वार्षिक स्नेहसंमेलनात आनंद एक्स्पोमध्ये विद्यार्थ्यांनी कचोरी, समोसा, मठ्ठा, पाणीपुरी, वडापाव, जिलेबी असे विविधांगी खाद्यपदार्थांचे स्टॉल्स उभारून व्यवसायिकतेचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण धडे घेतले.वार्षिक स्नेहसंमेलन हे कलावंत घडविणारे व्यासपीठ असून सांस्कृतिक




कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध गुणदर्शनाला वाव देण्यात आला. संगीत व साधे शेलापागोट्याच्या माध्यमातून तरूणाईंमध्ये जल्लोष,उत्साहपूर्ण व खेळीमेळीचे वातावरण होते.

विद्युत रोषणाईचा प्रकाश. रंगीबेरंगी पोशाखाची झगमगाट. टाळ्यांचा आवाज. रंगीबेरंगी फेट्यांचा साज...सुरूची भोजनाचा आस्वाद...डीजे गाण्याच्या बोलावर थिरकणारी तरूणाईंची पावलं या सर्वांच्या माध्यमातून तरुणाईचा जल्लोष दिसून आला.

दयानंद विज्ञान महाविद्यालय हे केवळ वैज्ञानिक,शास्त्रज्ञ घडविणारे महाविद्यालय नसून सर्वगुण संपन्न, स्वताच्या पायावर सक्षमपणे उभे राहणारे विद्यार्थी आणि विविध कलागुणांनी निपून कलावंत घडविणारे महाविद्यालय अन् तरूणाईच्या सुप्त कलागुणांना वाव देणारे प्रभावी व्यासपीठ आहे.याही वर्षीच्या वार्षिक स्नेहसंमेलनात तरूणाईचा जल्लोष, मला पिरतिच्या झुल्यात झुलवा अन् राया मला इष्काचा गुलकंद खिलवा ,असं वाजवा की रात गाजवा की आवसची पुनव होऊद्या ,'सोडा सोडा राया नाद खुळा ', 'चंद्रा', ' पाटलांचा बैलगाडा ', ' झिंगाट ', ' अहो शेठ लई दिसानी झालीया भेट ', ' मदन मंजिरी ', ' कोंबडी पळाली', 'बाई वाड्यावर या आदी गाण्यावर तरूणाई थिरकली. सदरील वार्षिक स्नेहसंमेलन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे, दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, सेल्फ फायनान्सचे प्राचार्य प्रा.अनिलकुमार माळी,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे,विद्यार्थी विकास मंडळ प्रभारी प्राध्यापक व डॉ.युवराज सारणीकर, नवनाथ भालेराव आदिंच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

## कमी खर्चात अधिकचे उत्पादन हाच पर्याय

### खाद्यतेल अभियान कार्यशाळेत उमटला सुर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च -** खाद्यतेलाच्या अनुषंगाने सोयाबीनला विशेष महत्त्व आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी हे हुकमी पीक असून यावरच शेतकऱ्यांचे अर्थकारण अवलंबून आहे. सध्याच्या घटत्या दरात शेतकऱ्यांनी कमी खर्चात अधिकचे उत्पादन कसे पदरी पडेल यावरच भर देण्याचा सूर येथील स्व. दगडोजीराव देशमुख सभागृहात पार पडलेल्या खाद्यतेल अभियान-गळीतधान्यच्या कार्यशाळेत उमटला.

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-गळीतधान्यची विभागीय कार्यशाळा शनिवारी पार पडली. याकरिता लातूर, धाराशिव, परभणी, हिंगोली आणि नांदेड येथील कृषी अधिकारी व प्रगतशील शेतकरी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय कृषी सहसंचालक साहेबराव दिवेकर, जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी एम. डी. तीर्थकर, रमेश जाधव, कृषी उपसंचालक महेश क्षीरसागर, उपविभागीय कृषी अधिकारी दिलीप जाधव यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या अभियनामध्ये खाद्यतेल बियांची लागवड ते काढणीपर्यंत आणि त्यानंतरची बाजारपेठ इथपर्यंतचे मार्गदर्शन करण्यात आले.

## माजी आ.कव्हेकरांची कव्हा येथील ईफ्तार पार्टीस भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च -** मुस्लीम बांधवांचा महत्त्वपूर्ण व पवित्र सण म्हणून रमजान ईद हा आनंदाने साजरा केला जातो. या सणाच्या माध्यामातून एकमेंकातील बंधुभावाचे नाते दृढ करण्याचे कार्य केले जाते.

तीच परंपरा कायम ठेवत कव्हा येथील हारूण पटेल यांनी राजीव नगर, कव्हा येथील मस्जिद ए नदीम या ठिकाणी ठेवलेल्या ईफ्तार पार्टीस भाजपा नेते तथा माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व युवा नेते तथा भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सदिच्छा भेट देऊन रमजान ईदच्या सर्व मुस्लीम बांधवांना शुभेच्छा दिल्या.

रमजानच्या या पवित्र महिण्यात चंद्रदर्शन होईपर्यंत रोज उपवास केले जातात. सूर्य उगवण्यापूर्वी अन्नाचे ग्रहण करायचे आणि संपूर्ण दिवस सूर्यास्त होईपर्यंत उपवास पाळायचा सूर्यास्त झाल्यानंतर नमाज करून प्रार्थना करायची आणि उपवास सोडायचा असा नियम संपूर्ण महिनाभर मुस्लीम समाजबांधव पाळतात. या पवित्र सणानिमित्त महिणाभर कुराण ग्रथांचे वाचन, चिंतन-मनन करण्याची परंपरा आहे. या रमजान ईदनिमित्त भाजपा नेते माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

## साहित्य क्षेत्रातील उज्ज्वल परंपरा हे लातूरचे बलस्थान : डॉ. रोडे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च -** ज्या प्रदेशाला आधुनिकतेचा स्पर्श नव्हता त्या भूमीने साहित्य क्षेत्रात निर्माण केलेली उज्ज्वल परंपरा हे लातूर जिल्ह्याचे बलस्थान आहे, असे प्रतिपादन प्रसिध्द विचारवंत तथा इतिहासाचे अभ्यासक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी केले.

लातूर जिल्हा ग्रंथोत्सवात ‘लातूरची साहित्य संस्कृती’ या परिसंवादाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, डॉ. जयद्रथ जाधव, विवेक सौताडेकर, धनंजय गुडसूरकर यांनी या परिसंवादात भाग घेतला.

ग्रंथोत्सव हा जाणीवा प्रगल्भ करण्याची संधी असून या माध्यमातून जिल्ह्याची उज्ज्वल साहित्य परंपरा




प्रतिबिंबित झाल्याचे मत डॉ. रोडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

लातूर जिल्ह्यातील साहित्य आणि संस्कृतीला समृध्द परंपरा असून त्याच्या पाऊलखुणांपासून आजपर्यंतच्या साहित्य प्रकारातील वैविध्याचा आढावा डॉ. जाधव यांनी घेतला. लातूर जिल्ह्याने मराठी साहित्य विश्वाला मोठी देण दिली आहे. लातूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहिलेले भारत सासणे व लक्ष्मीकांत देशमुख हे दोन अधिकारी पुढे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले, डॉ. श्रीपाल सबनीस हे जिल्ह्याचे पुत्र अखिल भारतीय सभेचे अध्यक्ष झाले, असे सांगून पत्रकार दगडे यांनी लातूरची साहित्य परंपरा विस्ताराने विशद केली. गुडसूरकर यांनी लातूर जिल्ह्यातील साहित्य चळवळीचा धांडोळा घेतला. जिल्ह्याच्या साहित्य चळवळीतून मोठी अक्षरयात्रा घडली असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

शिलालेख, ताम्रपट यांचा अभ्यास केला असता, १२ व्या शतकात लेखनाच्या प्रारंभाचे संदर्भ सापडतात, असे मत सौताडेकर यांनी व्यक्त केले. शैलजा कारंडे यांनी सूत्रसंचालन केले तर अवघी बेरकीळे यांनी आभार मानले.

## ‘बसवेश्वर’मध्ये प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च -** श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर (पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग) आणि वसुंधरा भाषा, मोडीलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये मोडीलिपी प्रारंभिक प्रशिक्षण वर्ग प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ. संजय गवई हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून वसुंधरा भाषा, मोडीलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्राचे अध्यक्ष तथा प्रशिक्षक महेश जोशी, लातूर जिल्हा इतिहास संकलन समितीचे सदस्य शहाजी पवार, मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, संयोजक तथा इतिहास विभाग प्रमुख डॉ. सदाशिव दंदे आणि प्रा. भीमाशंकर शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शेख बुशरा, गायकवाड मोहिनी, गायकवाड धिरज, इतिहास मंडळाचे सचिव शुभम दांडेगावे, मुस्ताफ सय्यद, प्रणाली पुरी या विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी बोलताना प्रमुख मार्गदर्शक महेश जोशी म्हणाले की, मोडीलिपी ही भाषा नसून त्याची भाषा ही मराठी आहे. आज इतिहासामधील अनेक माहिती मोडीलिपी मध्ये उपलब्ध आहे. तेव्हा ही मोडीलिपी आपण सर्वांनी समजून घेऊन आपला ऐतिहासिक ठेवा जतन करावा यासाठी आपण सर्वांनी सक्रिय सहभागी झाले पाहिजे. मोडीलिपीचा प्रारंभ यादव काळात झाला असून इंग्रजीमध्ये ज्याप्रमाणे कर्सिव्ह रायटिंग आहे त्याचप्रमाणे मराठी मधील कर्सिव्ह रायटिंग म्हणजेच मोडीलिपी होय, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रोफेसर डॉ. संजय गवई म्हणाले की, आपण सर्वांनी मोडीलिपी ही वृद्धिंगत केली पाहिजे त्यासाठी समाजातील आवड असणाऱ्या व्यक्तींनी मोडीलिपी समजून घेऊन तिचा वापर दैनंदिन व्यवहारांमध्ये केला पाहिजे आणि आपल्या देशामध्ये असलेला ऐतिहासिक ठेवा जतन केला पाहिजे असे ते म्हणाले. जिल्हा इतिहास संकलन समितीचे सदस्य शहाजी पवार यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सदाशिव दंदे यांनी केले.

## चुरशीच्या लढतीत महाराष्ट्र कुस्ती महा-वीर किताबाचा मानकरी ठरला घोडके

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च -** पुणे येथील सुहास घोडके आणि कुर्डूवाडीचा प्रमोद सुळ यांच्यात लातूर तालुक्यातील मौजे रामेश्वर येथे झालेल्या चुरशीच्या लढतीत सुहास घोडके यांने ५-0 अंकाने महाराष्ट्र कुस्ती महा-वीर हा खुल्या गटातील किताब मिळविला. रुपये सव्वा लाख रोख, चांदीची गदा, सुवर्णपदक व प्रशस्तीपत्रक देऊन त्याचा सत्कार करण्यात आला.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, पुरातन यज्ञभूमी रामेश्वर (रुई) ग्रामस्थ व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या मान्यतेने राष्ट्रधर्म पूजक दादाराव कराड स्मृती राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महा-वीर स्पर्धा रामेश्वर (रुई) येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धा गेल्या १८ वर्षापासून भरविण्यात येत आहेत. प्रतिवर्षाप्रामणे याही वर्षी २१ मार्च शुक्रवार रोजी मोठया उत्साहाच्या वातावरणात कुस्त्यांची दंगल झाली. या कुस्ती स्पर्धेत राज्यभरातून २०० पेक्षा अधिक मल्लांनी भाग घेतला होता.

पुणे येथील सुहास घोडके आणि कुर्डूवाडीचा प्रमोद सुळ यांच्यात शेवटची अत्यंत चुरशीची लढत झाली यात सुहास घोडके यांने ५-0 अंकाने विजय मिळवत महाराष्ट्र कुस्ती महा-वीर हा खुल्या गटातील किताब मिळविला. त्यांचा सव्वा लाख रोख, चांदीची गदा, सुवर्णपदक व प्रशस्तीपत्रक देऊन सत्कार करण्यात आला. तर प्रमोद सुळ यांनी उपविजेते पद मिळविले. त्यांना रौप्यपदक व रोख रुपये १ लाखाचे पारितोषिक देण्यात आले. जामखेड येथील सागर मोहोळकर यांला तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले. त्याला रुपये ५0 हजार रोख व कांस्य पदक देण्यात आले. चतुर्थ क्रमांकावर सोलापूर येथील कालीचरण सोलणकर याला २५ हजार रूपये रोख व पदक देण्यात आले. हिंद केसरी दीनानाथ सिंग, विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणेचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, , रामेश्वरचे माजी सरपंच तुळशीराम कराड, काशीराम कराड, लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड, डॉ. हनुमंत कराड, राजेश कराड, ऋषिकेश कराड, प्रा. विलास कथुरे यांच्या हस्ते विजेत्यां मल्लांना पारितोषिक देण्यात आले. यावेळी वस्ताद पै. निखिल वणवे उपस्थित होते. ७५ पेक्षा अधिक वर्षे वय असलेले अनेक मल्ल सहभागी झाले होते. या पैकी तात्या शेषराव नलावडे हे विजेते ठरले तर विष्णू हे उपविजेते ठरले. या पैलवानांचा योग महर्षी स्वातंत्र्यसेनानी वै. रामचंद्र गोपाळ शेलार उर्फ शेलार मामा स्मृती सुवर्ण, रौप्य व कांस्य पदके देऊन सत्कार करण्यात आला.

प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, रामेश्वरच्या मातीतून आज ना उदया राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कुस्तीपट्टू निर्माण होतील. भारताच्या कुस्तीक्षेत्रामध्ये आपले नाव उज्वल करतील. कुस्ती या क्रीडा प्रकारात आपले मन आणि मनगट मजबूत होते. आजच्या तरुणांनी कुस्तीकडे वळणे गरजचे आहे. या वेळी जालना येथील मंठा गावातील पैलवान वैष्णवी रामकिसण सोळंके हिने १५ मिनीटात अद्वितीय योगासनाचे प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची मने जिंकली. श्री. बाबा निम्हण यांनी स्पर्धेचे सूत्रसंचालन व धावते वर्णन केले.

लातूर जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शिवराज्याभिषेक सोहळा समिती वतीने शहीद दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**

शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या वतीने दि.२३ मार्च १९३१ रोजी हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनच्या विवेकी क्रांतिकारी भगतसिंग आणि त्यांचे दोन क्रांतिकारी साथीदार सुखदेव थापर आणि शिवराम हरी राजगुरू यांना सँडर्सच्या वधाच्या कारणाने फाशीची शिक्षा देण्यात आली होती.

भारत मातेच्या या महान सपूतांच्या हौतात्म्याने भारतीयांच्या मध्ये क्रांतीची ज्योत प्रज्वलित झाली होती.या हौतात्म्य पत्करलेल्या महान क्रांतिकारकांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले.

तसेच दि.२३ मार्च १९८२ रोजी मराठ्यांना आरक्षण मिळाले नाही तर मी उद्याचा सूर्य पाहणार नाही अशी पाच लाख लोकांसमोर शपथ घेऊन ती पूर्ण करणारे, मराठा महासंघाचे संस्थापक, लाखो माथाडी कामगारांचे कैवारी, मराठा आरक्षणाचे संकल्पक, मराठ्यांचे क्रांतीसुर्य स्वं. आण्णासाहेब पाटील यांनी समाजासाठी बलिदान दिले काही अण्णासाहेब पाटलांच्या बलिदानाच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

अण्णासाहेब पाटलांचे मराठा आरक्षण आणि माथाडी कामगारांसाठी केलेले अतुलनीय कार्य त्यांनी त्यांच्या मनोगतातून व्यक्त केले. शाहिद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांच्याविषयी शहर समिती सोशल मीडिया प्रमुख ऋषिकेश काळे यांनी संपूर्ण सँडर्स वधाचा घटनाक्रम तसेच भगतसिंगाचे संपूर्ण जीवन प्रवास त्यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व ओघवत्या वाणीने उपस्थितांना सांगून अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



#### उदयगिरीत शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरु यांना अभिवादन

**उदगीर, दि.२३ मार्च -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात शहीद दिनाच्या निमित्ताने भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील महान क्रांतीकारक भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.एन. हल्लाळे, आयआयटी गुवाहाटी येथील प्रा. प्रशांत पाटील, ग्रंथपाल डॉ.एल.बी. पेन्सलवार, दिनविशेष समिती प्रमुख डॉ. जी.जी. जेवळीकर, प्राध्यापकवृंद, विद्यार्थी आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.



#### छत्रपती महाविद्यालयात शहीद दिनानिमित्त हुतात्म्यांना अभिवादन

**उदगीर, दि.२३ मार्च -**

छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात शहीद दिनानिमित्त हुतात्मा भगतसिंग, राजगुरु, सुखदेने यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे यांच्या मार्गदर्शनानुसार शहीद दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील वरिष्ठ प्राध्यापक प्रा.एच.ए. तिरपुडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रा.डॉ.एस.डी. सावंत, प्रा.डॉ डी.बी. मुळे, प्रा.डॉ. चाटे, प्रा. पावडे शुभांगी, वळवी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयंती समितीचे सहसंयोजक डॉ.डी.बी. मुळे यांनी केले व आभार प्रा. शुभांगी पावडे यांनी मानले.

#### धाराशिव शहर वाहतूक शाखेची कारवाई

**धाराशिव, दि.२३ मार्च -**

शहरातील वाहतूक शाखा व संबंधित पोलीस ठाण्यांनी मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबवून मोठी कारवाई केली. २२ मार्च रोजी शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहतूक नियम भंग करणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध एकूण २२४ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईत वाहनचालकांकडून २,३४,००० रुपये तडजोड शुल्क म्हणून वसूल करण्यात आले.

# बेकायदेशीर नोकर भरती, पोषण आहार घोटाळ्यावर पांघरूण घालण्यासाठी खोटा गुन्हा दाखल

### राधिका श्रीराम सोळुंके यांचा आरोप... शिवाजी शिक्षण संस्थेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर...

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२३ मार्च -**

शिवाजी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका दीपश्री जाधव यांना आम्ही मारहाण केली नसून शाळेतील पोषण आहार घोटाळा व विद्यालयातील बेकायदेशीर कर्मचारी भरतीचे बोगस प्रकरण दडपण्यासाठी आमच्यावर खोटा गुन्हा दाखल झाला असल्याचे आरोप राधिका श्रीराम सोळंके यांनी केले आहे.

कार्यकारी मंडळातील सर्व सदस्यांना विश्वासात न घेता उपाध्यक्ष, सचिव व मुख्याध्यापिका दिपश्री जाधव यांनी संगणमत करून शिवाजी शिक्षण संस्थेच्या विविध शाळेत लाखो रुपये घेऊन बेकायदेशीर नोकर भरती केली आहे.

या मनमानी कारभारीची चौकशी करून मुख्याध्यापिका दीपश्री जाधव यांना निलंबित करावे, अशी मागणी राधिका श्रीराम सोळुंके यांनी निलंगा येथे आयोजित पत्रकार परिषदेत केली. शहरातील नाम अंकित अशा शिवाजी विद्यालयातील कर्मचाऱ्यातील वादामुळे शिवाजी शिक्षण संस्थेतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आले आहे.

पत्रकार परिषदेत पुढे बोलताना राधिका सोळुंके म्हणाल्या शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना माझे आजोबा माजी आमदार कै. श्रीपतराव सोळुंके यांनी केली आहे. माझी या संस्थेत २०१७ साली लिपिक पदावर नियुक्ती झाली असताना विद्यमान मुख्याध्यापिका दीपश्री जाधव यांनी शासनाकडे माझा प्रस्ताव न पाठवता दुसऱ्याचा प्रस्ताव पाठवून मान्यता घेत आहेत. याबाबत मी विचारणा करण्यासाठी गेले असता मला व माझ्या आईला मुख्याध्यापिका दीपश्री जाधव यांनी अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की केली व तू कोण आहेस मी ओळखत नाही म्हणून शाळेच्या बाहेर हाकलून दिले.

मुख्याध्यापिकेने विद्यमान कार्यकारी मंडळाला डावलून उपाध्यक्ष दत्ता सोमवंशी व सचिव बंडाप्पा काळगे यांच्या सल्ल्याने त्या मनमानी कारभार करत आहेत. अशाच पद्धतीने त्यांनी पैसे घेऊन तीन कर्मचाऱ्यांच्या नियुक्त केले आहेत.

त्या प्रकरणाची सुनावणी शिक्षण विभागाकडे सुरू आहे. माझ्या नियुक्तीला शिक्षणाधिकारी यांनी मान्यता न दिल्यामुळे मी न्यायालयात गेले आहे. न्यायालयाने शिक्षणाधिकारी व मुख्याध्यापिका यांनी निर्णय घेण्याचे सांगितले आहे.

माझ्यावर माझ्या आईवर खोटे आरोप करून खोटे गुन्हे दाखल केले आहेत. याची सखोल चौकशी करून उपाध्यक्ष व सचिवाच्या सांगण्यावरून मनमानी कारभार करणाऱ्या मुख्याध्यापिका दीपश्री जाधव यांना निलंबित करावे अशी मागणी राधिका श्रीराम सोळुंके यांनी केले आहे.

## डॉ. आंबेडकर सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी सतिष गायकवाड, सचिव मारोती गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.२३ मार्च -**

चाकूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंतीच्या अध्यक्षपदी सतिष गायकवाड तर सचिव पदी मारोती गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



या निवडीची बैठक येथील नालंदा बौद्ध विहार येथे रंगनाथ वाघमारे, सूर्यकांत कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी अध्यक्ष म्हणून सतिष गायकवाड, उपाध्यक्ष पंढरीनाथ कांबळे,सचिव मारोती गायकवाड, सह उपाध्यक्ष शुभम गायकवाड, सहसचिव संग्राम वाघमारे, कोषाध्यक्ष किशोर महालिंगे, सह कोषाध्यक्ष हणमंत कांबळे,मिरवणूक प्रमुख विक्की महालिंगे, प्रसिद्धी प्रमुख रितेश महालिंगे, सह प्रसिद्धी प्रमुख सौरव गायकवाड, सजावट प्रमुख माधव कांबळे, सह सजावट प्रमुख निखिल सूर्यवंशी आदीची निवड करण्यात आली.

दरम्यान बैठकीत सार्वजनिक जयंतीचे नियोजन घेण्यात आले.सामाजिक उपक्रम यावर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला दिलीप महालिंगे, बलभीम महालिंगे, संदीपान वाघमारे, विद्यासागर गायकवाड, पपन कांबळे, प्रभाकर गायकवाड, तुकाराम भालेराव, अनिल महालिंगे, सचिन चाकूरकर, नरेश गायकवाड, गोपीनाथ कांबळे, वर्धमान कांबळे आदीजण उपस्थित होते.

## जेथील माळी चांगला तेथील बाग चांगली फुलते : कवी योगीराज माने

### महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न...



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२३ मार्च -**

आज कालची तरुण पिढी फार वाहत चालली आहे असे म्हटले जाते. परंतु या तरुण पिढीला योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाले तर विद्यार्थी चांगल्या मार्गाला लागतात. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२३ २४ च्या गुणवत्ता यादीत महाराष्ट्र महाविद्यालयाचे १४ विद्यार्थी चमकलेत. याचा आनंद तर आहेच पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या अंगी असलेली सुप्त कलागूण स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने समोर येतात. त्यांच्या कलागुणांना संधी प्राप्त करून दिली जाते. यासाठी जेथील माळी चांगला तेथील बाग चांगली फुलते, बहरते, असे मत सुप्रसिद्ध कवी, गीतकार योगीराज माने यांनी व्यक्त केले.

निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात उद्घाटक म्हणून ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की आयुष्य हे फार धावपळीचे झालेले आहे. लग्नानंतर सर्वांचे आयुष्य बदलून जाते. म्हणूनच लग्नाआधी एक तरी हसरा फोटो काढून ठेवावा आपणही कधीतरी हसत होतो त्याचा पुरावा असू द्यावा. या काव्यातून त्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. आपल्या ठेवणीतल्या लोकप्रिय अशा आई, बाप माझा, घर, लवस्टोरी, लेक यासारख्या कवितांचे गायन करून उपस्थित विद्यार्थ्यांची मने जिंकली.

महाविद्यालयात कला, विज्ञान, वाणिज्य संगनक शास्त्र, बी. होक, शाखेतून विविध विषयात प्रथम आलेल्या व विद्यापीठातून गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत पौळ यांनी भूषविले. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मराठी विभाग प्रमुख डॉ. भास्कर गायकवाड यांनी करून दिला. विचार मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपूके, मोरेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. आर.डी. कांबळे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रशांत गायकवाड, विद्यार्थी विकास विभागाचे डॉ. हंसराज भोसले यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागाचे डॉ. ज्ञानेश्वर चौधरी व कमल गोमसाळे यांनी केले.

## सद्गुरु उदागिर बाबा महाराजांच्या उत्सवास प्रारंभ; सपत्नीक रुद्रअभिषेक व विनापुजन

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२३ मार्च -**

श्री सद्गुरु उदागिर बाबा महाराज यांचा उत्सव सोहळा उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे व उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे यांच्या हस्ते सपत्नीक रुद्रअभिषेक व ज्ञानेश्वरी पारायण ग्रंथपुजन व विनापुजन करुन उदागिरी बाबा महाराज उत्सवास प्रारंभ झाला.

उदगीरच आद्यदैवत श्री सद्गुरु उदागिरी बाबा महाराज यांचा उत्सव सोहळा प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शनिवार दि. २२ मार्च रोजी पहाटे ५ वाजता उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे व उपविभागीय अधिकारी स्वाती दाभाडे यांच्या हस्ते सपत्नीक उदागिर बाबा महाराजांच्या समाधीस रुद्रअभिषेक व महाआरती करण्यात आली व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पुजन, विनापुजन



करुन पारायण व हरिनाम सप्ताहाचा शुभारंभ झाला.

उदागिरी बाबा मठ संस्थानच्या वतीने मठाधिश जयेशगिर गुरु सतिशगिर महाराज यांच्या हस्ते उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे व स्वाती दाभाडे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. दररोज पहाटे ४ ते ६ उदागिर महाराज महारुद्र पुजा ७ ते १० सामुहिक श्रीज्ञानेश्वरी पारायण, १२ ते २ तुकाराम गाथा भजन, २ ते ४ महिला भजन, ४ ते ६ प्रवचन, ६ ते ९ हरिपाठ, रात्री ९ ते ११ किर्तन व जागर आदि कार्यक्रम होणार आहेत. तर प्रवचन व किर्तन यात २२ मार्च रोजी हभप. रामकिशन महाराज शिरोळकर यांचे प्रवचन तर हभप. एकनाथ महाराज श्रीडोळे यांचे किर्तन.

रविवार दि.२३ रोजी हभप. मुकुंद महाराज नागलगाव यांचे प्रवचन तर हभप. दामोधर गिरी महाराज हांदीखेर यांचे किर्तन सोमवार दि.२४ मार्च रोजी सुरेश पाटील नेत्रगावकर यांचे प्रवचन व किर्तन, मंगळवार दि.२५ रोजी हभप. उद्धवमहाराज हैबतपुरे यांचे प्रवचन तर हभप. संदिप महाराज होळीकर यांचे किर्तन

बुधवार दि. ६ एप्रिल रोजी हभप. राजयोगी सतीशभैय्या डिगोळकर यांचे प्रवचन तर हभप. प्रशांत महाराज क्षीरसागर यळम घाट यांचे किर्तन.

गुरुवार दि.२७ मार्च रोजी हभप. रघुवीर महाराज हेळंबकर यांचे प्रवचन व किर्तन, शुक्रवार दि.२८ रोजी हभप. ज्ञानोबा कारभारी बोंबळीकर यांचे प्रवचन व किर्तन होणार आहे.

शनिवार दि.२९ मार्च रोजी सकाळी १० ते १२ हभप. गोरखगीर महाराज धोंडीहिप्परगेकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. मध्यरात्री बारा वाजता उदागीर बाबा मंदिर ट्रस्टच्या वतीने महापुजा होणार असुन यानंतर भक्तांना दर्शनाचा लाभ घेता येणार आहे.

रविवार दि. ३० मार्च २०२५ रोजी गुडी पाडव्यानिमित्त प्रतिवर्षा प्रमाने श्री सद्गुरु उदागिर बाबा उत्सवानिमित्त ३० मार्च रोजी सकाळी ९ ते ३ या वेळेत भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

गुडी पाडव्या निमित्य सकाळी ९ वाजता भक्ती संगीत कार्यक्रम संपन्न होणार आहे.

## विदयानिकेतन विद्यालयाच्या प्रवेशोत्सव कार्यक्रमात दोनशे विद्यार्थ्यांनी नोंदवला प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२३ मार्च -**

येरमाळा येथील विद्यानिकेतन प्री- प्रायमरी स्कूलमध्ये इयत्ता पहिलीसाठी प्रवेश वाढवा या संकल्पनेतुन प्रवेशोत्सव कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष सचिन पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून सतिष पाटील व प्रविण बारकुल हे उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष सचिन पाटील यांनी उपस्थित पालकांना मार्गदर्शन केले. आणि आपल्या पाल्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी योग्य शाळेची निवड कशी करावी, याविषयी माहिती दिली. त्यांनी पालकांना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेच्या उपक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सतीश पाटी, तुषार रुमणे, मनोज जाधवर, प्रवीण बारकुल, संदीप ढवळे, आश्विनी बारकुल, सुनीता बारकुल, वाघमारे आणि प्रशासकीय अधिकारी अनिल डोके आदी उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून शाळेच्या शिक्षण प्रणालीबद्दल समाधान व्यक्त केले आणि पालकांना शाळेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाळवदे यांनी केले.

# शेतकरी नवरा नको गं बाई... पण शेती पाहिजे

- मुलगा तर हवा पुण्यातच...
- मुलीच्या भावी पतीकडून अपेक्षा...
- ३५ वय ओलांडलेल्या अनेकांचे लग्न लांबणीवर...

**तभा वृत्तसेवा / उदयकुमार पाठक**
**रेणापूर, दि.२३ मार्च -**

मुलगा शासकीय नोकरदार असावा. सासू सासरे जवळ नसावेत. किमान चार ते पाच वर्षाचे दोघांच्या वयात अंतर असावे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुलगा शहरात राहणारा असावा. अशा एक ना अनेक अपेक्षा घेऊन बसलेल्या मुली आणि मुलीच्या पालकामुळे अनेक मुलांची लग्न जुळत नसल्यामुळे ही लांबणीवर पडत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे.



दरम्यान समाजात मुलींची संख्या कमी असल्याने अनेकांची लग्न जमत नसल्याचे सांगण्यात आले आहे. प्रत्येक आई-वडिलांना आपली मुलगी सुखी घरी नांदावी अशी अपेक्षा असते. नोकरी जॉब असणाऱ्या मुलांना अधिक पसंती दिली जात आहे. मात्र गरीब अथवा श्रीमंत शेतकरी मुलाला मुलगी देण्यास मुलीचे आई-वडील राजी होत नाहीत. कोरोनाच्या संकटामुळे अनेक तरुण शहरातून गावात आले. काही तरूण पुन्हा शहरात परत गेले.

मात्र कोरोनाच्या काळात अनेकांच्या नोकऱ्या गेल्याने बरेच तरुण खेडेगावात रमले.

सध्या मुलींची संख्या कमी असल्याने तरुणांची लग्न जुळणे कठीण झाले आहे. परिणामी उपवर मुलांच्या वडिलांची दम छाक होत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

### मुलीच्या शोधातील मुलगा...

माझे शिक्षण एम.ई. झाले आहे. मी पुण्यात चांगला जॉब करतो. पण मला म्हणावी तशी मुलगी मिळतच नाही. खूप प्रयत्न केले. वधु वर सुचक केंद्र जॉईन केले. येथेही मेळ लागत नाही. कोणी मुलगी देता का मुलगी असे म्हणण्याची वेळ आमच्यावर आली आहे.



### शेतकरी मुलावर वाईट दिवस...

एकीकडे बेकारी, दुष्काळ, अतिवृष्टीने संकटात टाकलेल्या शेतकऱ्यांना आता मुलीही संकटात टाकत आहेत. शेती करणाऱ्या मुलाला मुलगी देण्यात ९० टक्के पालक होकार देत नसल्याचे सांगण्यात येत आहे. शेकडो एकर जमीन असलेल्या शेतकऱ्यांनाही मुलाला मुलगी मिळत नसल्याचे चित्र समोर आले आहे.

### एकत्रित कुटुंब नको ग बाई...

पूर्वी एकत्रित कुटुंबाला मुली सर्वाधिक पसंती देत होत्या. मात्र अलीकडच्या काळात शिकल्या सवरलयां मुलींना आता एकत्रित कुटुंब पद्धती नकोशी झाली आहे. नवरा कामाला मुलगी कामाला पैसे कमवायचे जीवन जगायचे एवढे जीवन मुलींचे झाले आहे. त्यामुळे अनेक मुली सासू-सासरे जवळ नको. मूलबाळ लवकर नको, अशी मागणी आपल्या भावी पती समोर करीत आहेत.

### लग्न थांबण्याची कारणे...

मुलींना शासकीय नोकरदार, मेट्रोसिटीत राहणारा पती हवा आहे. एकत्रित कुटुंब नको, सासू सासरे जवळ नको, मुलगी बी.ई. असेल तर मुलगा एम.ई. हवा आहे. शेतकरी मुलाला ९५ टक्के टक्के मुली नकार देत आहेत.